डिसेंबर २०१४/ पाने ६० / किंमत १०

# लोकराज्य






मेळघाटातील अंगणवाडी केंद्राला भेट देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंगणवाडी सेविकांच्या समस्या जाणून घेतल्या.



मेळघाटच्या दौऱ्यावर असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे चिमुकल्यांनीही रानफुले भेट देऊन स्वागत केले.

वर्ष ६६ वे | अंक ६ | डिसेंबर २०१४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक **मनीषा पाटणकर-म्हैसकर**
- मुख्य संपादक **चंद्रशेखर ओक**
- संपादक **सुरेश वांदिले**
- कार्यकारी संपादक **प्रवीण टाके**
- विशेष सहकार्य **कीर्ती पांडे**, **क्रीती लाला**
- उपसंपादक **प्रवीण कुलकर्णी**, **राजाराम देवकर**

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी **दिगंबर पालवे**
- वितरण अधिकारी **विलास बोडके**
- साहाय्य **विद्या कदम**, **नितीन कुटे**

## मांडणी

- मुखपृष्ठ **सीमा रनाळकर**
- मांडणी, सजावट **संदीप पवार**
- मुद्रण **एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई**

## पत्ता

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,**
**दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.**
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
**email :** lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
**email :** lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग


## मेक इन महाराष्ट्र

केंद्र शासनाच्या मेक इन इंडिया या कार्यक्रमाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने मेक इन महाराष्ट्र हा कार्यक्रम राबवण्याचे ठरविले आहे. राज्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणूक वाढविणे, रोजगार निर्मिती, राज्याचा विकासदर वाढविणे, कौशल्य विकास क्षेत्रात नवे उपक्रम सुरू करणे, पायाभूत सुविधांचा विकास करणे यांचा समावेश या कार्यक्रमात आहे. **६**



## आश्वासक वाटचाल

गेल्या महिन्याभरात मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या धडाकेबाज निर्णयाने महाराष्ट्राची विकास प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. **११**

## देशाची वाहतूकव्यवस्था अधिक सक्षमतेकडे



देशातील रस्ते वाहतूक, जल वाहतूक अधिकाधिक सक्षम करण्याचे ध्येय ठेवून विविध योजना कार्यान्वित करण्याचा निर्धार केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केला आहे. या अनुषंगाने व महाराष्ट्राच्या विकास प्रकल्पाबाबत त्यांची भूमिका विशेष मुलाखत. **१७**

## आर्थिक शिस्तीला प्राधान्य



राज्यावर असलेला कर्जाचा डोंगर कमी होणार नसला तरी अनावश्यक खर्चाला कात्री लावत महसूल वाढवण्यावर वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी भर दिला आहे. आर्थिक शिस्तीला आपण प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. **२१**

## टंचाईग्रस्तांसाठी...



मराठवाडा आणि विदर्भात पावसाअभावी खरीप पिकाचे नुकसान झाले आहे. तर अवकाळी पावसाने रब्बी पिकांची हानी झाली आहे. या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने अनेक निर्णय घेतले आहेत. **२३**

## मेळघाटात मुख्यमंत्री



मेळघाटातील आदिवासी आणि दुर्गम भागात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच झंझावती दौरा केला. त्याचा आखों देखा हाल **२७**

## बाबासाहेबांची आंतरराष्ट्रीय कीर्ती



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आकर्षण सबंध जगाला आहे. विविध देशांतील तरुणपिढी बाबासाहेबांच्या विचारांकडे मोठ्या संख्येने आकर्षित होत आहे. **४३**

## मधुमेहापासून मुक्ती

प्रख्यात मधुमेहतज्ज्ञ, पद्मश्री डॉ. शशांक जोशी सांगताहेत मधुमेह या आजाराची सर्वंकष माहिती व त्यावरील उपाययोजना. **४९**



## याशिवाय

- पक्ष्यांचे माहेरघर : नवेगाव बांध (भ्रमंती)
- क्षमतांना न्याय द्या (प्रेरणा)
- महाराष्ट्राचे ब्रँडिंग (दिल्लीतील महाराष्ट्र)
- माझे खातं.. भाग्यविधातं...




विविध घटना, घडामोडींवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ केलेले मनोवेधक भाष्य.

### इत्थंभूत माहिती




नवे सरकार आल्यानंतर त्या सरकारचे अंतरंग जाणून घेण्याची इच्छा सर्वसामान्यांना असते. लोकराज्यचा नोव्हेंबरचा अंक नव्या सरकारचा परिचय करून देणारा ठरला. विशेषत: या अंकातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदर्भात प्रकाशित झालेले लेख खूप वाचनीय आहेत. आपले नवे मुख्यमंत्री या पदावर कसे पोहचले, त्यांची कार्यशैली, त्यांचा परिवार, त्यांचे संस्कार आणि लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची वाटचाल याची इत्थंभूत माहिती या अंकातून मिळाली. विदर्भ, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्र या भागातील विकासाचा बॅकलॉग भरून निघेल. त्यांची कारकिर्द भावनिक मुद्द्यांपेक्षा विकासावर भर देणारी असेल असा आशावाद यातून निर्माण झाला.

**– नागेश गोरख,** पत्रकार, यवतमाळ

### जनतेच्या आकांक्षाचे प्रतिबिंब

लोकराज्यचा नोव्हेंबरचा अंक संग्राह्य बनला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मंत्रिमंडळाचा परिचय वाचनीय आहे. ज्येष्ठ पत्रकार, लेखकांनी लिहिलेले लेख खूप सुंदर झाले आहेत. खासकरून प्रवीण बर्दापूरकर यांचा लेख आजची स्थिती आणि नव्या सरकारकडून अपेक्षा व्यक्त करणारा आहे. जनतेच्या मनातील इच्छा आकांक्षाचे प्रतिबिंबच या लेखातून उमटले आहे. याबरोबरच मुख्यमंत्र्यांनी दिलेली पहिली मुलाखत, मुख्यमंत्र्यांचा लेख राज्याची भावी दिशा दर्शविणारा आहे.

**– हर्षल कुलकर्णी,** बुलढाणा

### भारदस्त

नव्या सरकारची ओळख असणारा नोव्हेंबरचा लोकराज्य भारदस्त वाटला. नव्या सरकारमधील मंत्रिमहोदयांची ओळख व त्यांची ध्येयधोरणे आम्हापर्यंत पोहोचली. अंकातील निडणूकविषयक माहिती आणि आकडेवारी अचूक असल्याने हा अंक संग्रही ठेवण्यासारखा आहे. नवीन सरकारच्या शपथविधीनंतर अवघ्या काही दिवसातच आम्हाला लोकराज्यचा हा अंक मिळाल्याने नावीन्याचा आनंद झाला.


**– शिवनाथ नागवे,** खामखेडा, जि. जालना

### परिपूर्ण

लोकराज्यचा नोव्हेंबरचा अंक भरगच्च बनला आहे. राज्यातील विधानसभेवर निवडून गेलेल्या २८८ आमदारांची यादी, नव्या मंत्र्यांचा परिचय, मुख्यमंत्र्यांचा वेधक परिचय आणि आवश्यक माहितीने हा अंक परिपूर्ण आहे. लोकराज्यचे सर्वच अंक चांगले असतात. त्यामध्ये नोव्हेंबरचा अंक हा शिरपेचातील तुरा ठरणारा आहे.

**– ज्ञानदेव पाटील,** कोल्हापूर

### धडपडणाऱ्या तरुणांसाठी प्रेरणा




सप्टेंबर २०१४ चा लोकराज्यचा 'यशाचा फॉर्म्युला सांगणारा विशेषांक' वाचून आनंद झाला. स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू करायची म्हटल्यानंतर सर्वप्रथम शोधाशोध करावी लागते ती त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या अटी व पात्रतेची. त्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना सर्वकष माहिती असणारे संदर्भग्रंथ धुंडाळावे लागतात. त्यांच्या दृष्टिकोनातून हा प्रेरणा विशेषांक त्यांना इत्थंभूत माहिती पुरवेल व त्याचबरोबर संग्रही ठेवता येईल. तज्ज्ञांचे व यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन तसेच अभ्यास, लेखन व मुलाखत कौशल्यांचा अंतर्भूत करून अंक जास्तीत जास्त सर्वसमावेशक केला आहे. त्याचबरोबर नागरी सेवा, संरक्षण, विशेष सेवा, रेल्वे, बँक, एसएससीमधील सेवा व सध्या अत्यावश्यक असलेल्या 'संशोधन' या विषयाबद्दल विशेष माहिती दिली आहे. खरेतर या विशेषांकाची, करिअरसाठी धडपडणाऱ्या महाराष्ट्रातील तरुणांना गरज होतीच. ती त्रुटी आता लोकराज्यने दूर केली आहे.

**– अविराज रा. भोसले,** जि. कोल्हापूर

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य हे महाराष्ट्राच्या जनतेचे हक्काचे व्यासपीठ आहे. प्रत्येक अंकात अधिकाधिक उपयुक्त माहिती आकर्षक स्वरूपात देण्यात येते. या अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया अवश्य पाठवा. या प्रतिक्रियांची योग्य ती दखल घेण्यात येईल.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, पाचवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई–४०० ००१**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी

http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

अतिथी संपादकीय



# मेक इन महाराष्ट्र

**रा**ज्याच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित आणि सह्याद्री वाहिनीवरून प्रसारित **'जय महाराष्ट्र'** या कार्यक्रमाला विस्तृत मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी महाराष्ट्राच्या विकासाचे व्हिजन स्पष्ट केले. ज्या बाबींचा या मुलाखतीत त्यांनी उल्लेख केला त्यानुसार गेल्या महिन्याभरात विविध निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयांमध्ये सेवा हमी विधेयक, 'मेक इन महाराष्ट्र', आदींचा ठळकपणे उल्लेख करावा लागेल.

महाराष्ट्राच्या औद्योगिकीकरणाला नवी दिशा देण्याची क्षमता असलेल्या 'मेक इन महाराष्ट्र', या संकल्पनेस मूर्त रूप देण्यासाठी विविध निर्णय मुख्यमंत्र्यांनी तातडीने घेतले. ई-प्लॅटफार्मद्वारे विविध मंजुरी व दाखले एकाच ठिकाणी तातडीने उद्योजकांना उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या निर्णयाचे उद्योगजगताने स्वागत केले आहे. 'मेक इन महाराष्ट्र' यशस्वी करण्यासाठी राज्यातील प्रमुख उद्योजकांनी सहकार्याचा हात पुढे केला आहे. कौशल्यनिर्मितीस अधिक चालना देण्यात येणार असून डिजीटल महाराष्ट्राचा आवाका अधिक व्यापक केला जाणार आहे. मेक इन महाराष्ट्र यशस्वी ठरण्यासाठी या बाबी पूरकच ठरतील.

महाराष्ट्रातील काही भागात टंचाईसदृश परिस्थती उद्भवली आहे. या परिस्थितीवर सक्षमपणे मात करण्यासाठी सर्व प्रकारच्या उपाययोजना तातडीने करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. या स्थितीचे मुख्यमंत्री स्वत: संनियंत्रण करीत आहेत.

गेल्या महिन्याभरात स्वच्छ महाराष्ट्र अभियान अधिक गतिमान झाल्याचे दिसून आले. बालदिनाच्या निमित्ताने विद्यार्थी-विद्यार्थीनींनी स्वच्छतेची शपथ घेतली. अनेक व्यक्ती स्वयंस्फूर्तीने समोर येऊन हे अभियान पुढे नेत आहेत. सुदृढ आरोग्यासाठी स्वच्छतेचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्यापैकी प्रत्येकाने या अभियानात हिरिरीने सहभागी व्हायला हवे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची निर्मिती असलेल्या **'दिलखुलास संवाद'** या आकाशवाणीरून प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमाने श्रोत्यांची हृदये जिंकली आहेत. या कार्यक्रमाने नुकताच नॉनस्टॉप आठ वर्षे प्रसारित होण्याचा विक्रम प्रस्थापित केला आहे. ही बाब महासंचालनालयासाठी अभिमान आणि आनंदाची आहे.

लोकराज्यच्या या अंकात आम्ही नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार या मंत्र्यांच्या मुलाखती समाविष्ट केल्या आहेत. देश आणि राज्याच्या विकासाला नवी दिशा देण्याच्या त्यांच्या मनातील संकल्पना त्यामुळे वाचकांना कळण्यास साहाय्य होईल.

या अंकापासून आम्ही वाचकांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेली **प्रेरणा** आणि **भ्रमंती** ही सदरे पुन्हा सुरू करत आहोत. तसेच आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी उपयुक्त ठरेल असे **निरामय** हे नवे सदर सुरू केले आहे. आमच्या वाचकांना ही सदरे आवडतील अशी आशा आहे.

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

देशाला औद्योगिकदृष्ट्या जागतिक पातळीवर अग्रेसर करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया' या उपक्रमाला चालना दिली आहे. देशाच्या विकासात महाराष्ट्राचा फार मोठा सहभाग राहणार आहे. कारण महाराष्ट्र हे ग्रोथ इंजिन आहे ही बाब लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मेक इन महाराष्ट्र' हा उपक्रम अतिशय नावीन्यपूर्णरीत्या आणि कालबद्धरीत्या राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे औद्योगिक विकास आणि गुंतवणुकीत असलेली आपली आघाडी आणखी बळकट आणि सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र सज्ज झाला आहे.



# घडत आहे नवा महाराष्ट्र

# मेक इन महाराष्ट्र

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच गुंतवणूक करण्यासाठी राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची महाराष्ट्राला नेहमीच प्रथम पसंती राहिली आहे. राज्याची भौगोलिक स्थिती, नैसर्गिक देणगी, ७२० किमीचा समुद्रकिनारा आणि मुंबई शहराला असलेला आंतरराष्ट्रीय शहराचा दर्जा यामुळे राज्यात उद्योग क्षेत्राची झपाट्याने वाढ झाली आहे.

देशाच्या सकल घरेलू उत्पादनात (GDP) महाराष्ट्राचा सर्वात मोठा वाटा आहे. देशातील उत्पादनात महाराष्ट्र राज्याचा १५.६ टक्के वाटा आहे. तर शेजारील राज्यांपैकी आंध्रप्रदेश-८ टक्के, गुजरात-७.४ टक्के, कर्नाटक-५.५ टक्के, तर तमिळनाडू राज्यातून ८.४ टक्के सकल उत्पादनाचा वाटा आहे.

**अपूर्व चंद्रा**
प्रधान सचिव, उद्योग

राज्यात औद्योगिक प्रगती झपाट्याने होत आहे. सन २०१८ पर्यंत औद्योगिक प्रगतीचा दर १३.२ टक्क्यापर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यात राज्याच्या उत्पन्नामध्ये उत्पादन क्षेत्राचा सहभाग २८ टक्क्यापर्यंत असेल तसेच २० लक्ष करोड गुंतवणूक आकर्षित करण्याचे लक्ष निर्धारित केले आहे. नजीकच्या भविष्यकाळात नामांकित कंपन्यांचे नवीन विशाल प्रकल्प राज्यात सुरू होत आहेत. यातील बऱ्याच प्रकल्पांना मंजुरीही देण्यात आली आहे. सुमारे १४ हजार कोटी गुंतवणूक आणि १२ हजार रोजगारनिर्मितीची शक्यता निर्माण झाली आहे. याशिवाय जवळपास ४०० प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे.

राज्यात विविध औद्योगिक उपक्रम चालतात. त्यात मुंबई, पुणे, औरंगाबाद यासारख्या मोठ्या शहरांमध्ये आयटी, जेम्स आणि ज्वेलरी, केमीकल्स, इंजिनिअरींग, इलेक्ट्रानिक्स, ऑटो, संरक्षण, फार्मास्युटिकल्स यासारखे उद्योग आहेत. तर नंदूरबार, बुलडाणा, अकोला, नागपूर, गोंदिया, अमरावती, चंद्रपूर, भंडारा, वर्धा,यवतमाळ, लातूर या भागांमध्ये टेक्सटाइल, जिनींग, प्रेसींग, दाल मिल, ऑइल मिल, प्लास्टीक प्रोसेसिंग, फूड प्रोसेसिंग, स्टील, राइस मिल, सिमेंट, साखर आणि वस्त्रोद्योग इत्यादींचा समावेश आहे.

**आव्हाने**

राज्यात कोणताही उद्योग सुरू करताना व्यवसायिकांना येणाऱ्या अडचणी आणि आव्हानांना तोंड द्यावे लागते. एखादा उद्योग सुरू करण्यासाठी अनेक प्रकारच्या परवानग्या, वेगवेगळ्या मंजुऱ्या आणि प्रत्येक टप्प्यांवर करावी लागणारी नोंदणी यासारख्या अनेक प्रक्रिया पार पाडाव्या लागतात. उद्योग सुरू करताना तीन टप्प्यांमधे परवानगी घ्यावी लागते. उद्योग सुरु होण्यापूर्वी, सुरू करताना आणि उत्पादन सुरू झाल्यानंतरही. यात केंद्रशासनाकडून १९ परवानग्या, राज्याच्या ६७ आणि एमआयडीसीच्या ६९ अशा अनेक परवानग्या प्राप्त कराव्या लागतात. यात वित्त विभाग, ऊर्जा विभाग, पर्यावरण विभाग, उद्योग विभाग, कामगार विभाग, महसूल विभाग, नगरविकास विभाग, राज्य अग्निशमन सेवा, सार्वजनिक बांधकाम विभाग, अन्न व नागरी सुविधा आणि ग्राहक संरक्षण विभाग, वन विभाग, पाणी पुरवठा विभाग, मुंबई पोर्ट ट्रस्ट, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, व इतर विभाग, अशा जवळपास १४ विभागांची परवानगी आवश्यक आहे.

जमिनिची उपलब्धता, विजेचे दर, पाण्याचे नियोजन, पर्यावरणाची काळजी, वेगवेगळ्या प्रकारच्या करांचा बोजा यासारख्या अनेक समस्यांमुळे उद्योग विश्वासमोर आव्हानांचा डोंगर उभा राहतो.

ही सर्व परिस्थिती बदलण्यासाठी 'मेक इन महाराष्ट्र' हा उपक्रम राबवण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे.

उद्योग स्थापन करण्यासाठी आवश्यक सर्व परवानग्या एक महिन्याच्या आत देण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शक्तिप्रदान गटाची स्थापना.

१०० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी 'मैत्री'च्या माध्यमातून सर्व परवानग्या एकाच ठिकाणी मिळणार.

ई-प्लेटफॉमद्वारे उद्योगांना परवानग्या गतीने उपलब्ध व्हाव्यात म्हणून करावयाच्या सुधारणांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती

- २०१८ पर्यंत औद्योगिक प्रगतीचा दर १३.२ टक्क्यापर्यंत वाढवणार
- राज्याच्या उत्पन्नामध्ये उत्पादन क्षेत्राचा सहभाग २८ टक्क्यापर्यंत वाढवणार
- २० लक्ष कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणार

**उपाययोजना**

देशाच्या विकासात आपला वाटा वाढविण्यासाठी 'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर महाराष्ट्रातही 'मेक इन महाराष्ट्र' राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री प्रकाश महेता यांनी राज्यातील औद्योगिक वाटचालीचा आढावा घेण्यासाठी शपथविधीनंतर लगेच कामाला सुरूवात केली आणि उपाययोजना आखण्यासाठी १७ नोव्हेंबर रोजी बैठक घेतली. या बैठकीत 'मेक इन महाराष्ट्र' कार्यक्रमाला दिशा देण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला.

**कायद्यांमध्ये सुधारणा**

राज्यात औद्योगिक क्षेत्राची गतिमान वाढ होण्यासाठी नावीन्यपूर्ण धोरणे तयार केली जाणार आहेत. मार्च २०१५ पर्यंत या धोरणांची अधिकृत घोषणाही करण्यात येईल. यात कृषी व अन्नप्रक्रिया धोरण, राज्य संपादनणूक (Procurment) धोरण, राज्य उत्पादन धोरण, सेझ आणि निर्यात आधारित उद्योग करण्यासाठीचे धोरण (state policy for SEZ & export oriented unit EOVS), माहिती तंत्रज्ञान आणि ITES साठी नवे धोरण, राज्य किरकोळ विक्री धोरण इत्यादीचा समावेश राहील.

जमिनीशी संबंधित कायद्यांमध्ये सुधारणा करणे प्रस्तावित आहे. यासाठी राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील जमिनींचा आढावा घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. पर्यावरणाशी संबंधित परवानग्यासंदर्भात केंद्र शासनाशी चर्चा करून अधिक सुलभीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

उपलब्ध पाण्याचे नियोजन करून त्याबाबतच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात येईल. शेजारील राज्यांपेक्षा आपल्या राज्यात वीज दर जास्त आहेत. हे दर कमी करण्याबाबत गांभीर्याने विचार करण्यास सुरुवात झाली आहे. कर आकारणी आणि वेगवेगळ्या स्तरावरील कर याबाबतीतही सुसूत्रता आणण्यात येणार आहे. रस्ते आणि पायाभूत सुविधांचे पाठबळ तयार करण्यावर भर देण्यात येणार आहे.



उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या समवेत 'मेक इन महाराष्ट्र' बद्दल चर्चा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री प्रकाश महेता व मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय.

**उच्चस्तरीय समिती**

विविध मंत्रालयीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती गठीत करून त्याद्वारे उद्योग सुरू करण्याच्या विविध प्रक्रिया सुलभ, जलद व पारदर्शक करण्यासाठी दरमहा आढावा बैठक घेण्यात येत आहे.

**औद्योगिक क्षेत्रातील सद्य:स्थिती**

**दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर (DMIC)** जपान शासनाच्या सहकार्याने मुंबई व दिल्ली या दोन शहरांना जोडणाऱ्या रेल्वेचा डेडीकेटेड फ्राइट कॉरिडॉर स्थापन करण्यात येणार आहे. हा फ्राइट महाराष्ट्रामध्ये जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) येथे येऊन मिळणार आहे. या कॉरिडॉरच्या दोन्ही बाजूस मिळून १५० ते २०० किमीच्या परिसरात उद्योगधंद्यांच्या मूलभूत सुविधांचा एकात्मिक विकास करण्यात येईल. राज्यात या प्रकल्पांतर्गत दोन एकात्मिक औद्योगिक शहरे शेंद्रा-बिडकीन, औरंगाबाद व दिघी-रायगड येथे वसविण्यात येणार आहे. शेंद्रा-बिडकीन प्रकल्पासाठी एकूण ८,००० हेक्टर आवश्यक जमिनीपैकी, पहिल्या टप्प्यात ३,२०० हेक्टर जागा भूसंपादित करण्यात आली आहे. दिघी येथे प्रकल्पासाठी १७५० हेक्टर जमिनीचे संमतीपत्र प्राप्त झाले आहे.

**ऑटो क्षेत्रात राज्यात नवीन गुंतवणूक** : नुकतेच बजाज ॲटो, वोक्स वॅगन, टाटा मोटर्स व महिंन्द्रा ॲन्ड महिंन्द्रा या वाहन क्षेत्रातील कंपन्यांनी त्यांच्या विस्तारीकरण प्रकल्पांतर्गत राज्यात एकूण रुपये ११,५१० कोटी रुपयांची गुंतवणूक केली त्यातून ४,२७० व्यक्तींना रोजगार अपेक्षित आहे.

**मिहान प्रकल्प** : Multi- Modal International Hub Airport at Nagpur (MIHAN) :- नागपूरमध्ये आंतरराष्ट्रीय प्रवासी व मालवाहतूक हब तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पांतर्गत ४३५४ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून ११५०

- प्रदूषण न करणाऱ्या उद्योगांवर असलेली अनावश्यक बंधने दूर करण्यासाठी नदी नियमन क्षेत्र (River Regulatory Zone Policy) धोरणाबाबत फेरविचार.
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला विकास आराखडे आणि प्रादेशिक आराखड्यामधील औद्योगिक क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता.
- एमआयडीसी क्षेत्राबाहेरच्या उद्योगांचा विस्तार करण्याची प्रक्रिया आणि जमीन वापरांच्या बदलाची प्रक्रिया होणार अधिक वेगवान.



हेक्टर क्षेत्रावर हब तयार करण्याची प्रक्रिया चालू आहे.

**उद्योगांना प्रोत्साहन**

राज्यात उद्योग निर्मितीकरिता देशांतर्गत, परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी केवळ प्रोत्साहने देऊन गुंतवणूक येईलच याची शाश्वती देता येणार नाही, कारण महाराष्ट्र राज्याप्रमाणेच इतर राज्येदेखील आपापल्यापरीने औद्योगिक प्रोत्साहने देत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान, मुंबई हे आर्थिक राजधानीचे शहर, नैसर्गिक बंदर, दळणवळणाची साधने, विपुल नैसर्गिक संसाधने / खनिजे यांच्या जोडीने उद्योग सुरू करण्यासाठी विविध मंजुरी / परवानग्या तातडीने व सुलभरीत्या मिळविण्यासाठी ‘मेक इन महाराष्ट्र’ हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्यात येणार आहे.

**असे असेल ‘मेक इन महाराष्ट्र’**

■ उद्योग, व्यवसाय सुरू करण्याकरिता सध्या विविध मान्यता, परवानग्या घ्याव्या लागतात. या मान्यता, परवानग्या घेण्याची प्रक्रिया, टप्पे कमी करून ते २५ टक्क्यांपर्यंत आणणे व त्याकरिता लागणारा वेळ १० टक्क्यांपर्यंत कमी करण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधीनस्त विविध प्रक्रियांचा तातडीने अभ्यास करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

■ राज्यातील विशाल / अतिविशाल प्रकल्पांना तातडीने व सुलभरीत्या सर्व परवानग्या देण्याकरिता “MAITRI-Maharashtra Industries Trade and Investment Facilitation Cell” या कक्षाद्वारे विविध विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा गट तयार करण्यात येऊन त्याद्वारे साहाय्य करण्यात येत होते. या सुलभता कक्षास अधिक सक्षम करून १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना गतीने सेवा देण्यात येईल. अशा उद्योगांसाठी उद्योगनिहाय स्वतंत्र संपर्क अधिकारी नेमले जातील. त्याद्वारे तत्काळ सर्व शासकीय प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण करण्याची हमी देण्यात येईल.

■ मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योगाशी निगडित असलेल्या विविध मंत्रालयीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती गठित करून त्याद्वारे उद्योग सुरू करण्याच्या विविध प्रक्रिया सुलभ, जलद व पारदर्शक करण्यासाठी दरमहा आढावा घेण्यात येईल. याद्वारे काही प्रक्रिया रद्द करणे, कायदा / नियमामध्ये

## सर्व परवानग्या मिळतील एका महिन्यात...

सध्या कोणताही उद्योग सुरू करण्यासाठी साधारण ६७ विविध परवाने लागतात. त्यात कामगार विभागाच्या १४, उद्योग विभागाच्या ६, पर्यावरण विभागाच्या ६, नगरविकास विभागाच्या ७ अशा एकूण १५ ते २० विभागांच्या ६७ परवानग्या घ्याव्या लागतात. सर्वप्रथम आम्हाला परवानग्यांचे हे प्रमाण २० वर आणायचे आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योगांना जमीन आणि परवानग्या देते. त्यांच्या साधारण १४ परवानग्या असतात, त्या ५ वर कशा आणता येतील हे पाहा म्हणून सांगितले आहे. या सर्वांचा एकत्रित आकडा आम्हाला २० वर आणायचा आहे.



उद्योग सुरू करण्यासाठी सुरुवातीचे होकारपत्र पहिल्या १५ दिवसांत आणि त्यानंतर ना हरकत प्रमाणपत्र पुढील १५ दिवसांत अशा पद्धतीने सर्व परवानग्या साधारण एका महिन्यांत देऊन उद्योगांना चालना मिळेल, असे धोरण अवलंबवायचे आहे.

गोष्टी झटपट व्हाव्यात म्हणून पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांचा एक कोअर ग्रुप आम्ही स्थापन करणार आहोत. हा ग्रुप सर्व परवानग्यांच्या बाबतीत समन्वय करेल.या अधिकाऱ्यांनीच विविध विभागांशी समन्वय साधणे अपेक्षित आहेत. आता उद्योगांना आणि उद्योगपतींना सरकारकडे यायची गरज नाही. मंत्र्यांना भेटायची गरज नाही. त्यांनी मंत्र्यांपर्यंत येऊच नये, अशी आमची अपेक्षा असेल.

**- प्रकाश महेता**

उद्योगमंत्री, खाण व संसदीय



**रशियन शिष्टमंडळासमवेत राज्यपाल, मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री**

दुरुस्ती अथवा सुधारणा करणे क्षेत्रीय भेट / निरीक्षणऐवजी स्व-मूल्यांकन व ऑनलाइन सेवा पुरविणे याकरिता पाठपुरावा करण्यात येईल.

- राज्यातील प्रादेशिक आराखडा व विकास आराखड्यातील औद्योगिक झोनकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांना विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करण्यात येईल. जेणेकरून अशा क्षेत्रात जमिनविषयक ना हरकत परवानग्या अधिक सुलभतेने व गतीने देण्यात येतील.
- नव्याने होऊ घातलेल्या केंद्रीय भूसंपादन कायद्याच्या तरतुदीतून महाराष्ट्र औद्योगिक विकास कायद्यांतर्गत होणारे भूसंपादन वगळण्यासंदर्भात राज्यातर्फे केंद्रास प्रस्ताव पाठविण्यात येईल. महाराष्ट्र औद्योगिक विकास कायद्याद्वारे होणारे औद्योगिक घटकासाठी भूसंपादन अधिक सुलभ व जलद असून जमीनधारकांसाठी देखील लाभदायक आहे.
- शासनाच्या RRZ धोरणामुळे विविध क्षेत्रातील उद्योगांना अडचणी येत असून या धोरणामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.

## जमीन हस्तांतरण प्रक्रिया सुलभ करणार

- औद्योगिक प्रगतीसाठी जमिनीची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता अपरिहार्य औद्योगिक निकडीसाठी कृषी जमिनींचे आरक्षण औद्योगिक क्षेत्रासाठी करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात येईल.
- अशा ठिकाणी ०.२ ऐवजी ०.५ चटई क्षेत्र अधिमूल्य आकारणी करून संबंधित जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येईल.
- केंद्रीय भूसंपादन कायद्याच्या तरतुदीतून महाराष्ट्र औद्योगिक विकास कायद्यांतर्गत होणारे भूसंपादन वगळण्यासंदर्भात राज्यातर्फे केंद्रास प्रस्ताव पाठविण्यात येईल.

### विविध सुधारणांसाठी पाठपुरावा

'मेक इन महाराष्ट्र' या उपक्रमांतर्गत करावयाच्या विविध सुधारणा व प्रक्रिया सुलभतेने होण्यासाठी प्रधान सचिव (उद्योग) यांच्या स्तरावर विविध प्रशासकीय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेऊन सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी केवळ भौतिक प्रक्रिया सुलभ करून चालणार नाही तर प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारी व कर्मचारी यांची मानसिकता साहाय्यकारी व सकारात्मक करण्यावरही भर देण्याची आवश्यकता आहे.

❑ ❑

# आश्वासक वाटचाल

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर ते मुंबई या राजकीय प्रवासाचे कैक प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष साथीदार असतील, पण आता त्यांना महाराष्ट्रातील प्रत्येकाची साथ असेल. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांचे पहिलेच वाक्य होते, जनतेला पारदर्शी, गतिमान सरकार देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. जनतेला कामांसाठी सरकारी कार्यालयाच्या फे-या माराव्या लागू नयेत यासाठी सेवा हमी विधेयक राबवणार. ठरावीक वेळेत त्यांची कामे पूर्ण करून घेण्याचा त्यांना अधिकार मिळेल. मुख्यमंत्र्यांच्या धडाकेबाज कामकाजाला त्यानंतर सुरुवात झाली...**

राजकारणात अनेक म्हणी वापरल्या जातात, पण बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, अशी एक म्हण नेहमी वापरली जाते. फडणवीसांच्या पहिल्या तीन आठवड्याच्या आकलनावरून त्यांची कारकीर्द संमोहित करणारी असेल, असेच म्हणता येईल. या काळात त्यांनी शेकडो विषय निकाली काढले. रखडलेले, पिचलेले आणि तुंबलेले अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले. निर्णय घ्यायचे म्हणून घेतलेले नाहीत, त्रुटी दूर सारून त्यामध्ये नावीन्यही आणले. केंद्र सरकारची छाप त्यांच्या कारभारावर व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आहे. त्यांची कार्यशैली प्रभावी व धडाडी अचंबित करणारी आहे. पंतप्रधान देशविदेशातील उद्योजकांना 'मेक इन इंडिया'ची साद घालत असताना, मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'मेक इन महाराष्ट्र' हे मिशन हाती घेतले आहे. हे सारे महाराष्ट्र घडविण्यासाठी. बदलत्या जगापुढे मायभूमीला नवा आकार देण्यासाठी.



आपण काही प्रसंग काळावर सोडू. काळ कसोटी घेतो आणि उत्तरेही देतो.. फडणवीसांच्या बाबतीत असेच दिसून येते.

**प्रगल्भ नेतृत्व**

देवेंद्र फडणवीस ये नागपूरने देशको दी हुई एक सौगात है...या वाक्याने या तरुणाचे जग बदलून गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपूरला त्यांचे या शब्दांत कौतुक केले आणि १९९९ ते २०१४ या दीर्घ राजकीय कारकिर्दीचा चढता आलेख कोट्यवधी स्पंदनांनी अनुभवला. राज्याचा प्रमुख म्हणून आवश्यक असलेली गुणग्राहकता व नैपुण्य त्यांच्या ठायी भिनली आहे. सामाजिक स्तरांच्या वैचारिक बांधणीने प्रगल्भ महाराष्ट्राचे प्रगल्भ नेतृत्व म्हणून राजमान्यताही त्यांना यामुळेच मिळाली. तीन आठवड्यातील त्यांनी सहकाऱ्यांसोबत घेतलेले निर्णय बिनतोड आहेत.

फडणवीस यांच्या काही निर्णयांमुळे जनमानस त्यांच्या आणखी जवळ आले.. निर्णय सोपे व सुटसुटीत असल्याने लोकांना सरकारच्या कामकाजावर भरवसा वाटू लागला.

– जनतेच्या पैशाची नासाडी टाळण्याचा संकेत प्रशासनाला देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सरकारी विमानाचा प्रवास टाळून सामान्य व्यक्तीसारखा प्रवास करण्याचा घेतलेला निर्णय व केलेली कृती. तसेच लोकांचे राज्य ही संकल्पना जनतेच्या मनावर बिंबवण्यासाठी कन्या दिवीजा हिलाही सुरक्षा देण्याची गरज नाही, असे गृह विभागास पत्र लिहून स्पष्ट केले. राज्याचा पालक म्हणून हा निर्णय जनतेला कमालीचा भावून गेला. प्रशासकीय व राजकीय स्तरावर कदाचित याकडे वेगळ्या अंगानेही पाहिले जात असावे.

**झंझावाती वाटचाल**

मुख्यमंत्री म्हणून त्यांची कारकिर्द अशी

## रघुनाथ पांडे

दिसू लागली. त्यामुळेच, गतिमान, पारदर्शक झंझावाती आणि लोकाभिमुख प्रशासनाला सर्वोच्च प्राधान्य... हे वाक्य शोभेचे असणार नाही किंवा शब्द गुळगुळीतही होणार नाहीत तर ते कृतीतून प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांची आहे. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी जनतेला तशी ग्वाही दिली आहे. आता कालबद्ध कार्यक्रमाची आखणी गरजेची गरज आहे. अनावश्यक खर्चावर नियंत्रण, वित्तीय गळती रोखणे, गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी विशेष कृती योजना आखण्याची तयारी करावी लागेल. खरे आहे, की सिंचन, परिवहन व पायाभूत सुविधाक्षेत्रात चालू असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने फडणवीस सरकारने वाटचाल सुरू केली.

**गतिशील विकास**

यंदाच्या निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाली. याचाच अर्थ

## जनमानसाला भावलेले निर्णय



- उद्योगांसाठी सर्व परवानग्या एक महिन्याच्या आत देण्यासह, सुधारणांसाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना.
- मुंबईतील गरीब नागरिकांना घर देण्यासोबतच मुंबईला स्मार्ट सिटी बनविण्यासाठी एकत्रितपणे काम करण्यासाठी उचललेले पाऊल.
- नदी नियमन क्षेत्र (River Regulatory Zone Policy) धोरणाबाबत फेरविचार.
- देशाच्या राजधानीत नवी दिल्लीमध्ये महाराष्ट्राचे मार्केटिंग व सादरीकरण करण्यासाठी परिपूर्ण महाराष्ट्र केंद्र स्थापन करण्याची घोषणा.
- १लाख ४८ हजार गिरणी कामगारांनी घरांसाठी केलेल्या अर्जांची छाननी करून पात्र कामगारांची अंतिम यादी तयार करण्याचा विचार.
- कमी पावसामुळे यंदा १९ हजार गावात अवर्षणग्रस्त स्थिती असून शेतकऱ्यांची पिके धोक्यात आली आहेत, म्हणून नियमित वीज पुरवठ्याचे नियोजन.
- सीआरझेड मधील झोपडपट्टी पुनर्विकास रखडला असून त्याला गती देण्यासाठी म्हाडाला नोडल एजन्सी म्हणून नेमून त्यांचा ५१% सहभाग व खाजगी विकासकाचा ४९% सहभाग घेऊन या कामाला गती देण्यासह चटई क्षेत्र निर्देशांकाबाबत निर्णय घेण्याची सूचना.

महाराष्ट्रातील जनतेला गतिशील विकास अपेक्षित आहे. सेवा हमी देणाऱ्या अधिनियमामुळे नागरिकांना कार्यक्षम पद्धतीने लोकसेवा मिळेलच पण त्यामध्ये सातत्य ठेवण्यासाठी नियंत्रित व्यवस्थाही असावी लागेल. सरकार लोकाभिमुख करीत असताना पुढील १०० दिवसात एक ई-पोर्टल व आपले सरकार हे मोबाईल ॲप्लिकेशन सुरू होणार आहे. असंघटित कामगारांच्या विशेषत: ऊस तोडणी, कोळसा उद्योग, वीटभट्ट्या, सफाई कामगार यासारख्या असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणासाठी नवीन व स्वतंत्र धोरण तयार करण्यात येईल. नियोक्त्यांना आवश्यक असलेल्या सेवा आणि बेरोजगारांकडे असलेले कौशल्य यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी सेवायोजन कार्यालयांमध्ये लघुसंदेश, ई-मेल व संकेतस्थळांचा वापर करून रोजगार कॉल सेंटर योजना ही नवीन योजना सुरू होईल. आजच्या घडीला माहिती तंत्रज्ञान क्षेत्राने



महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पुणे हे शहर माहिती तंत्रज्ञान केंद्र म्हणून उदयास येत असतानाच नागपूर, नाशिक, औरंगाबाद आणि कोल्हापूर यासारख्या शहरात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या वाढीसाठी या क्षेत्राची फेररचना करण्याचे नियोजन करण्याचा फडणवीस यांचा प्रयत्न दूरगामी आहे. केंद्राच्या कामगार सुधारणा धोरणाच्या धर्तीवर वस्तुनिर्माण क्षेत्रातील रोजगारात वाढ करण्यासाठी कामगार कायदे व निरीक्षण कार्यपद्धतीमध्ये सुधारणा, म्हाडा, एमएमआरडीए, सिडको, नागपूर सुधार प्रन्यास यांच्यामार्फत परवडणारी घरे, मुंबई, नाशिक, जळगाव, नागपूर, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी आणि पुणे यासारखी महत्त्वाची शहरे जोडण्यासाठी द्रुतगती व राष्ट्रीय महामार्गाचे जाळे विकसित करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येईल तेव्हा महाराष्ट्र अव्वल झालेला असेल.

### मेक इन महाराष्ट्र

उत्पादन आणि सेवाक्षेत्रामध्ये देशी गुंतवणूकदार आणि थेट परकीय गुंतवणूकदारांचा महाराष्ट्राकडे ओढा आहे. उद्योगांसाठी पायाभूत सुविधा, जमीन, विविध परवानग्यांची प्रक्रिया आणि उत्पादन क्षेत्रावर परिणाम करणाऱ्या विविध कायद्यांमधील आवश्यक बदल याचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. उद्योगांना मान्यता देण्याची प्रक्रिया अधिक परिणामकारक होण्यासाठी ई-प्लॅटफॉर्म तयार करण्याची नावीन्यपूर्ण संकल्पना पुढे आली. देशाच्या पातळीवरील 'मेक इन इंडिया'प्रमाणे 'मेक इन महाराष्ट्र' यशस्वी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी टाकलेली पावले भारदस्त आहेत. शेजारील राज्याच्या प्रगतीचे दाखले आपण देतो, त्याची जाहीर चर्चा घडते. त्यापुढे 'मेक इन महाराष्ट्र' ही संकल्पना गुरुत्वाचे काम करेल. एक महिन्यात एका खिडकीतून साऱ्याच परवानग्या व सवलतींचा वर्षाव झाला, तर उद्योजक महाराष्ट्र सोडून जाणारच नाहीत. १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी 'मैत्री'च्या माध्यमातून गती, प्रदूषण न करणाऱ्या उद्योगांवर असलेली अनावश्यक बंधने दूर करण्याचा निर्णय, खरे तर राज्याला पुढे नेण्यासाठी यापूर्वीच व्हायला हवा होता. आता तो या सरकारने घेतल्याने

अनेक उद्योग पक्के होतील. ई-प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून उद्योगांसाठी परवानग्या सुलभ, पारदर्शक होतील. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला विकास आराखडे तातडीने करावे लागतील. एमआयडीसी क्षेत्राबाहेरच्या उद्योगांचा विस्तार करण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल... आणि हे सारे उद्योजकाला महिन्याच्या आत उपलब्ध करून द्यावे लागेल. कामाने वेग धरला की, नाही हे तपासण्यासाठी वित्त, कामगार, उद्योग, महसूल, नगरविकास, पर्यावरण आणि ऊर्जा विभागांच्या सचिव व मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिवांचा समावेश असलेला वरिष्ठ अधिकाऱ्यांचा शक्तिप्रदत्त गट मुख्यमंत्र्यांनी नेमला. केवळ प्रदत्त समितीचीच देखरेख असेल असे नाही, तर उद्योजकांना दिलेला शब्द पाळला जातो की नाही, त्याचा प्रभाव तपासण्यासाठी, सुधारणांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी त्यात स्वत:ला सहभागी करून घेतले. त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येणार असून, ती दरमहा बैठक घेईल. ही समिती विविध परवानग्यांमध्ये घट करणे, सुधारणा करणे या प्रक्रियांचे ध्येय गाठण्यावर भर देईल. राज्याचा पारदर्शी व शिस्तबद्ध विकास यामुळे शक्य होईल.

**वनांचेही चांगभले**

राज्यातील सुमारे ४५ हजार गावांपैकी १५५०० गावांचे जीवन वनांवर अवलंबून आहे. वनक्षेत्रापासून सरासरी २ कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती होते त्यामुळे वन विकासाचे महत्त्व आणखीनच अधोरेखित होताना दिसते. याकरिता मुख्यमंत्र्यांनी वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना सोबत घेऊन काही योजना आखल्या. नागपूर जवळच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गोरेवाडा प्राणिसंग्रहालयाच्या विकासाला आता अधिक गती मिळणार आहे. मुख्यमंत्री त्या भागातील आहेत, हा योगायोग असला तरी, एकात्मिक स्वरूपातील हे प्राणिसंग्रहालय जगातील काही मोजक्या प्राणिसंग्रहालयापैकी एक असेल. राज्यात ६ राष्ट्रीय उद्याने, ४७ अभयारण्ये, ४ संवर्धन क्षेत्र आहेत. या वनांचे आणि वनांमधील जैवविविधतेचे रक्षण केल्यास पर्यटनातून रोजगाराच्या अनेक संधी विकसित होऊ शकतात हे लक्षात घेऊन विकासाची दिशा निश्चित केली आहे. झुडपी जंगलांचा प्रश्न सोडविण्याचा विचारही मोठा दिलासा देणारा आहे. १ लाख ७८ हजार ५२५हेक्टर पैकी ८६ हजार ४०८ हेक्टर क्षेत्र वनातून वगळावे तसेच ७५ हजार ८०६ हेक्टर क्षेत्रासाठी वनामध्ये विशेष श्रेणी करण्याची सूचना पर्यावरण विभागाला करण्यात आली आहे.

**मराठा व मुस्लीम आरक्षण**

मराठा व मुस्लीम आरक्षणाच्या अंमलबजावणीला मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या हंगामी स्थगिती संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला. या आरक्षणासंदर्भात राज्य शासनाची भूमिका सकारात्मक आहे. सरकारच्या दूरगामी निर्णयावर न्यायालयाच्या निकालानंतर मुख्यमंत्र्यांनी अवघ्या २४ तासांत बैठक घेतल्याचे याआधी फारसे घडलेले नाही. ते यावेळी घडले. न्यायालयाने नारायण राणे समितीच्या अहवालावर ताशेरे ओढल्यामुळे राणे समितीच्या अहवालाच्या पुष्ट्यर्थ अधिक माहिती गोळा करून उपाय सुचविण्याचा निर्णय म्हणजे सरकार आरक्षणावर ठाम आहे, हे सांगण्यास पुरेसे आहे. यामध्ये एक बाब प्रकर्षाने नोंदवायला हवी की, राणे समितीच्या चुकांवर माध्यमांनी बोट ठेवले, पण सरकारने राणेसमितीला अव्हेरले नाही. विरोधकांच्या चुकांची लक्तरे काढली नाहीत, हा मोठेपणा मान्यच करायला पाहिजे, कारण तो अधोरेखित झाला.

**गतिमान अंमलबजावणीची गरज**

निर्णय झाले, त्याला नीट आकार आल्याने त्यांचे कौतुकही होईल. पण गतिमान अंमलबजावणी झाली पाहिजे. फडणवीस त्यांच्या मतांवर ठाम असतात पण जनता रिपोर्टकार्ड मागत असते. जनतेच्या अपेक्षांना वास्तवाचे बळ देण्याची वेळ आता आली आहे. त्यांनी कायद्याची पदवी प्राप्त केल्याने त्यांना युक्ती माहीत आहे, आणि वादही करता येतो. त्यांना वादातीत ठरायचे आहे. आव्हानांचा सामना कसा करतात ते बघून जरी आपले राज्य राकट, कणखर दगडांचे असे असले तरी फडणवीस सरकारचा झपाटा हा,

**जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या**
**एकचि देशा,**
**प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा,**

असे सांगणारा झंझावात ठरला पाहिजे, जनता सोबत आहे, आता लढलेच पाहिजे.

(लेखक हे लोकमत वृत्तपत्र समूहात नवी दिल्ली येथे विशेष प्रतिनिधी (राजकीय) म्हणून कार्यरत आहेत.)
**संपर्क :** ०९८१८२१३५१५

❐ ❐

## जनमानसाला भावलेले निर्णय




- चालू रब्बी हंगामात शेतकऱ्यांना अखंड वीजपुरवठा करण्यावर भर.
- वीजजोडणी मागितलेल्या शेतकऱ्यांना उन्हाळ्यापर्यंत जोडणी तातडीने देण्याचा निर्णय
- सुरक्षेच्या दृष्टीने मुंबई-पुणे-नागपूर-औरंगाबाद इत्यादी महत्त्वाच्या शहरांमध्ये सीसीटीव्हीसारखी यंत्रणा लवकरच कार्यान्वित होणार
- सर्व सरकारी, निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषदांमधील कर्मचाऱ्यांना मालमत्ता दायित्वाचे वार्षिक विवरणपत्र सादर करावे लागणार.
- १७९ न्यायाधीशांची आणि त्यांना साहाय्य करण्यासाठी ७५१ कर्मचाऱ्यांची पदनिर्मिती करण्यास मान्यता
- उद्योगांच्या समस्यांविषयी दर महिन्यात बैठक घेऊन तत्काळ मार्ग काढणार.
- अधिकारांचे विकेंद्रीकरण करून पोलीस दलाचे सक्षमीकरण करणार.
- स्वच्छतागृह नसलेल्या २८२५ शाळांमध्ये फेब्रुवारी २०१५ पर्यंत स्वच्छतागृहांचे बांधकाम.
- शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज यावा यासाठी राज्यात मंडलस्तरावर २०६५ ठिकाणी स्वयंचलित हवामानकेंद्रे स्थापन करणार.

# मुंबई गतिमान


मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. शिवाय ते आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे शहरही आहे. त्यामुळे या शहरात विविध राज्यातून आणि परदेशातून वेगवगळ्या कामांसाठी येणाऱ्या लोकांची संख्या फार मोठी आहे. मुंबईची वाहतूक व्यवस्था या सर्व वाढत्या गर्दीला सामावून घेण्यास कमी पडत आहे. त्यामुळेच गेल्या अनेक वर्षांपासून ही वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. त्याला अनुसरूनच मेट्रो रेल्वेचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. त्याचा निश्चितपणे फायदा नागरिकांना होत आहे. तथापी ही वाहतूक व्यवस्था आणखी सक्षम आणि गतिमान करण्याची गरज आहे. ही बाब लक्षात घेऊन मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मेट्रो प्रकल्पाच्या विस्ताराच्या प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष केंद्रित केले आहे. या प्रकल्पाची जबाबदारी असणाऱ्या एमएमआरडीए या संस्थेसोबत त्यांनी तातडीने बैठक घेऊन या प्रकल्पांचा आढावा घेतला आणि शक्त तितक्या गतीने मेट्रोचा विस्तार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.




## कार्यान्वित
### वर्सोवा- अंधेरी- घाटकोपर मेट्रोमार्ग




## प्रस्तावित
### दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मार्ग



## अशी धावेल मेट्रो

- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मेट्रो प्रकल्प राबविण्यात येत आहे. सुधारित मेट्रो रेल्वे बृहत आराखड्यानुसार सर्व मेट्रो मार्गाची एकूण लांबी १७२ कि.मी. आहे.
- वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा ११.४० कि.मी. लांबीचा पहिला मेट्रो मार्ग यशस्वीपणे राबविण्यात आला आहे.
- दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द हा दुसरा मेट्रो मार्ग ४० कि.मी. लांबीचा असून पूर्णत: भुयारी असेल. या मार्गावर ३६ स्थानके असतील. मुलत: चारकोप ते दहिसर हा ७.८० कि.मी. लांबीचा चौथा मेट्रो मार्ग चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्गामध्ये समाविष्ट करण्यात आला.
- कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा ३३.५० लांबीचा तिसरा मेट्रो मार्ग पूर्णत: भूयारी असून या मार्गावर २७ स्थानके आहेत.
- वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडावली हा ३२ कि.मी. लांबीचा ५ वा मेट्रो मार्ग अंशत: उन्नत असेल.

## प्रस्तावित

### वडाळा, घाटकोपर, ठाणे, कासारवडवली मेट्रो मार्ग



# असे आहेत प्रकल्प



मुंबई हे जगातील महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय शहर आहे. भारताच्या आर्थिक प्रगतीला सर्वाधिक चालना या शहरामुळे मिळते. या शहराला आणखी दर्जेदार पायाभूत सुविधा व परिवहन सुविधा पुरवण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणामार्फत वेगवेगळे प्रकल्प राबवण्यात येत आहेत. हे प्रकल्प कालबद्धरीत्या पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

मुंबईतील वाहतूक समस्येवर उपाय असलेले सर्व पायाभूत सुविधांचे प्रकल्प पूर्णत्वाला नेण्यासाठी कार्यक्रम आखण्यात येणार आहेत. संबंधित यंत्रणेनेही याबाबत योग्य तत्परता दाखवावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या आढावा बैठकीत संबंधितांना दिले.

- नरिमन पॉईंट ते मालाड - कांदिवली या कोस्टल रोड या प्रकल्पाचा खर्च कमी असून किनाऱ्याची सुरक्षितताही जोपासली जाणार आहे.
- मुंबईच्या पूर्व किनाऱ्यावरील जलवाहतूक प्रकल्प (प्रवासी व रोरो सेवा) फेरी व्हाया (भाऊचा धक्का) ते नेरुळ व मांडवा याबरोबरच पश्चिम किनाऱ्यावरील प्रवासी जलवाहतूक प्रकल्प (नरिमन पॉईंट-वांद्रे-जुहू-मार्वे- वर्सोवा-बोरीवली) प्रकल्प कार्यान्वित केले जाणार आहेत. मुंबईच्या सर्व किनाऱ्यावरील जलवाहतूक प्रकल्प हा ५६८ कोटी रुपयांचा आहे.
- पश्चिम किनारी मार्ग : नरिमन पॉईंट ते मालाड-कांदिवली लिंक रोड, अंदाजित खर्च १२ हजार कोटी रुपये, ३४.५५ किमी. लांबी. ( बोगदे - १०.४० किमी, पूल - १.९३ किमी, स्टिल्टवरील रस्ते - २.४५ किमी, भरावावरील रस्ते - ९.४८ किमी, उन्नत मार्ग - १.२७ किमी, कांदळवनावरुन जाणारा मार्ग - ९ किमी). महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र नियमन प्राधिकरणाने यास मान्यता दिली व प्रस्ताव केंद्रीय वन व पर्यावरण विभागाकडे पाठवण्यात आला आहे.
- मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल): शिवडी ते चिर्ले (रायगड), अंतर २२ किमीचा सागरी सेतू, अंदाजित खर्च ११,३७० कोटी रुपये, टोल रोड, सीआरझेडसह सर्व मान्यता प्राप्त. जपानच्या जियाका या कंपनीकडून कर्जाची उभारणी केली जाईल. प्रकल्प उभारणीचा कालावधी पाच वर्षे.
- पश्चिम किनारी जलवाहतूक प्रकल्प : नरिमन पॉईंट ते बोरिवली, ४५ किमी., बांद्रे, जुहू, वर्सोवा, मार्वे येथे थांबे. धक्का व अन्य पायाभूत सुविधांची उभारणी, बोटसेवा खासगी, अंदाजित खर्च १५५७ कोटी रुपये, निविदापूर्व कामे पूर्ण, आवश्यक सर्व परवानग्या प्राप्त, कॅटामरान व हॉवरक्राफ्टद्वारे प्रवासी वाहतूक.
- पूर्व किनारी जलवाहतूक प्रकल्प : भाऊचा धक्का ते मांडवा आणि भाऊचा धक्का ते नेरुळ, आवश्यक सर्व परवानग्या प्राप्त, धक्का व अन्य पायाभूत सुविधांची उभारणी, बोटसेवा खासगी, अंदाजित खर्च ५६८ कोटी रुपये, टप्प्याटप्प्याने उभारणी.
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी ७५% जमीन संपादित झाली असून उर्वरित जमिनीसाठी कार्यवाही सुरू आहे.
- देशातील सर्वात मोठा आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाचा ग्रीनफिल्ड विमानतळ, १८ गावांचे पुनर्वसन, सर्वात मोठे पुनर्वसन पॅकेज, अंदाजित खर्च १४,५७३ कोटी रुपये. आवश्यक सर्व परवानग्या प्राप्त. ❐ ❐




या अंकापासून केंद्रीय मंत्रिमंडळात असलेल्या महाराष्ट्राच्या मंत्र्यांचा परिचय आणि त्यांच्या विशेष मुलाखतीचे सदर सुरू करत आहोत. केंद्रीय रस्ते, महामार्ग, परिवहन व जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी यांचा परिचय व मुलाखत.

# कर्तृत्वातून लोकमान्यता

आपल्या कर्तृत्वातून समाजापुढे आदर्श निर्माण करायचा आणि नंतर लोकमान्यता प्राप्त करायची अशी कामाची पद्धत असणारे नितीन गडकरी महाराष्ट्रासह देशाच्या नकाशावर एक कर्तृत्वान व्यक्ती म्हणून ओळखले जातात. विद्यार्थी नेता ते केंद्रीय मंत्री असा चढता आलेख असलेले नितीन गडकरी यांनी आपल्या कर्तृत्वाची ओळख महाराष्ट्रासह देशाला करून दिली आहे. मुंबईमध्ये आज वाहतूक व्यवस्थेत जो दृश्य बदल झाला आहे, त्यामागे नितीन गडकरी यांनी तयार केलेले उड्डाणपूल आहेत. मुंबईसह महाराष्ट्रातील प्रमुख शहारातील वाहतूक कोंडी दूर करण्याचे काम नितीन गडकरी यांनी युतीच्या काळात (१९९५-१९९९) सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्रिपद असताना केले आहे. वरळी-बांद्रा सी लिंक प्रकल्पाचे काम त्यांनीच सुरू केले होते. सध्या देशाचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री म्हणून त्यांची घोडदौड सुरू आहे.



तीन लाखांवर मताधिक्याने नागपूरातून निवडून आलेले नितीन गडकरी यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वसमावेशकता ही त्यांच्या सर्वमान्य लोकमततातही दिसून येते. गरीब, दलित, कामगार, मजूर, विणकर अशा सान्या घटकांसाठी त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असतात. नितीन गडकरीचा स्वभाव त्यांच्या नागपुरी बाण्यासारखाच अघळपघळ व मनमोकळा आहे. त्यामुळे त्यांच्या गोतावळ्यात महाराष्ट्रासह देशभरातील वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गज कायम असतात. उद्योग व्यवसायाबद्दल हक्काने बोलणान्या या नेत्याने समर्थपणे उद्योग उभारले. आपल्या पाठीराख्यांना, कार्यकर्त्यांना उद्योगी बनविले आणि हजारो लोकांना रोजगार बहाल केला. त्यामुळे महाराष्ट्रात आणि विशेषत: विदर्भातील गावागावांतील जनता त्यांच्या कर्तृत्वावर आशा व्यक्त करते.

१९८९ पासून सलग पाचवेळा विधानपरिषदेवर ते निवडून गेले आहेत. राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री, संस्थापक-अध्यक्ष: महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक, मुंबई-तलासरी, मुंबई-सावंतवाडी या द्रुतगती रस्त्यांची निर्मिती आणि महाराष्ट्रातील सर्व गावांना बारमाही रस्त्यांना जोडण्यासाठी प्रयत्न करणारे नेते म्हणूनही त्यांची ओळख आहे. 'बीओटी' तत्त्वावरील प्रकल्पांची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांना जाते. त्यांनीच भारतीय रस्ते बांधकामात आंतरराष्ट्रीय प्रमाणकांचा अंगीकार करून विद्यमान पूल संहिता बदलविण्यास भाग पाडले. नक्षलग्रस्त भागात 'बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनच्या मार्फत रस्ते व पूल तयार करण्याचे श्रेयही त्यांना जाते. भारतीय जनता पक्षाच्या अग्रणी नेत्यांमध्ये त्यांची गणना असून २००९-२०१३ या काळात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांनी अतुलनीय कार्य केले आहे. दिल्लीतील एक दमदार नेते म्हणून अवघा महाराष्ट्र त्यांच्याकडे बघतो.

## परिचय

| | |
|---|---|
| पूर्ण नाव | : नितीन जयराम गडकरी |
| जन्म | : २७ मे १९५७ |
| जन्म ठिकाण | : नागपूर |
| शिक्षण | : एम. कॉम. एलएलबी. डीबीएम |
| ज्ञात भाषा | : मराठी, हिंदी व इंग्रजी |
| वैवाहिक माहिती | : विवाहित, पत्नी कांचन |
| अपत्ये | : दोन मुलगे, एक मुलगी |
| व्यवसाय | : शेती व व्यापार |
| मतदारसंघ | : नागपूर लोकसभा |

## राजकीय वाटचाल

- विद्यार्थी जीवनापासून सामाजिक व राजकीय कार्यास सुरुवात
- प्रारंभी विद्यार्थी नेता व उत्कृष्ट वक्ता ही ओळख
- संस्थापक - भारतीय जनता कामगार संघटना
- संस्थापक सदस्य: अंत्योदय हॅन्डलूम व हॅन्डिक्राफ्ट संस्था
- अध्यक्ष- नागपूर शहर भारतीय युवा मोर्चा
- सरचिटणीस: नागपूर शहर भारतीय जनता पक्ष
- १९८९-९० मध्ये विधानपरिषदेवर पहिल्यांदा निवड
- १९८९ पासून सलग पाचवेळा विधानपरिषदेवर निवड
- १९९५-९९ सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री
- संस्थापक अध्यक्ष - महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ
- मुंबई भूषण पुरस्कार प्राप्त
- ऑक्टोबर १९९९ ते जुलै २००२ व २० जुलै २००२ ते एप्रिल २००५ पर्यंत विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेता
- २००४-अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष
- डिसेंबर २००९ ते जानेवारी २०१३ भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष
- मे २०१४ मध्ये नागपूर मतदारसंघातून लोकसभेवर निवड
- २७ मे २०१४ पासून केंद्रीय रस्ते महामार्ग व जहाज बांधणी वाहतूक मंत्री म्हणून निवड

# देशाची वाहतूकव्यवस्था अधिक सक्षमतेकडे



**देशातील रस्ते वाहतूक, जल वाहतूक अधिकाधिक सक्षम करण्याचे ध्येय ठेवून विविध योजना कार्यान्वित करण्याचा निर्धार केंद्रीय रस्ते, महामार्ग, परिवहन व जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी केला. या अनुषंगाने व महाराष्ट्राच्या विकास प्रकल्पाबाबत त्यांची भूमिका जाणून घेण्यासाठी, ही विशेष मुलाखत खास लोकराज्यसाठी...**

**महाराष्ट्राच्या वेगवान विकासात तुमच्या अखत्यारीतील मंत्रालये कोणती भूमिका बजावणार आहेत?**

महाराष्ट्राला मुंबईपासून गोवा आणि मुंबईपासून गुजरातच्या सीमेपर्यंतचा समुद्रकिनारा लाभला आहे. जल वाहतूक मंत्रालयाच्या माध्यमातून समुद्र किनाऱ्याच्या या सीमावर्ती भागात शिप बिल्डिंग, शिप ब्रेकिंग, इनलँड वॉटरवेज, हॉवरक्राफ्टस्, सी प्लेनस् , वॉटर टर्मिनल्स उभे करणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग मंत्रालयाच्या माध्यमातून आम्ही मुंबई-गोवा चौपदरी रस्ता काँक्रिटचा करायचे ठरविले आहे. मुंबई-गोवा रस्त्यावर चौदा फ्लायओव्हर्सची कामे सुरू केली आहेत. मुंबईला एक रिंग रोड करावा अशी मागणी मुंबईच्या खासदारांनी माझ्याकडे केली आहे. समुद्राच्या आतून भुयारी रस्ता करण्याचा मानस असून त्याचा अभ्यास सध्या सुरू आहे. हा प्रकल्प ४० ते ५० हजार कोटींचा होईल. अमरावतीपासून सूरतपर्यंतचा रस्ता ८ हजार कोटी खर्चून सिमेंट काँक्रिटचा करणार आहे. त्याचबरोबर बोरखेडीपासून रत्नागिरीपर्यंत विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातून कोकणात जाणारा ८ ते ९ हजार किलोमीटरचा चौपदरी काँक्रिटचा रस्ता बांधायचे ठरविले आहे. तसेच देहू आणि आळंदीपासून पंढरपूरपर्यंतचे दोन पालखी मार्ग आठ हजार कोटी रुपये खर्चून निर्माण करण्याचे निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्राच्या विकासात केंद्राकडून पूर्ण ताकद लावून हे प्रकल्प कसे मार्गी लावता येतील, याचा प्रयत्न आहे.

माझ्याकडे वाहतूक विभागही आहे. आपल्याकडे देशातील एअरपोर्ट, सी-पोर्ट, वॉटरपोर्टच्या धर्तीवर आता बस पोर्ट तयार करायला आम्ही सुरुवात करणार आहोत. महाराष्ट्रात एस.टी. महामंडळाची मोठी बसस्थानके एअरपोर्टसारखी बनविण्यासाठी आम्ही विशेष कन्सल्टन्सी करणार आहोत. त्यासाठी लागणारा पैसा आम्ही खर्च करण्याची योजना तयार केली आहे. महाराष्ट्रातील सर्व एस. टी डेपो त्याचे डिझाईन तयार करणार आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे यापुढे आपला राज्य परिवहन विभाग बायो डिझेल, बायो गॅस आणि इथेनॉलवर चालवायचा आणि शहर बस वाहतूक विजेवर कशी चालविता येईल, यासाठी विशेष प्रयत्न करतो आहे. महाराष्ट्र निश्चितपणे बदलेल, महाराष्ट्राला केंद्राकडूनही भरीव मदत मिळेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाला जोरदार चालना मिळेल, असा माझा विश्वास आहे.

मुलाखत : सुनील चावके

**विदर्भाच्या इतिहासातील केंद्रातील सर्वात पॉवरफुल मंत्री म्हणून आपल्याकडे बघितले जात आहे. विदर्भाला आणि महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम आपण कराल अशी अपेक्षा आहे.**

विदर्भाच्या विकासासाठी पूर्ण ताकदीनिशी मी काम करणार आहे. विदर्भाचा विकास होणे ही माझ्यासाठी निश्चितपणे अतिशय महत्त्वाची

महाराष्ट्रात असलेल्या विद्यमान बंदरांमध्ये दोन ते तीन नव्या बंदरांची भर पडावी आणि त्यांची क्षमता वाढावी, असा विचार आहे. बंदरांना रेल्वेलाईनने जोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. शिवाय जेएनपीटीमध्ये आठ लेन्सचा रस्ता तयार करण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बंदरांमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा आणि क्षमता जेएनपीटी आणि अन्य बंदरांमध्ये उभ्या करण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी रॉटरडॅमला जाऊन मी तेथील सरकारच्या सहकार्याने अशाच सुविधा आपल्या बंदरांमध्ये उभ्या करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. कंटेनर आणि अन्य मालवाहतूक रेल्वे किंवा रस्त्यांपेक्षा इनलँड वॉटरवेजमधून व्हावी यासाठी बेल्जियमची एक पोर्ट कंपनी सहकार्य करते आहे. नजीकच्या काळात इराणमधील चाबा येथे आम्ही मोठे बंदर बांधण्याचा निर्णय घेतला आहे. ते बंदर मुंबईपासून जवळ आहे. मुंबई



ते दिल्ली या अंतरापेक्षा चाबा ते मुंबई हे अंतर कमी आहे. तिथे गॅस स्वस्त दरात मिळतो. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात केंद्र सरकारचा पूरक सहभाग राहणार आहे.

गोष्ट आहे . पण विदर्भाचा विकास होत असताना इतर महाराष्ट्रावर अन्याय होणार नाही. संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाच्या प्रश्नांना आम्ही न्याय देऊ. विदर्भाचाही विकास होईल आणि पश्चिम महाराष्ट्राचाही होईल. विकासाच्या बाबतीत कोणावर अन्याय करण्याचा आमचा मुळीच प्रयत्न नाही. सर्वांचाच विकास व्हावा असेच आमचे धोरण असेल.

**शेतकऱ्यांची आत्महत्या आणि झुडपी जंगलामुळे अडलेले प्रकल्प या विदर्भाच्या मोठ्या उणिवा ठरल्या आहेत?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सिंचन योजना जाहीर केली आहे. विदर्भात अनेक धरणे, यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्प किंवा गोसीखुर्द धरणाची कामे पूर्ण झाली आहेत, पण कालव्यांची कामे पूर्ण झालेली नाहीत. पंतप्रधानांनी असा विचार मांडला आहे की, राज्यांनी धरणे पूर्ण केली तर कालव्यांसाठी केंद्र सरकार पैसे देईल. त्यामुळे प्रधानमंत्री सिंचन योजनेमुळे विदर्भातील कालव्यांची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. गोसीखुर्द धरण प्रतिष्ठेचे आहे आणि मी स्वत: त्याचा पाठपुरावा करतो आहे. मला विश्वास आहे हे धरण लवकरच आम्ही पूर्ण करू. विदर्भातील कृषी पंपांना वीजपुरवठा होत नाही. याविषयी आपली मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा झाली आहे. विदर्भातील किमान पाच लाख पंपांना सौर ऊर्जेवर सुरू करण्याची योजना तयार करण्याचा मुख्यमंत्र्यांचा मानस आहे. केंद्र सरकार आणि ऊर्जा मंत्री पीयुष गोयल या योजनेसाठी मदत करतील अशी अपेक्षा आहे. ही योजना महाराष्ट्रासाठी झाली तर विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबण्यास मोठाच हातभार लागणार आहे. विदर्भात पाणी भरपूर झाले तर मोठा प्रश्न सुटणार आहे. धावणाऱ्या पाण्याला चालायला लावले पाहिजे, चालणाऱ्या पाण्याला थांबायला लावले पाहिजे आणि थांबलेल्या पाण्याला जमिनीला प्यायला लावले पाहिजे. त्यामुळे विदर्भात मोठ्या प्रमाणावर जल संवर्धनाचे काम आम्ही हाती घेतले आहे. मालगुजारी तलाव आता मनरेगामध्ये साफ करता येणार आहेत. असे अनेक प्रकारचे निर्णय आम्ही घेतले आहेत, या सर्व निर्णयांचा फायदा महाराष्ट्राच्या विकासात निश्चितपणे होईल.

**देशात महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर आहे का याविषयी शंका निर्माण झाल्या आहेत. महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर ठेवण्याची जबाबदारी आता तुमच्या सरकारवर आली आहे.?**

कोण काय म्हणतो यापेक्षा आकडेवारीच सत्य बोलत असते. मध्य प्रदेशचा कृषी विकासाचा दर २४ टक्के आहे आणि महाराष्ट्राचा चार टक्के आहे. केंद्रातील कृषी मंत्री महाराष्ट्राचे होते आणि आज महाराष्ट्र कृषी क्षेत्रात कुठे गेला? मुंबई देशाची व्यावसायिक राजधानी होती. पण जवळपास मुंबईतील सर्व कामकाज बंद पडत चालले आहे. उद्योग बंद पडत चालले आहेत. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या सर्व स्थितीमध्ये महाराष्ट्राचे चित्र बदलविणे आणि पुन्हा एकदा महाराष्ट्राला देशात अव्वल क्रमांकावर पोहोचविणे ही महाराष्ट्राच्या नेतृत्वाची आणि महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांची जबाबदारी आहे. पुण्यात आणि मुंबईतही मेट्रोचा विकास करण्याचे काम आम्ही हाती घेतले आहे. दिल्लीत महाराष्ट्राशी संबंधित पर्यावरण आणि वन खात्याच्यासंबंधात अनेक चांगले निर्णय घेण्यात आलेले आहेत. मुंबई आणि महाराष्ट्रातील रेल्वेच्या प्रश्नांच्या बाबतीत आम्ही रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांच्याशी लवकरच चर्चा करणार आहोत. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास व्हावा, केंद्राकडूनही मदत मिळावी व कार्यक्रम हाती घेतले जावे आणि त्याचबरोबर

**विदर्भातील महत्त्वाचा प्रकल्प मिहान प्रकल्प आहे. तो लवकरच मार्गी लागणार आहे. नागपूर ते गडचिरोली, देवरी ते गडचिरोली जिल्ह्यातील रस्ता, गडचिरोली जिल्ह्यातील नागभीडपासूनचा रेल्वेमार्ग, भिशीपासून चिमूर आणि वरोरा यापर्यंतचा राष्ट्रीय महामार्ग असे अनेक निर्णय घेतले आहेत. विदर्भात पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणावर सहकार्य मिळेल अशी अपेक्षा आहे. या सर्वांचा उपयोग करून विदर्भाला विकासाभिमुख कसे करता येईल, असा प्रयत्न आहे. केंद्र सरकारने अडीच हजार कोटी रुपये खर्च करून एम्सची निर्मिती करण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात आयआयटी स्थापन करण्याची घोषणा केली आहे. नागपुरात नऊ हजार कोटी रुपये खर्चून मेट्रो प्रकल्प राबवण्यात येणार आहे.**



## ॲक्शन प्लॅन

- चालू वर्षात ८५०० कि.मी. महामार्ग निर्मितीचे कंत्राट देण्याचे उद्दिष्ट. ७ महिन्यांत ३४१९ कि.मी.चे कंत्राट बहाल
- ६३०० कि.मी. रस्ते निर्मितीचे उद्दिष्ट. आतापर्यंत १९८४ कि.मी. रस्ते तयार
- २ वर्षांत ३० कि.मी. प्रतिदिवस रस्तेनिर्मितीचे उद्दिष्ट
- नवीन पुलांच्या निर्मितीमध्ये जलसिंचनासाठी बंधाऱ्यांची निर्मिती
- पर्यावरण रक्षणासाठी लोहनिर्मिती कारखान्यात तयार होणाऱ्या व टाकाऊ आयर्न स्लॅगचा दगडाऐवजी वापर
- १२३ जिल्हा ठिकाणे महामार्गांना जोडणार
- दर्जेदार आणि दीर्घ काळ टिकणाऱ्या रस्त्यांसाठी सिमेंट रस्त्यांवर भर देणार
- जम्मू-कश्मीर, ईशान्यकडील राज्यातील रस्ते निर्मितीला प्राधान्य
- पायाभूत सुविधा निर्मितीकडे नव्या सरकारचे अधिक लक्ष
- वेगवेगळ्या खात्यातील मंत्रालयाशी सुलभ समन्वयाची नीती तयार
- १ लक्ष ७९ हजार १४९ कोटी रुपयांच्या प्रकल्पातून २० हजार ८११ कि.मी. लांबीच्या महामार्गाची निर्मिती प्रस्तावित
- बंदरांच्या विकासासाठी २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक
- रेल्वे-बंदर माल वाहतुकीसाठी नव्या कंपनीचा प्रस्ताव
- नद्यांद्वारे देशांतर्गत जलवाहतुकीसाठी २३ हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव
- खासगी सहभागातून ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक उभारण्यासाठी प्रयत्न
- गंगा नदीमध्ये हल्दीया ते अलाहाबाद जलमार्ग व्यावसायिक वापरास सुरुवात.



**नागपूर मेट्रो प्रकल्पाचा शिलान्यास करताना.**

महाराष्ट्र शासनाने गतिशील निर्णय घ्यावे, असा आम्हा सर्वांचा प्रयत्न आहे. विकासाचे राजकारण हेच आमच्या सरकारांचे वैशिष्ट्य राहणार आहे.

**महाराष्ट्रातील भाजप सरकारच्या स्थैर्यावर प्रश्नचिन्ह लागले आहे. आपण या राजकीय अस्थिरतेकडे कसे बघता?**

महाराष्ट्रात स्थिर सरकार राहणार आहे. कोणीही चिंता करण्याचे कारण नाही. मला पूर्ण विश्वास आहे की देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला स्थिर सरकार मिळेल.

**आपण सांसद ग्रामयोजनेत नागपूर जिल्ह्यातील पाचगाव दत्तक घेतले आहे. त्याचा विकास कशा पद्धतीने करायचा विचार आहे?**

पाचगावमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, रस्ते, स्वच्छता अभियान, गावात चांगली शाळा हे सर्व करणारच आहे. पण निव्वळ भौतिक विकास हेच ध्येय असू शकत नाही. भौतिक विकासाबरोबर ते गाव व्यसनमुक्त झाले पाहिजे, गावात समाजमंदिर असले पाहिजे, महिला बचतगटांना मार्गदर्शन झाले पाहिजे, सांस्कृतिक कार्यक्रम झाले पाहिजेत, व्यायामशाळा, योगप्रसाराचे काम झाले पाहिजे, डिजिटल ग्रंथालय झाले पाहिजे, वाचनालय उत्तम असले पाहिजे, शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे मार्गदर्शन झाले पाहिजे, कचऱ्यापासून गॅस तयार करता येईल. घराघरात पाईपलाईनने गॅस कसा देता येईल, अशा अभिनव योजना डोक्यात ठेवून त्या गावात काम करण्याचे ठरविले आहे. त्या गावात ऑप्टिक फायबर केबल गेले आहे. त्यामुळे घराघरात संगणकही पोहोचणार आहे. त्यामुळे गावात ई-गव्हर्नन्सची सुरुवात होईल. ग्रामपंचायतीला संगणक देऊन गावाच्या सर्व रेकॉर्डचे संगणकीकरण करण्याचे ठरविले आहे. सर्वांगीण विकास आणि महाराष्ट्रातील ते एक चांगले आदर्श गाव होऊ शकते.

**दिल्लीत मंत्री असल्यामुळे महाराष्ट्राला आपल्याकडून बऱ्याच अपेक्षा आहेत. दिल्लीतील महाराष्ट्राच्या हक्काचे सत्ताकेंद्र म्हणून नितीन गडकरींकडे बघितले जाते!**

दिल्लीत मी महाराष्ट्राचा प्रतिनिधीच नाही तर ॲम्बेसेडर आहे. महाराष्ट्राचा ॲम्बेसेडर म्हणून मी स्वत: दिल्लीत केंद्राच्या सर्व विभागांशी समन्वय साधण्याचे प्रयत्न करीन. केंद्रातील सर्व मंत्र्यांसोबत सहकार्य करून महाराष्ट्राचा झपाट्याने विकास करण्याचा आमचा प्रयत्न असेल. मुंबईच्या रेल्वे प्रश्नावर सर्वांनी तातडीने एकत्र बसून मार्ग काढायचे असे आम्ही ठरविले आहे. दिल्लीत जिथे जिथे महाराष्ट्राचे प्रश्न अडणार असतील, समस्या उद्भवणार असतील त्या सर्व सोडविण्याचा मी पूर्ण शक्तीनिशी प्रयत्न करीन, असा विश्वास मी महाराष्ट्राच्या जनतेला देऊ इच्छितो.

**हाती घेतलेली कामे वेळेत पूर्ण झाली नाही तर ती रखडतात याचा अनुभव आपल्या पूर्वीच्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात आला होता. या अनुभवातून त्यावर कशी मात करणार?**

माझ्या मंत्रालयांनी हाती घेतलेले प्रकल्प वेळेत पूर्ण केल्याशिवाय राहणार नाही, असा माझा पूर्ण प्रयत्न असेल. माझी आजवरची कामगिरी अशी राहिली आहे की, मी जे बोललो आणि सांगितले, ते मी शंभर टक्के पूर्णत्वाला नेले आहे. जे बोललो त्यापेक्षा ३०-४० टक्के जास्तच काम केले आहे. एखादे काम होण्यासारखे नसेल तर मी मोकळेपणाने, स्पष्टपणे सांगतो की हे होणार नाही, शक्य नाही, कठीण आहे. काही बाबतीत सांगेनही मी काम करण्याचा प्रयत्न करेन. पण ज्या कामाबाबत मी बोलतो की, हे काम ठरल्या दिवसात करेन, ते मी पूर्ण केले आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे असेल, फ्लायओव्हर्स असेल, कुठलेही मोठे काम असेल, मी आग्रही असतो. कामाचा पाठपुरावा करतो, रात्रंदिवस त्याच्या मागे असतो. मी जे बोललो ते केले, असा ट्रॅक रेकॉर्ड बनवला आहे. मला विकासाच्या कामांची आवड आहे. माझी मानसिकताही तशीच बनली आहे. मी कामांच्या मागे अस्वस्थ असतो. पुढची पंचेवीस वर्षे विकासासाठी कशी देता येईल याचाच विचार करीत असतो.

**(लेखक नवी दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार असून, महाराष्ट्र टाइम्सचे साहाय्यक संपादक या पदावर नवी दिल्लीत कार्यरत आहेत.)**
**संपर्क : ०९८६८०९२९४८**

# करारी नेतृत्व

हाडाचा शेतकरी, तळमळीचा कार्यकर्ता, समाजकारणी, अजातशत्रू नेता आणि राजकारणातील सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व अशी हरिभाऊ बागडे यांची ओळख. या गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांची विधानसभाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यापासूनचे ते १५वे विधानसभा अध्यक्ष आहेत. व्यक्ती म्हणून विचार केला तर या पदाच्या खुर्चीवर बसणारे ते १४वे अध्यक्ष आहेत.

१९९५-९७ दरम्यान पाथर्डी येथील सहकारी साखर कारखान्याचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले. १९७२-७३ च्या दुष्काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दुष्काळ विमोचन समितीचे कार्यवाह म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. खडी केंद्र व रोजगार हमी योजनेवरील मजुरांना सोयी सवलती मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील ७०० जनावरांसाठी बुलडाणा जिल्ह्यात छावण्या उभ्या केल्या.



धोतर, पांढरा खादीचा सदरा आणि गांधी टोपी असा त्यांचा साधा पेहराव. कुणावरही जहरी टीका करणे किंवा अगदी टोकाची भूमिका घेणे त्यांच्या स्वभावात नाही. ग्रामीण भागातील प्रश्नांची त्यांना उत्तम जाण आहे. आमदार निधी कोणत्या विकास कामावर खर्च करावा यासाठी त्यांनी स्वत:च आचारसंहिता आखून घेतली. नातलगांना कामाची कंत्राटे द्यायची नाहीत हे प्रारंभापासून ठरवले. मतदारसंघात पाचशेहून अधिक पाझर तलावांची निर्मिती करून जलसंवर्धनाला प्राधान्य देण्याचे धोरण त्यांनी अवलंबिले. सहकार क्षेत्रात त्यांनी पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून काम केले. जिल्हा सहकारी बँकेत इतर पक्षांना सोबत घेतले. तोट्यातील जिल्हा दूध संघ नफ्यात आणण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली.

बागडे हे पाचव्यांदा विधानसभेवर निवडून आले आहेत. युती शासनाच्या काळात ते कॅबिनेट मंत्री होते. सहकार व विविध सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. समाजकारण आणि राजकारण करताना विविध आघाड्यांवर त्यांच्या नेतृत्वाचा ठसा उमटला. पं. दिनदयाळ उपाध्याय शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष, ऊसतोड कामगारांच्या आंदोलनाचे नेतृत्व केले. शासनाने दादासाहेब रुपवते यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या ऊसतोड कामगारांच्या अभ्यास समितीचे ते सदस्य होते.

औरंगाबादेत सिंचन आणि सहकार क्षेत्रात त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. मतदारसंघात छत्रपती संभाजी हा साखर कारखाना आणि जिल्हा दूधसंघाची धुरा त्यांनी सांभाळतानाच देवगिरी सहकारी नागरी बँकेला नवी उभारी दिली. देवगिरी बँकेची अवस्था २००६ मध्ये बिकट होती. तेव्हा त्यांनी निवडणुकीच्या माध्यमातून बँकेच्या व्यवस्थापनात प्रवेश केला. परिवारातील थकबाकीदारांना कर्ज परत करण्यासाठी सक्ती केली अन् काही दिवसांतच बँकेचे रूपडे बदलले. बँकेच्या माध्यमातून शिरपूर पॅटर्नचे बंधारे बांधण्याचे कामही दुष्काळी परिस्थितीत त्यांनी केले. आता विधानसभा अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडताना सभागृहातील कामकाज सुरळीत चालेल व आपल्या अध्यक्षतेखाली विविध कायदे व धोरणात्मक निर्णय वेगाने होतील असा त्यांना विश्वास आहे.

❑❑



## परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | हरिभाऊ किसनराव बागडे |
| जन्म | : | १७ ऑगस्ट १९४५ |
| जन्म ठिकाण | : | चित्ते-पिंपळगाव (ता. औरंगाबाद) |
| शिक्षण | : | दहावी |
| ज्ञात भाषा | : | मराठी व हिंदी |
| वैवाहिक माहिती | : | पत्नी द्वारका |
| अपत्ये | : | दोन मुली |
| व्यवसाय | : | शेती |
| मतदारसंघ | : | १०६ - फुलंब्री |

## राजकीय वाटचाल

- १९५८ पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम सुरू
- १९६७ ते १९७२ जनसंघाचे जिल्हा पातळीवर पूर्णवेळ काम.
- १९८१ देवगिरी नागरी सहकारी बँकेची स्थापना
- १९८५ ते १९९९ सलग चार वेळेस आमदार.
- १९९५ ते १९९७ रोहयो व फलोत्पादनमंत्री.
- १९९७ ते १९९९ अन्न व नागरी पुरवठामंत्री.
- १९९५ ते १९९९ जालना जिल्हा पालकमंत्री.
- भाजपचे प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.
- २०१४ मध्ये पुन्हा विधानसभेवर निवडून येत विधानसभाध्यक्षपदी बिनविरोध निवड.

# आर्थिक शिस्तीला प्राधान्य

**दमदार आणि कर्तृत्ववान, आक्रमक पण तेवढेच प्रेमळ आणि विनयशील असलेले सुधीर मुनगंटीवार राज्याच्या वित्त व नियोजन मंत्रिपदाची धुरा सांभाळत आहेत. गेली वीस वर्षे विधानसभेत संसदीय कारकिर्द गाजवताना महाराष्ट्राने या नेत्याचा विविध विषयांचा सखोल अभ्यास आणि समस्यांचा घेतलेला पाठपुरावा पाहिला. राज्यावर असलेला कर्जाचा डोंगर कमी होणार नसला तरी अनावश्यक खर्चाला कात्री लावत महसूल वाढवण्यावर त्यांनी भर दिला आहे.**



मुलाखत : मनोज भोयर

**अर्थमंत्री म्हणून राज्य सांभाळताना तुमच्यासमोर पहिले आव्हान कोणते आहे?**

राज्याच्या तिजोरीचा प्रवास मला खडखडाटाकडून खणखणाटाकडे न्यायचा आहे. हे काम खूपच कठीण असल्याची कल्पना मला आहे, पण हे आव्हान मी स्वीकारले आहे. राज्यावर सध्या ३ लक्ष ४४० कोटी रुपयाचे कर्ज आहे. २३ हजार कोटी रुपये दरवर्षी सरकारला व्याज भरावे लागते. हे व्याज भरायला दरवर्षी सरकारला २० हजार कोटी रुपयांचे कर्ज काढायला लागते. इतकी बिकट स्थिती आहे. याच काळात सुजलाम सुफलाम महाराष्ट्र करण्यासाठी श्वेतपत्रिका काढायची गरज आहे. प्रत्येक खात्यात पैशाचा योग्य उपयोग होतो आहे किंवा नाही, हे पाहायचे आहे. खर्चातून काही उत्पादकता निर्माण होते आहे का? रोजगार निर्माण होतो आहे का? नाहीतर योजनांचा पुनर्विचार करून प्रत्येक खात्याला अर्थपुरवठा करावा लागेल. श्वेतपत्रिकेतून नेमके कळेल की गळती कोठे होत आहे. एक नवी दृष्टी अर्थखात्याला मिळेल, अशी मला अपेक्षा आहे. करचुकवेगिरी बंद करता येईल. शेतकरी, व्यापारी, उद्योजक यांना अनुकूल वातावरण तयार करून राज्याचा विकास कसा करता येईल आणि त्यांना जाचक नियमांना समोरे जावे लागणार नाही. यासाठी काही कठोर पावले उचलण्याचे आव्हान आमच्यासमोर आहे. राज्याची तिजोरी भरणाऱ्या विभागात उदा. विक्रीकर विभाग, मुद्रांक विभागात उत्साहाचे वातावरण तयार केले जाईल. आवश्यक तिथे संगणकीकरण करू. केंद्राच्या योजनांचा पाठपुरावा करणार आहोत. कर्मचाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा निर्माण करणार आहोत. १ एप्रिलपासून राज्याची तिजोरी भरणाऱ्या

- राज्यासमोरचा सर्वात मोठा प्रश्न आहे तो वित्तीय तुटीचा. त्यामुळे ती कमी करण्यासाठी प्रत्येक खात्यात पैशाचा योग्य उपयोग होतो आहे किंवा नाही हे पाहायचे, गरज असेल तिथे योजनांचा पुनर्विचार केला जाईल.
- राज्यावर सध्या ३ लक्ष ४४० कोटी रुपयाचे कर्ज आहे. २३ हजार कोटी रुपये दरवर्षी सरकारला व्याज भरावे लागते. हे व्याज भरायला दरवर्षी सरकारला २० हजार कोटी रुपयांचे कर्ज काढायला लागते. त्यामुळे राज्याची तिजोरी भरणाऱ्या विभागात उदा. विक्रीकर विभाग, मुद्रांक विभागात उत्साहाचे वातावरण तयार केले जाईल.
- श्वेतपत्रिकेतून नेमके कळेल की, गळती कोठे होते आहे. एक नवी दृष्टी अर्थखात्याला मिळेल. करचुकवेगिरी बंद करता येईल.
- रोजगारनिर्मिती आणि सकल उत्पादन वाढविणे ही आमची प्राथमिकता आहे. त्यामुळे लवकरच प्रत्येक विभागाचा आढावा घेणार आहोत.
- एलबीटी रद्द करायचा आहे. मात्र राज्याच्या तिजोरीवर त्याचा ताण पडू नये यासाठी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांना विनंती केली आहे की जीएसटी (गुड्स अ‍ॅण्ड सर्व्हिस टॅक्स)च्या कायद्यात आम्हाला नुकसान भरपाई द्यावी.

विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बक्षीस योजना लागू करणार आहोत. सर्वांना प्रोत्साहन मिळावे हा हेतू आहे.

**अनेक विभागातून उत्पादन म्हणजे महसूल मिळत नाही पण तिथला खर्च भरपूर असतो. अशा अनुत्पादक विभागांवर आपण अंकुश कसा लावणार?**

आमच्या समोर हे खरेच आव्हान आहे. अनुत्पादक खर्च हा उत्पादक खर्चापेक्षा जास्त आहे. जेव्हा एखाद्या राज्याच्या तिजोरीतला उत्पादक खर्च वाढतो तेव्हा रोजगारनिर्मिती मंद होते. ती झाली की राज्याच्या सकल उत्पादनाचे मार्ग कमी होतात. रोजगारनिर्मिती आणि सकल उत्पादन वाढविणे ही आमची प्राथमिकता आहे. त्यामुळे लवकरच प्रत्येक विभागाचा आढावा घेणार आहोत.

**अर्थखात्याला उभारी देण्यासाठी कोणते नियोजन करणार?**

साधारणत: नियोजन विभाग ज्या पद्धतीचे नियोजन करतो, तेवढा वित्तपुरवठा वित्त विभाग कधीच करत नाही. याला अनेक कारणे आहेत. आम्हाला अर्थसंकल्प करत असताना योग्य पद्धतीचे नियोजन करायचे आहे. नियोजनासोबतच आम्हाला ज्या विषयात राज्याला पुढे न्यायचे आहे, त्या विभागाला मी स्वत: पाच वर्षाची हमी देणार आहे. त्याची तरतूद अर्थसंकल्पात केली जाईल. पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात आम्ही खूपच मागे पडलो आहोत. राज्याची लोकसंख्या आणि पायाभूत सुविधांवर पडणारा ताण लक्षात घेता कर्ज काढावे लागणार आहे. कर्ज काढणे गैर नाही पण त्या कर्जाचा वापर योग्य पद्धतीने व्हायला पाहिजे. आतापर्यंत जे कर्ज काढले गेले ते नियमानुसारच आहे. पण त्याचा उपयोग राज्याची संपत्ती वाढवायला झाला पाहिजे. त्यासाठी वित्त आणि नियोजन खात्यात समन्वय असला पाहिजे. हा ताळमेळ आम्ही बसवणार आहोत. कर्ज आणि नंतरचा खर्च यात घोळ झाला आहे तो यापुढे होणार नाही. राज्यातल्या छोट्याश्या क्षेत्रातही उत्पन्न कसे वाढवता येईल, त्यातून महसूल कसा वाढेल यावर भर देणार आहोत.

**नगरपरिषदांमधून १५ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळतो. त्यामुळे एलबीटीला दुसरा काय पर्याय आहे ?**

हा कर तर रद्द करायचा आहे. मात्र राज्याच्या तिजोरीवर त्याचा ताण पडू नये यासाठी केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांना विनंती केली आहे की जीएसटी कायद्यात आम्हाला नुकसान भरपाई द्यावी. ही नुकसान भरपाई तीन वर्षासाठी न देता दहा वर्षासाठी द्यावी. देशभरातील अर्थमंत्र्याच्या परिषदेत मी ही विनंती केली होती.



**राज्यासमोर मोठे आर्थिक संकट आहे, त्यामुळे सरकारला पुन्हा एकदा मोठी आर्थिक तरतूद लवकरच करावी लागणार आहे का?**

**सरकार शेतकऱ्यांच्या सोबत आहे. कर्ज काढून त्यांना मदत करू. हे राज्य त्यांचे आहे. मात्र एक खंत माझ्या मनात आहे की, शेतकऱ्यांसाठी जे करायला पाहिजे होते, ते अनेक वर्षात करण्यात न आल्याने त्यांच्या मागचे दुष्टचक्र संपत नाही. राज्यातला शेतकरी संकटातही उभा आहे. मला त्याचा अभिमान आहे. उत्तरप्रदेशात ४४ टक्के सिंचन आहे. पंजाब, गुजरातमध्ये ६५ टक्के सिंचन आहे. तिथल्या कापूस उत्पादकांना खूप फायदा होतो आहे. महाराष्ट्रात कापूस शेतकऱ्याला केवळ २ टक्केच सिंचन उपलब्ध आहे. याचा आम्ही कधी विचार करणार आहोत? वीज चोवीस तास नाही, लवकर कृषी पंपाचं कनेक्शन देत नाही. ४५० सिंचन प्रकल्पापैकी २२५ प्रकल्प आम्ही पाच वर्षात पूर्ण करू. कमीतकमी शेतात ओलावा निर्माण करणाऱ्या योजना लागू करू. त्यासाठी अर्थविभाग निधी अपुरा पडू देणार नाही. जर शेतीची उत्पादकता वाढविली नाही तर त्यांचे आयुष्य सुधारणार कसे? मध्यप्रदेशाचा कृषी विकास दर २४ टक्के आहे. सिंचनासोबत ओलावा निर्माण करणाऱ्या योजना शेतीसाठी लागू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे उत्पादकता वाढली आहे.**

**जंगलातील श्वापदांचे माणसांवर होणारे हल्ले वाढले आहेत, खासकरून मुंबईत. यावर कायमस्वरूपी काही उपाय आहेत का?**

आम्हाला शहरीकरणाचा फटका बसला आहे. प्राण्यांचे हल्ले आणि त्यांच्या होणाऱ्या हत्या हे दोन्ही मुद्दे गंभीर आहेत. सौरकुंपण लावण्याच्या प्रयोगाला यश आले नाही. पैशाचा चुराडा झाला. वन्यप्राणी शहरात येऊ नये यासाठी जंगलक्षेत्र वाढविणे हा मोठा उपाय आहे. ३३ टक्के वनआच्छादन असायला पाहिजे. आता १९:५८ असे प्रमाण आहे. वन आच्छादन जर राहिले नाही तर अनेक प्रश्नांना समाजाला सामोरे जावे लागेल. यावर जागतिक व्यासपीठावर चर्चा होत आहे. अनेक समित्यांचे अहवाल आमच्या खात्याकडे आले आहेत. त्याचाही अभ्यास सुरू आहे. अनेक ठिकाणी धरणे बांधण्यासाठी जंगलांची कत्तल होते. त्यासाठी मोबदलाही मिळतो पण तितकेच जंगल परत निर्माण केले जात नाही. यासाठी लोकसहभाग वाढवण्यावर आम्ही भर देऊ.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार असून, अनेक वृत्तपत्रांसाठी व वृत्त वाहिन्यांसाठी काम करत आहेत. संपर्क : ९८२०००८७३०)**

# टंचाईग्रस्तांसाठी ठोस कृती

सध्या मराठवाड्यातील ८ हजार ५३६ गावापैकी ८ हजार ४ गावांची आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी आली आहे. काही भागात शेतकऱ्यांनी त्यांचे जीवन संपवण्याच्या घटना घडल्या. सलग तीन वर्षाच्या पावसाच्या कमी सरासरीमुळे शेतकरीवर्ग अडचणीत आला आहे. खरिपाच्या पेरण्या काही ठिकाणी लांबल्या तर काही ठिकाणी रखडल्या. जेथे पेरणी झाली, तेथील पाण्याअभावी पीक करपले. अपुरा पाऊस, अवेळी पाऊस अशी परिस्थिती मराठवाड्यात अनेक ठिकाणी सातत्याने दिसत आहे. अशा परिस्थितीत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आधार देत त्यांना मदतीतून उभारी देण्याची सकारात्मक मानसिकता राज्य शासनाने दाखविली आहे.

मराठवाड्यात गेल्या वर्षी केवळ ५३ टक्के पाऊस झाला आहे. लहान मोठ्या धरणात केवळ सरासरी ३२ टक्क्यांच्या आसपास पाणीसाठा शिल्लक आहे. जायकवाडी, येलदरी, सिद्धेश्वर, निम्न मनार, विष्णुपुरी अशा महत्वाच्या धरणांत अल्पसा साठा आहे तर निम्न तेरणा, माजलगाव आणि मांजरा धरणातील पाणीसाठा अत्यल्प आहे. रब्बीच्या

**मराठवाडा व विदर्भातील टंचाईग्रस्त भागातील परिस्थिती जाणून घेण्यासाठी महसूल व कृषी मंत्री एकनाथराव खडसे आणि ग्रामविकास व जलसंधारण मंत्री पंकजा मुंडे-पालवे यांनी हा परिसर अक्षरश: पिंजून काढला. त्यांच्या १५ दिवसातल्या या दौऱ्याच्या आधारावर केलेला अहवाल मंत्रिमंडळाच्या बैठकीत नुकताच सादर करण्यात आला. या अहवालावरून ४ हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव दुष्काळ निवारण्यासाठी केंद्राकडे पाठवण्याचा निर्णय राज्यमंत्रिमंडळाने घेतला.**

**दीपक चव्हाण**

पेरणीवेळी ऐनवेळी पावसाने मारलेल्या दडीने शेतकरी चिंतेत आहे.

अशा परिस्थितीत महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी मराठवाड्यातील नांदेड, जालना, औरंगाबाद, परभणी, बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यांचा दौरा केला. ग्रामविकास व जलसंधारणमंत्री पंकजा मुंडे यांनीही काही जिल्ह्यांना भेटी दिल्या. प्रशासनाकडून संपूर्ण परिस्थिती समजावून घेतली. तसेच टंचाई उपाययोजनांची माहितीही घेतली. सध्या मराठवाड्याला टंचाईसंदर्भात जाणवणारे प्रश्न, त्यांची सोडवणूक करण्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांची उपलब्धता याविषयी त्यांनी माहिती घेतली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची खडसे यांना सखोल जाण असल्याने केवळ तात्पुरती मलमपट्टी नव्हे तर कायमस्वरूपी उपाययोजनांच्या दृष्टीने काय करता येईल, या दृष्टीने त्यांनी विचारविनिमय केला. बैठकीत अधिकारी-पदाधिकाऱ्यांशी बोलताना खडसे यांनी शेतकऱ्यांना सातत्याने भेडसावणाऱ्या प्रश्नांविषयी विचारणा केली. वीजपुरवठा, पीककर्ज अशा शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत शेतकऱ्यांची बाजूही



**बाभुळगाव येथील सुधाकर माधवराव मोरे या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांचे सांत्वन करताना महसूलमंत्री एकनाथराव खडसे.**

## दुष्काळ निवारणासाठी केंद्राकडे चार हजार कोटींचा प्रस्ताव

**राज्यातील मराठवाडा व अन्य भागात दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे पीक आणि फळबागांचे झालेले नुकसान पाहता त्यांना मदतीसाठी चार हजार कोटी रूपये निधी मागण्याचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाने नुकताच मंजूर केला. सर्व विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या अहवालांचे अवलोकन केल्यानंतर शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी चार हजार कोटी रूपये केंद्राकडे मागण्याचा निर्णय घेण्यात आला.**

- ३४,१०,३३६ हेक्टर कोरडवाहू अल्पभूधारक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी चार हजार ५०० रुपये मदत देण्यासाठी दोन हजार ३३० कोटी ५० लाख रुपयांची मागणी.
- २,७७,१७८ हेक्टर बागायती अल्पभूधारकांना प्रति हेक्टरी ९ हजार रुपये मदत देण्यासाठी ३६२ कोटी २९ लाख रुपयांची मागणी.
- ८६,०६४ हेक्टरवरील बहुवर्षी फळपिके घेणाऱ्या अल्पभूधारकांना प्रति हेक्टरी १२ हजार ५०० रुपये मदत देण्यासाठी १९९ कोटी ९० लाख रूपयांची मागणी.
- १४,७०,६५५ हेक्टर क्षेत्रावरील कोरडवाहू बहूभूधारकांच्या नुकसान भरपाईसाठी ७०८ कोटी ४७ लाख रुपयांची मागणी.
- ५८,५४० हेक्टर क्षेत्रावरील बागायत बहूभूधारक शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी २४८ कोटी ९३ लाख रुपयांची मागणी.
- ४४,११७ हेक्टर क्षेत्रावरील बहुवर्षीय फळपिके घेणाऱ्या बहूभूधारकांना नुकसान भरपाई देण्यासाठी ७४ कोटी ७५ लाख रुपयांची मागणी.
- केंद्र सरकारच्या निकषांप्रमाणे सर्व प्रकारच्या भूधारकांना देण्यात येणारी मदत जास्तीतजास्त दोन हेक्टर मर्यादेत असेल.



**मांडवा (ता. वाशी) येथील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाचे सांत्वन करताना ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे-पालवे**

खडसे यांनी प्रशासनाच्या लक्षात आणून दिली आणि त्या दृष्टीने कार्यवाहीचे आदेशही दिले. प्रत्येक जिल्ह्यात याबाबतच्या बैठकीपूर्वी विविध पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी जिल्ह्यातील स्थानिक प्रश्नांबाबत चर्चा केली. त्यानंतर त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात प्रशासनाने केलेल्या टंचाई उपाययोजनांचा आढावा घेतला. जालना येथे त्यांनी पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना पाणीटंचाईसंदर्भात कृती आराखडा तयार करणार असल्याचे सांगितले. पाणीटंचाई, चाराटंचाई आणि विविध टंचाईसंदर्भातील उपाययोजनांचा त्यांनी आढावा घेतला.

राज्यात काही महिन्यापूर्वी गारपिटीने शेतकऱ्यांची द्राक्षे, मोसंबी, संत्री व इतर फळबागांचे नुकसान झाले होते. त्यासाठी शासनाने ५८३ कोटी रुपये मंजूर केले असून कमीत कमी २ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रात नुकसान झालेल्या फळबागांसाठी शेतकऱ्यांना हेक्टरी ३५ हजार रुपये भरपाई देणार असल्याचे सांगितले. प्रत्येक जिल्ह्यात त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी व सदस्य यांना या टंचाई परिस्थितीसंदर्भात सविस्तर भूमिका मांडण्यास सांगितले.

उस्मानाबाद जिल्हा दौऱ्यात त्यांनी विविध संस्था-संघटना, पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन परिस्थिती जाणून घेतली. दुसऱ्या दिवशी त्यांनी राज्यातील ई-मोजणी उपक्रमाच्या आरंभासाठी सकनेवाडी (ता. उस्मानाबाद) येथे भेट दिली. त्यात टंचाई परिस्थितीत वीज न तोडण्याचे तसेच विंधन विहिरींची पाणी पातळी खोल गेलेल्या ठिकाणी जिल्हा परिषदेमार्फत सिंगल फेज वीज पुरवून वीज पंप बसविण्याचे दिलेले आदेशांमधून ते प्रकर्षाने जाणवले.

### विद्यार्थ्यांना दिलासा

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांसह विदर्भातील अकोला आणि बुलडाणा या ठिकाणीही मंत्र्यांनी दौरा केला. अकोल्यामध्ये बोलताना खडसे यांनी टंचाईग्रस्त भागातील ११ व १२ वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात येईल, आठ तास दिवसा अखंडित वीज देण्यात यईल, अशी घोषणा केली. तर बुलडाणा जिल्ह्यात तात्पुरत्या स्वरूपातील कंत्राटी कामांबाबत सरकार गंभीरतेने विचार करेल, असे सांगितले.

जिल्हास्तरावरील यंत्रणांना अधिक वेगाने कार्यान्वित करायची असेल तर प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊनच आढावा घेतला पाहिजे, ही भूमिका घेऊन खडसे आणि श्रीमती मुंडे यांनी मराठवाड्यातील प्रशासकीय यंत्रणांशी संवाद साधला. प्रशासन गतिमान होण्याच्या दिशेने आणि टंचाई परिस्थितीत शेतकऱ्यांसाठी काहीतरी ठोस कार्यवाही करण्याच्या दृष्टीने हे दौरे उपयुक्त ठरले आहेत. लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील कोनाळी गावच्या बालाजी बिरादार आणि औसा तालुक्यातील महादेव गरड या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची खडसे यांनी तर उस्मानाबाद जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील चिमाजी पांढरे यांच्या कुटुंबीयांची श्रीमती मुंडे यांनी भेट घेतली. शासन तुमच्या पाठीशी आहे, असा शासनाच्या वतीने दिलेला धीर या आपदग्रस्त कुटुंबांना दु:ख विसरुन नवी उभारी घेण्यास निश्चितच मदत करेल.

❐ ❐

# गडचिरोलीत विकासाची गंगा

गडचिरोली जिल्हा तसा आदिवासीबहुल व मागास म्हणून ओळखला जातो. मुख्यमंत्र्यांचा दौरा यापूर्वी झाला नाही, असे नव्हे, परंतु या वेळच्या दौऱ्याची उत्सुकता व महत्त्व वेगळे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आपल्या भागातीलच, आपल्या विदर्भातील. म्हणून आदिवासी समाजांमध्ये मोठी उत्सुकता होती.

२४ नोव्हेंबर २०१४ रोजी नागपूर येथून ११ वाजायच्या सुमारास गडचिरोली जिल्ह्यात हेलिकॉप्टरने त्यांचे आगमन झाले. गडचिरोली जिल्ह्यात नेहमी सतावणारा नक्षलवाद, दळणवळणाची अपूरी सोय, उद्योगधंदे, आरोग्य, शिक्षण, सिंचन या प्रश्नांची जाण मुख्यमंत्र्यांना होती. आदिवासी बांधवांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. या भागात सुरू असणाऱ्या विविध प्रकल्प व आरोग्य केंद्रांना त्यांनी भेट दिली. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा वनराईने समृद्ध आहे. विपुल जलसंपदा आहे, परंतु विकासाच्या बाबतीत अजूनही कोसो दूर आहे. या भेटीत आपण फक्त प्रश्न व समस्या समजावून घेणार आहोत आणि काही कालावधीनंतर फलश्रुती निश्चित दिसेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी दिला.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा या दुर्गम भागाला भेट दिली. या दुर्गम भागाला भेट देणारे ते पहिलेच मुख्यमंत्री ठरले. त्यांच्या भेटीमुळे येथील आदिवासी नागरिक अतिशय आनंदून गेले. हाच आनंद मुख्यमंत्र्यांच्या चेहऱ्यावरसुद्धा दिसत होता. या वेळी मुख्यमंत्र्यांनी या भागातील विविध समस्या आणि प्रश्नांचा आढावा घेतला. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

**विवेक खडसे**

आपल्या भागातील प्रश्नांची जाण असणाऱ्या मुख्यमंत्र्यांना काय सांगणार? त्यांना आमच्या समस्या माहिती आहेत? ते निश्चितच चांगले निर्णय घेतील, असा विश्वास त्या भागातील नागरिक व्यक्त करताना दिसत होते. दिवसभर त्यांनी विविध कामांचा आढावा घेताना अगरबत्ती प्रकल्पासारख्या छोट्या



**गडचिरोली दौऱ्यावर असताना गोठणगाव (ता. कुरखेडा) येथील संयुक्त वनव्यवस्थापन समितीतर्फे चालवल्या जाणाऱ्या अगरबत्ती व पत्रावळी प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली. यावेळी गोठणगावकरांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले.**




**जिल्हाधिकारी कार्यालयात विविध प्रकल्पांचा आढावा घेताना मुख्यमंत्री.**

## हस्तकलेचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

**मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याचे औचित्य साधून हस्तशिल्प कलाप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनातील लाकडावरील हस्त, धातू, माती, लोह आणि बांबूशिल्प या हस्तकलेच्या वस्तू व साहित्य बघितल्या. मुख्यमंत्र्यांनी आदिवासी समाजामध्ये उपजतच कलाकौशल्य असते व त्याला प्रोत्साहन देण्याची गरज आहे, त्यांच्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्याची आवश्यकता आहे. याकडे लक्ष पुरवण्यात येईल, असे उपस्थित असलेल्या कारागिरांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले. आपल्या दिवसभराच्या दौऱ्यात पोटेगावरोडवरील वनौषधी केंद्रालाही त्यांनी भेट दिली. हे केंद्र वनविभागाच्या पुढाकारातून राबवण्यात येते. हा उपक्रमदेखील उत्तम असल्याचे त्यांनी सांगितले.**

उद्योगांना त्यांनी भेट दिली.

आदिवासींमध्ये उपजतच कला असते. त्यांना साजेसे व आवड असणाऱ्या कुटीर उद्योगांना चालना दिल्यास स्थानिक स्तरावरच रोजगार मिळू शकतो. त्यातच वनपरिक्षेत्र विभागाने कुरखेडा येथे सुरू केलेल्या अगरबत्ती उद्योगास त्यांनी भेट दिली. त्याशिवाय गडचिरोली शहरात आयोजित शिल्पकला प्रदर्शनाला भेट देऊन त्यांच्यातील कलागुण जाणून घेतले. घरातल्या घरात छोटे उद्योग सुरू करून त्यांना बाजारपेठ मिळवून देणे तेवढेच महत्त्वाचे आहे. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक आदिवासी बांधव मुख्य प्रवाहापासून दूर आहेत, त्यांच्या जीवनात स्थैर्य प्राप्त करून देण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी त्यांना आश्वासित केले.

वनावर आधारित उद्योग सुरू करण्यावर त्यांनी अधिक भर दिला आहे. याशिवाय



**आदिवासी हस्तकलेच्या वस्तूंचे निरीक्षण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**

विजेची समस्या लक्षात घेता सौर पंप उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आदिवासी बहुल गडचिरोली जिल्ह्यातील ९० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. परंतु, सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. ही बाब ग्रामस्थांनी लक्षात आणून दिल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मामा तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे याबरोबरच सूक्ष्म सिंचन यावर भर देण्यात येईल, शिवाय वनौपज विकसित करण्यात येईल, असे सांगितले. अगरबत्ती काड्यांची जास्तीत-जास्त निर्मिती जिल्ह्यातच होईल, असे मुख्यमंत्री आश्वासित करीत असताना गोठणगाव येथील अगरबत्ती प्रकल्पात काम करणाऱ्या संदीप कमरु या व्यक्तीचे त्यांनी तोंडभरुन कौतुक केले. पळस पानापासून तयार करण्यात आलेल्या पत्रावळी, मोहफुलापासून तयार करण्यात आलेले सरबत, जाम तसेच राखेपासून तयार करण्यात आलेल्या विटा, यांची पाहणी त्यांनी केली. संयुक्त वनव्यवस्थापनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कोंडाळा येथील नितीन राऊत, टेंभणीचे प्रमोद सहारे व उसेगाव येथील राजहंस बोदेले यांची मुक्तकंठाने त्यांनी स्तुती केली. राज्याचे मुख्यमंत्री आपल्याशी आस्थेने बोलतात आपले प्रश्न समजून घेतात ही आमच्यासाठी स्वप्नवत गोष्ट आहे अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

मारोडा येथील संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर नेवारे, अगरबत्ती प्रकल्प मारोडाच्या अध्यक्षा सुनिता मेश्राम यांना २० टक्के अनुदानाचे धनादेश वाटप मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. आदिवासी बांधवांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध करून देणे याला प्रथम प्राधान्य असेल. याशिवाय शिक्षण व आरोग्य या बाबींकडे देखील जाणीवपूर्वक लक्ष देण्यात येईल, असे त्यांनी कुरखेडा तालुक्यातील जळगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिल्यानंतर ग्रामस्थांशी बोलतांना सांगितले. रुग्ण दवाखान्यात येतील याची वाट न पाहता डॉक्टरांनी सामाजिक बांधिलकी म्हणून रुग्णांच्या दारापर्यंत जाण्याचा प्रयत्न करावा, जेणेकरून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांचा दौरा गडचिरोली जिल्ह्यातील बांधवांसाठी प्रेरणादायी ठरला. आमच्या भागातील समस्या निश्चितच मार्गी लागतील अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

❑ ❑



# मेळघाटात मुख्यमंत्री

मेळघाटातील आदिवासी आणि दुर्गम भागात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच झंझावती दौरा केला. त्याचा आखों देखा हाल

**मोहन राठोड**

'गावात कुणी आजारी पडले तर कुठे जाता? मुलांना शाळेत पाठवता काय? स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळते काय?' या मूलभूत प्रश्नांना हात घालत मुख्यमंत्र्यांनी थेट प्रश्न केला. सुरुवातीला कुणीच उत्तर देत नव्हते. सगळेच काहीसे कावरेबावरे झालेले! मग एक जण उठून उभा राहिला,' साहेब शिक्षक रोज शाळेत शिकवायला येत नाहीत. गावाला जोडणारा रस्ता निकृष्ट दर्जाचा झाला आहे. कोणी ऐकत नाही', असे एक ना अनेक समस्या थेट मुख्यमंत्र्यांना ग्रामस्थ सांगू लागले. मुख्यमंत्री शांतपणे ऐकत होते. धीरगंभीर होऊन पाहत होते. अधिकाऱ्यांना ग्रामस्थांसमोर उभे केले. मुख्यमंत्री थेट आपल्याशी बोलत आहेत यावर लोकांचा विश्वासच बसत नव्हता.

पण ही वस्तुस्थिती आहे. दिनांक २९ नोव्हेंबर २०१४ रोजी दस्तूरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस थेट आदिवासी बांधवांशी संवाद साधत होते. धारणी तालुक्यातील राणामालूर या मेळघाटातील आदिवासी गावात मुख्यमंत्र्यांचा ताफा सकाळी च्या सुमारास पोहचला. मेळघाटातील आदिवासी समाजाचे प्रश्न समजावून घेणे व त्यांना जवळून पाहता यावे, यासाठी त्यांनी पूर्ण एक दिवसाचा दौरा केला. सकाळी ८ वाजता त्यांचे हेलिकॉप्टर बोरी येथील वसुंधरा आदिवासी आश्रमशाळेच्या प्रांगणावर उतरले. तेथून ते मालूर फॉरेस्ट व चौराकुंड येथील दौरा आटोपून राणामालूरला गेले.

### ग्रामस्थांना उत्सुकता

मुख्यमंत्री गावात येणार याची ग्रामस्थांना उत्सुकता होती. मंदिराच्या शेजारी टेबल-खुर्ची लावलेल्या पेंडॉलवजा सभेच्या ठिकाणी मुख्यमंत्र्यांचे आगमन झाले. गावातील सर्व लोक पटापट खाली बसले. सत्कारसोहळा व भाषणबाजीला फाटा देऊन मुख्यमंत्र्यांनी सरळ माईक हातात घेतला आणि थेट ग्रामस्थांशीच बोलू लागले. आदिवासींनी आपल्या लाडक्या मुख्यमंत्र्यांचे स्वागत त्यांच्या परंपरागत नृत्याने केले. आज मेळघाटात एका दृष्टीने दिवाळीच होती. ग्रामस्थांमध्ये उत्साह होता. आदिवासी गवळी समजाच्या स्त्रिया न भिता थेट आपले प्रश्न मुख्यमंत्र्यांना सांगत होत्या.

साधाभोळा आदिवासी समाज. यांची अपेक्षाही माफक अन् त्याही आपण पूर्ण करू शकत नाही. कर्मचारी गावांत राहत नाहीत. मुलांना शिकवत नाही. शासनाकडून आलेले धान्य त्यांच्या घरांपर्यंत बरोबर पोहचत नाही. आरोग्य केंद्राची इमारत असूनही आरोग्य सुविधा मिळत नाही. या अचंबित करणाऱ्या बाबी ऐकून, यापुढे असे होणार नाही. मूलभूत सुविधा व आवश्यक गरजा मिळाल्याच पाहिजेत. तुमचे प्रश्न व समस्या जाणून घेण्यासाठीच आलो आहे. शासन तुमचे आहे. मुख्यमंत्री तुमचा आहे, असे त्यांनी आश्वासित करताच आदिवासी तरुणांच्या चेहऱ्यावर हसू फुलले. नंतर ते उघड व परखडपणे बोलू लागले.

### चांगल्या कामाचे कौतुक

तेवढ्यात दुसरा तरुण उठून उभा राहिला. 'साहेब, हे बघा शिक्षक उपस्थित आहेत' त्या शिक्षकालाही मुख्यमंत्र्यांनी समज दिली. ज्या कंत्राटदारांनी रस्ता बरोबर तयार केला नाही आणि ज्या अभियंत्याने लक्ष दिले नाही त्यांची

चौकशी केली जाईल. मेळघाटातील प्रश्न सोडविण्यासाठी पहिला अहवाल १५ दिवसांत तर दुसरा अहवाल ३० दिवसांत पाठवा. आदिवासी गावांचे प्रश्न सुटलेच पाहिजे, अन्यथा जबाबदारी निश्चित केली जाईल, अशी सक्त ताकीद मुख्यमंत्र्यांनी दिली. चांगल्या कामाचे कौतुकही केले.

**गावकऱ्यांशी संवाद**

वीज, पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण ही सुविधा निश्चितच मिळेल, असे आश्वासन दिले. लोकांनी टाळ्या वाजवून उत्स्फूर्त दाद दिली. तत्पूर्वी प्रारंभीच मालूर फॉरेस्ट या गावातील आदिवासी कुटुंबाची भेट घेतली.

शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या शेगडया व शिलाईमशीनची पाहणी केली. श्रीमती मनकु चंदुलाल जामुनकर या महिलेने शेगडी पेटवून दाखविली. शिलाईमशीन चालविता काय?

> **'मेळघाट सोने जैसी चीडीया है! उसे चमन बनाने के लिए मुख्यमंत्रीजी आऐ है।'**
>
> **- आमदार प्रभूदास भिलावेकर**

मुख्यमंत्र्यांच्या या प्रश्नांवर तिच्याकडून नकारार्थी उत्तर मिळाले. 'अहो, महिलांना प्रशिक्षण द्या. आय.टी.आय.मध्ये मुलींना शिकवा' असे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. ते थेट रोजगार हमी योजनेचे काम सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी मजुरांना भेटले. मालूर फॉरेस्ट या गावच्या मजुरांशी बोलले. आदिवासी गावांचा समूह निर्माण करून गावतलावाची स्थिती, शेततळे आदी कामे तातडीने घ्यावीत असे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

आपणास मजुरी किती मिळते, असा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी केला असता १६८ रुपये मिळते, असे उत्तर मिळाले. मेळघाट परिसरातील तीन समूहांमध्ये हा उपक्रम राबवण्यात येत असून अशा प्रकारचे १३ प्रकल्प सुरू असल्याची माहिती 'मनरेगा'चे आयुक्त मुथ्थुकृष्णन शंकरनारायणन यांनी दिली.

**आरोग्य केंद्रांना भेटी**

चौराकुंड या गावात आल्यानंतर आरोग्य केंद्र, अंगणवाडी या केंद्रांना मुख्यमंत्र्यांनी भेटी दिल्या. त्या ठिकाणच्या सोयीसुविधांची पाहणी केली.

नंतर ग्रामस्थांनी आयोजित कार्यक्रमांत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. आरोग्य सुविधेची अडचण, शिक्षकांची अडचण, पिण्याचे पाणी, वीज आदी समस्या निश्चितपणे सोडवण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

## आधी विकास मेळघाटचा

**मेळघाट हे माझ्या दृष्टीने प्रथम प्राधान्यावर असेल, असे सांगतांनाच गडचिरोली, नंदूरबार या सारख्या आदिवासीबहुल भागांचा विकास झाला नाही, तर महाराष्ट्राचा विकास कसा होईल? आपला मुख्यमंत्री आपल्या विदर्भाचा मुख्यमंत्री. झाल्यामुळे आपली अपेक्षा वाढणे स्वाभाविक आहे. माझ्या महाराष्ट्रात हा अविकसित भाग मागे राहणार नाही याची ग्वाही देतो, असे आश्वासित करून ते नंतर अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीला गेले. मेळघाटात विविध विभागांमार्फत योजना राबवली जाते, त्याची माहिती त्यांनी जाणून घेतली. या भागात विविध स्वयंसेवी संस्था काम करीत असतात, परंतु त्याची योग्य सांगड घालणे आवश्यक आहे; जेणेकरून विकासाचा मार्ग सुकर होईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.**




**मेळघाटातील आदिवासींशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**

# अमरावती : सिंचनप्रकल्पाला सर्वोच्च प्राधान्य



**अमरावती विभागाची आढावा बैठक**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नुकताच दोन दिवसांचा अमरावती दौरा विभागातील नागरिकांच्या दृष्टीने सत्कारणी लागला. यापूर्वी कोणत्याच मुख्यमंत्र्यांनी एवढया आत्मीयतेने व जवळीक साधून कधीच प्रश्न जाणून घेतले नव्हते. आमच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांचे मेळघाटातील आगमन म्हणजे दिवाळीच होती. अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

मेळघाटात कुपोषणामुळे मोठ्या प्रमाणावर बालमृत्यू होत असल्याने राज्य सरकार याबाबत अत्यंत संवेदनशील असून, मेळघाटला लागलेला कुपोषणाचा कलंक मिटवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी मेळघाट भेटीदरम्यान दिली. शिवाय मेळघाटातील आदिवासींचे स्थलांतर थांबविण्यासाठी स्थानिक पातळीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे अधिक प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

## टंचाई परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना

विभागात मागील पाच वर्षात सर्वात कमी पाऊस पडल्यामुळे ७ हजार २४१ गावे ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असल्यामुळे या गावांमध्ये तातडीने टंचाई परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना लागू करण्याच्या सूचना देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'विभागातील सिंचन प्रकल्प पूर्ण करून प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी अधिकाऱ्यांनी सकारात्मक मानसिकता ठेवून अपूर्ण राहिलेले सिंचन प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करावेत'.

**सिंचन प्रकल्पांना प्राधान्य**

२८ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री दिवसभर अमरावतीत होते. विभागीय आयुक्त कार्यालयात विविध विकासकामांचा आढावा घेतला. आढावा घेतांना, ज्या त्रुटी आढळल्या त्याबाबत तातडीने निर्णय घेतले गेले. अमरावती विभागातील महसूल अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा एका आठवडयात भरण्यात येतील आणि जे अधिकारी रुजू होणार नाहीत, त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल. अमरावती विभागात १०२ सिंचन प्रकल्प रखडले गेले असल्याची बाब आढावा बैठकीत लक्षात आणून देताच, सिंचनाच्या २० प्रकल्पांचा प्रस्ताव पाठवा, त्यास सुधारित प्रशासकीय मान्यता तातडीने देण्यात येईल जेणेकरुन शेतकऱ्यांना जमिनी ओलिताखाली आणता येतील, असे सांगितले. २० हजार कृषिपंपांना जोडणी, जिल्हा सामान्य रुग्णालयात सिटीस्कॅन, विजेची निर्मिती, वनविभागाच्या अंतर्गत येणा-या २६ प्रकल्पांना पर्यायी जागा, ४ ट्रान्सफॉर्मर १५ दिवसात व ५ लक्ष विद्युतपंप लावण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. ❐ ❐

## धडाकेबाज निर्णय

- सिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी ३ वर्षाचा धडक कार्यक्रम
- धडक कार्यक्रमात एकुण ४५ प्रकल्पांत ३५,५२९ हेक्टर नवीन सिंचन निर्मिती होईल. त्यापैकी ३१ प्रकल्प प्रशासकीय मान्यतेअभावी प्रलंबित आहे. त्याची फेरतपासणी करून मान्यता देण्यात येईल.
- वन विभागाच्या प्रकरणामुळे प्रलंबित सिंचन प्रकल्प लवकरच निकाली काढणार.
- वन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या २६ प्रकल्पांना पर्यायी जागा देणार. ६ प्रकल्प केंद्र शासनाकडे प्रलंबित आहेत, त्याचा पाठपुरावा करणार.
- महसूल अधिकाऱ्यांच्या (१४ उपजिल्हाधिकारी, ८ तहसीलदार, ३ अतिरिक्त जिल्हाधिकारी) रिक्त जागा एका आठवड्यात भरणार.
- २०,००० कृषिपंपांना मार्च २०१५ पर्यंत वीज जोडण्यात येईल. ऑक्टोबर अखेर ७२३० कृषिपंपाना वीजजोडणी देण्यात आली आहे.
- अति उच्च दाबाची ४ उपकेंद्रे मंजूर आहेत. १- धारणी, २-आर्णी, ३- यवतमाळ एमआयडीसी ४-
- ढाणकीव्यतिरिक्त १३ नवीन उपकेंद्रांची पुढील प्रक्रिया महावितरण/महापारेषणतर्फे सुरू आहे.
- ४०० ट्रान्सफार्मर १५ दिवसांत पूर्ण करण्यात येतील.
- अमरावती येथे एम.आर.आय., सोनोग्राफी, स्वतंत्र कक्ष स्थापन करणार.
- एम.बी.बी.एस.झालेल्या स्थानिक उमेदवारांना मेळघाट येथे प्राथमिक आरोग्य केंद्र नियुक्तीसाठी प्राधान्य देणार.

# धीर आणि दिलासा



**पाथर्डी तालुक्यातील जवखेडे येथील हत्याकांडातील जाधव कुटुंबातील नातेवाईकांची देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेऊन जाधव कुटुंबीयांचे सांत्वन केले.**

अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील जवखेडे (खालसा) हे एक गाव. गेल्या ३५-४० दिवसांपासून विविध प्रसारमाध्यमातून त्याचं नाव ऐकायला - वाचायला मिळत आहे.

संजय जाधव , त्यांची पत्नी जयश्री आणि मुलगा सुनील या तिघांची झालेली निर्घृण हत्या मानवतेला हादरवून गेली. ही घटना मंगळवार, २१ आक्टोबर २०१४ रोजी उघडकीस आली. हल्लेखोरांनी कोणताही पुरावा न ठेवल्यामुळे पोलीस यंत्रणाही चक्रावून गेली. मृत कुटुंबीय मागासवर्गीय समाजाचे असल्याने या घटनेचे गांभीर्य आणखी वाढले.

गुन्हेगारांचा तत्काळ शोध लावावा म्हणून विविध संघटनांनी मोर्चा, आंदोलने केली. शासनस्तरावरही तपासयंत्रणेला जलद तपासाचे आदेश देण्यात आले. सबळ पुरावे मिळाल्याशिवाय अटक करणे शक्य नसल्याने पोलिसांनी अनेकांची चौकशी केली. संशयितांची नार्को टेस्ट केली. विविध शक्यता गृहीत धरून तपासकार्य चालू ठेवले.

दरम्यान, तपासयंत्रणेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले. जाधव कुटुंबीयांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले. सामाजिकदृष्ट्या निरपराध व्यक्तींच्या मनात दहशतीची भावना निर्माण होणे योग्य नव्हते. त्यामुळं संवेदनशील मनाच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जवखेड्याला भेट देण्याचे ठरवले.

## राजेंद्र सरग

रविवार, दिनांक ३० नोव्हेंबरला त्यांचा जळगाव जिल्ह्याचा नियोजित दौरा होता. त्यापूर्वी जवखेड्याला जाणार असल्याचे प्रशासकीय पातळीवर निरोप गेले. त्यानुसार सकाळी दहाच्या सुमारास कासारपिम्पळगाव येथील दादा पाटील राजळे महाविद्यालयाच्या मैदानावर हेलिकॉप्टरने मुख्यमंत्र्यांचे आगमन झाले. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी अनिल कवडे आणि इतर अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तपासाबाबतची सद्यःस्थितीही त्यांनी माहीत करून घेतली. त्यानंतर मुख्यमंत्री जवखेड्याकडे रवाना झाले. जवखेड्याला त्यांनी पीडित जाधव कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. मृत संजय जाधव यांच्या आई साखरबाई यांना मुख्यमंत्र्यांसमोर आपली कैफियत मांडतांना अश्रू अनावर झाले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी निरपराध व्यक्तींवर कारवाई होणार नाही, अशी ग्वाही देऊन दोषींना तत्काळ शोधण्यात येईल, असा दिलासा दिला.

पत्रकारांजवळ आपल्या भावना व्यक्त करतांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही घटना अत्यंत अमानुष आणि दुर्दैवी असल्याचा पुनरुच्चार केला. या प्रकरणाकडे माझे व्यक्तिगत लक्ष असून दैनंदिन अहवालाचा पाठपुरावा करत असल्याचे सांगितले. जाधव कुटुंबीयांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली असून त्याबाबत चौकशी केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री एखाद्या गावात येणार म्हटल्यावर गावात आनंदाचं वातावरण असते. पण या भेटीला अमानुष हत्याकांडाची पार्श्वभूमी असल्याने पाथर्डी तालुक्यातील जवखेडे (खालसा) येथील वातावरण गंभीर होते. त्यांच्या भेटीमुळे पीडित जाधव कुटुंबीयांना निश्चितच धीर मिळाला, दिलासा मिळाला. ❐ ❐

# प्रीतिसंगम



संथ वाहणारी कृष्णामाई आणि महाराष्ट्राचे भाग्य घडविणाऱ्या कोयनेच्या संगमावर सकाळपासूनच मान्यवरांची रीघ लागली होती. पुरोगामी महाराष्ट्राची पायभरणी करणाऱ्या यशवंतराव चव्हाणांच्या समाधीस्थळी प्रत्येक जण आपल्या लाडक्या नेत्याला आदरांजली अर्पण करताना नतमस्तक होत होता.

स्मृतिदिनानिमित्त चव्हाण साहेबांचं स्मरण सुरू होते. इथली विस्तीर्ण हिरवळ, झाडाझुडपांची पाने-फुले साहेबांच्या हिमालयाएवढ्या कर्तृत्वाची साक्ष देत होती. कृष्णा- कोयनेच्या संगमावर सकाळच्या कोवळ्या उन्हांनी गर्दी केली होती. कीर्तिवंत यशवंतरावांच्या समाधीस्थळाच्या दर्शनाच्या ओढीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही पावले प्रीतीसंगमाच्या दिशेने वळली.



## यशवंतराव चव्हाण स्मृतिदिन

### कराड, दि. २५ ऑक्टोबर २०१४

मुख्यमंत्री फडणवीस यांचे विमान कऱ्हाडात उतरले आणि ते थेट प्रीतिसंगमावर पोहोचले. फडणवीस समाधिस्थळी नतमस्तक झाले अन् वैभवशाली भूतकाळाची आणि उमद्या वर्तमानाची प्रीत जुळली. हीच प्रीत महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाची आणि यशाची प्रेरणा ठरावी, अशी सहजसुंदर, नैसर्गिक भावना उपस्थितांच्या मनात तरळून गेली. फडणवीस आणि सहकार व पणनमंत्री चंद्रकांत पाटील यांनी अर्पण केलेले पुष्पचक्र म्हणजे राज्याच्या विकासाची चाके आणखी गतिमान करण्याचा संकल्प होता.

''महाराष्ट्राच्या निर्मितीत आणि जडणघडणीत चव्हाण साहेबांचा सिंहाचा

**जगदीश मोरे**

वाटा आहे. राजकीय व्यवस्थेत कसे काम करावे आणि राज्याचे प्रशासन कसे चालवावे, हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यांनी दाखविलेल्या मार्गाने आपला महाराष्ट्र आपल्याला पुढे न्यायचा आहे'', अशा उत्स्फूर्त शब्दांत श्री. फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. राजकीय आणि पक्षीय भेदापलीकडच्या महाराष्ट्राचे हे दर्शन होते.

स्व. चव्हाण साहेबांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांचा ताफा कऱ्हाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवाराच्या दिशेने निघाला. बाजार समितीच्या आवारातील 'स्व. यशवंतराव चव्हाण कृषी, औद्योगिक व पशु-पक्षी प्रदर्शना'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन झाले आणि ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय अन् कृषी संस्कृतीच्या वारशाचे एक वर्तुळ पूर्ण झाले. व्यासपीठावरील महात्मा जोतिबा फुले, यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांच्या तसबिरी महाराष्ट्राचा देदीप्यमान वारसा सांगत होत्या. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या व्यासपीठावरच्या उपस्थितीने आजी-माजी मुख्यमंत्री एकत्र आले. कार्यक्रमस्थळी सहकार व पणनमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी, विविध मान्यवर आणि शेतकऱ्यांची मांदियाळी जमली होती.

शेतकऱ्यांसाठी असलेल्या या उपक्रमात शेतकऱ्यांच्या अडीअडचणी आणि चिंतांबाबत ऊहापोह केल्याशिवाय फडणवीस याचे प्रभावी आणि ओघवते भाषण पूर्ण होणे शक्यच नव्हते. शेतीसमोर विविध आव्हाने असली तरी सर्वांत मोठे आव्हान वातावरण बदलाचे आहे. राज्यभरात मंडलस्तरावर २ हजार ६५ ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्रे स्थापन करण्याची घोषणाही फडणवीस यांनी केली.

राज्यात सुमारे १९ हजार गावांमध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांना केंद्राकडून त्वरित मदत मिळणं शक्य होणार आहे. त्याचबरोबर स्थायी आदेशानुसारदेखील मदतीचे वाटप सुरू करीत असल्याची घोषणा करून फडणवीस यांनी शेतकरी बांधवांना मोठा दिलासा देण्याचे काम यावेळी केले. ❒ ❒



# जागतिक दर्जाचे शिवस्मारक

छत्रपती शिवाजी महाराज ही महाराष्ट्राचीच नव्हे तर साऱ्या देशाची अस्मिता आहे. जगभरातील इतिहास अभ्यासकांना शिवाजी महाराजांच्या देदीप्यमान कार्यकर्तृत्वाने प्रभावित केले आहे. ज्याचे समुद्रावर राज्य त्याचेच भूप्रदेशावर साम्राज्य टिकते हा विचार भारतात पहिल्यांदा कोणी रुजवला असेल तर तो छत्रपती शिवाजी महाराजांनी. त्यामुळे महाराजांच्या कीर्तीला साजेसे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक करायचे असेल तर ते समुद्रातच करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला होता. मात्र त्याचे काम अद्याप सुरू झाले नव्हते. हे स्मारक मुंबईजवळील मरीन ड्राईव्हजवळच्या अरबी समुद्रातील भव्य अशा खडकावर उभारण्यात येणार असून ते राजभवनापासून दीड किलोमीटर अंतरावर, तर मरीन ड्राईव्ह पासून साडेतीन किलोमीटर आणि गेट वे ऑफ इंडियापासून साधारणत: १० किलोमीटर अंतरावर असेल. स्मारकासाठी गिरगाव चौपाटीपासून तीन किलोमीटरवर १६ हेक्टरची जागा निश्चित करण्यात आली आहे.

राज्यात सत्तेवर आलेल्या नव्या सरकारने कामाचा अन् निर्णयाचा धडाका सुरू केला आहे. रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी प्राधान्य दिले आहे. त्यात मुंबईजवळच्या अरबी



अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाबाबतच्या पर्यावरण खात्याच्या परवानगीसह इतर प्रशासकीय प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून या भव्य आणि ऐतिहासिक स्मारकाचा शिलान्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येईल.

**– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

- **२००० कोटींहून अधिक खर्च अपेक्षित**
- **अमेरिकेच्या स्टॅच्यू ऑफ लिबर्टीपेक्षाही भव्य स्मारक**
- **पूर्णत्वाचा कालावधी ५ वर्षे**
- **जगभरातून निविदा मागवणार**
- **जगभरातील पर्यटकांना आकर्षित करणार**
- **छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जगभरात सहजतेने पोहोचणार**
- **लोकोत्तर राजाचे स्मारक पुढची अनेक शतके जगभरातील राज्यकर्त्यांना प्रेरणास्त्रोत ठरेल**
- **दोन वर्षांहून अधिक काळ केवळ संकल्पचित्रावर काम.**



शिवस्मारक : संकल्पचित्र १




समुद्रात उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाची तातडीने उभारणी करण्याचा निर्धार राज्य सरकारने केला आहे. त्यासाठी तातडीची पावले उचलली आहेत. शिवस्मारकासाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडून आवश्यक असलेली परवानगी मिळावी यासाठी पाठपुरावा करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत नुकताच घेण्यात आला. यासोबतच अन्य परवानग्यांसाठीही प्रशासकीय कार्यवाहीला गती देण्यात आली आहे. ही सारी प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून या भव्य आणि ऐतिहासिक स्मारकाचा शिलान्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या स्मारकाच्या कामाच्या पाठपुराव्याचा आढावा घेण्यासाठी सह्याद्री अतिथीगृहात नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीला अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, विनायक मेटे, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हे आंतरराष्ट्रीय दर्जाचेच झाले पाहिजे. यासाठी ज्या विभागांच्या मंजुरींची आवश्यकता आहे, त्या तातडीने आणि वेळेची मर्यादा पाळून घेतल्या जातील. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे या स्मारकाच्या मंजुरीसाठी पाठपुरावा आम्ही करीत आहोत. त्याचबरोबर स्मारकाच्या निर्मितीसाठी सल्लागार निवडण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना आपण दिल्या आहेत. जगात अशा प्रकारची स्मारके ज्या कंपन्यांनी उभारली आहेत, त्यांचे मार्गदर्शनही या स्मारकाच्या कामासाठी घेण्यात येणार आहे. तसेच इतर सर्व तांत्रिक बाबी येत्या तीन ते चार महिन्यात पूर्ण करून पंतप्रधानांच्या हस्ते या स्मारकाचे भूमिपूजन करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### 'जेजे'चे सादरीकरण

जे. जे. वास्तुविशारद महाविद्यालयाच्या वतीने स्मारकाचे संकल्पचित्र तयार करण्यात आले, त्याचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. या स्मारकात म्युझियम, ऑडोटोरीयम, वाचनालय, प्रदर्शन हॉल, ॲम्फी थिएटर अशा प्रकारच्या सुविधा असेल. स्मारकाच्या आतील बाजूस लिफ्टची देखील सुविधा असेल. शिवाजी महाराजांचा, तलवार हवेत उंचावलेला अश्वारुढ पुतळा या ठिकाणी उभारण्यात येणार असल्याची संकल्पना यावेळी सादर करण्यात आली. संकल्पित स्मारकाची भासमान सफर घडविणारी चित्रफीतदेखील या वेळी उपस्थितांना दाखविण्यात आली.

### तातडीने मंजुरी देऊ : जावडेकर

छत्रपती शिवाजी महाराजांच्या या आंतरराष्ट्रीय स्मारकाला केंद्र सरकारतर्फे तातडीने मंजुरी देण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी केली आहे. त्यामुळे छत्रपतींच्या स्मारकाचा गेले काही महिने प्रलंबित असलेला महत्त्वाकांक्षी प्रकल्प आता मार्गी लागणार आहे. या स्मारकाला पर्यावरणविषयक मंजुरी देण्याची प्रक्रिया सुरू असून लवकरात लवकर ही मान्यता देण्यात येईल, असे पर्यावरणमंत्र्यांनी सांगितले. स्मारकाच्या जागेवर राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था, मेरीटाइम बोर्ड आणि आयआयटी, पवई यांच्यातर्फे अन्वेषण आणि सर्वेक्षणाचे काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

**– शब्दांकन : प्रवीण कुलकर्णी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर गेल्या महिन्याभरात महाराष्ट्राला अधिक वेगाने प्रगतिपथावर नेणारे नावीन्यपूर्ण निर्णय घेतले. त्या निर्णयांचा आढावा.

# पारदर्शकतेला प्राधान्य

## बदल्यांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण

बदल्यांचे अधिकार केंद्रित झाल्यामुळे अनेक प्रशासकीय अडचणींना तोंड द्यावे लागत होते. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधान्याने काही विभागातील बदल्यांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय घेतला असून त्याची सुरुवात जलसंपदा आणि अन्न व औषध प्रशासन विभागातून केली आहे. Minimum Government, Maximum Governance या सूत्रानुसार शासनाचे काम पुढील काळात चालेल याची सुरुवात या निर्णयाने झाली आहे.



- जलसंपदा विभागात मोठ्या प्रमाणावर अ आणि ब गटातील अधिकारी आहेत. त्यामधील कार्यकारी अभियंता यांच्या बदलीचे अधिकार मुख्यमंत्र्यांकडे होते, ते आता जलसंपदा विभागाच्या प्रधान सचिवांकडे देण्यात आले आहेत. तर उपअभियंत्यांच्या बदल्यांचे अधिकार जलसंपदा मंत्र्यांकडून मुख्य अभियंत्यांना देण्यात आले आहेत. शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, सहायक अभियंता श्रेणी-२ गट ब यांच्या बदल्या आता मुख्य अभियंता हे अधीक्षक अभियंता यांच्या सल्ल्याने करतील. हे अधिकार पूर्वी जलसंपदा राज्यमंत्र्यांकडे होते.
- अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक, वैज्ञानिक अधिकारी, अन्न सुरक्षा अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांच्या बदल्यांचे अधिकार आयुक्तांना देण्यात आले आहेत. यापूर्वी हे अधिकार अन्न व औषध प्रशासन खात्याच्या मंत्र्यांकडे होते.

बदल्यांचे अधिकार मंत्रालय स्तरावरून क्षेत्रीय स्तरावर देण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने एकूणच प्रशासनामध्ये विकेंद्रीकरण होऊन त्याचा निश्चितच चांगला परिणाम दिसून येईल. तसेच प्रशासनामध्ये पारदर्शकता व गतिमानता येईल. मुख्यमंत्र्यांनी शपथविधीनंतर आपले सरकार हे पारदर्शक व गतिमान असेल, असे सांगितले होते. त्याला अनुसरून हा निर्णय घेण्यात आला.

## मालमत्तेची माहिती देणे बंधनकारक

सरकारी कर्मचाऱ्यांनी दरवर्षी शासनास सादर करण्याची मालमत्तेची माहिती आता सर्व निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपालिकांमधील कर्मचाऱ्यांना देखील द्यावी लागणार आहे. अशी माहिती देणे अनिवार्य करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे.

नागरी सेवेतील तरतुदीनुसार प्रत्येक शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आपल्या मालमत्तेसंबंधीचे मत्ता व दायित्व विवरण सादर करणे आवश्यक आहे. दरवर्षी ३१ मे पर्यंत ही माहिती संबंधितांना सादर करावी लागते. राज्य शासनाच्या अखत्यारीतील निमशासकीय संस्था, पंचायत राज संस्था, नगरपालिका, महानगरपालिका, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, मंडळे यामधील कर्मचाऱ्यांना यामधून वगळण्यात आले होते. या सर्व संस्थांवर शासनाचे नियंत्रण असणे आवश्यक असून सर्वच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत समान धोरण असावे, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली.

आता या निर्णयामुळे सिडको, एमएमआरडीए, नगरपालिका आणि महानगरपालिकांसह सर्व संस्थांमधील अधिकारी/कर्मचारी यांना मालमत्ता आणि दायित्वे यांची वार्षिक विवरणपत्रे आपल्या विभाग प्रमुखांना सादर करावी लागतील.

# तारांकित ★★★★★

## बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणार

शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी पार्क येथील स्मृतीस्थळास मुख्यमंत्र्यांनी भेट दिली व पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे असे स्मारक मुंबईत उभारण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, बाळासाहेब हे पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी सदैव प्रेरणा दिली. ते तेज:पुंज व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्राचा इतिहास बाळासाहेबांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. नव्या पिढीला प्रेरणा देणारे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे असे यथोचित स्मारक मुंबईत शासनातर्फे उभारण्यात येणार आहे. या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापण्यात येईल. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व सर्वपक्षीय नेत्यांशी चर्चा करून स्मारक उभारण्याबाबत ही समिती निर्णय घेईल. यावेळी मंत्रिमंडळातील अनेक सहकारी आणि नेते यांनीही बाळासाहेबांना आदरांजली वाहिली.



# पोलीस दलाचे सक्षमीकरण

राज्याच्या पोलीस दलासमोर असलेल्या आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी अधिकारांचे विकेंद्रीकरण करून पोलीस विभाग अधिक सक्षम करण्याचा मानस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य पोलीस मुख्यालयात पोलीस अधिकाऱ्यांच्या परिषदेत व्यक्त केला.

राज्यातील पोलीस दलासमोरील आव्हाने, त्यांच्या अडचणी व त्याबाबत पोलीस अधिकाऱ्यांच्या सूचना याबाबतची चर्चा या परिषदेत करण्यात आली. पोलीस तपासाचा स्तर व गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढविणे, याबरोबरच महिला- बालकांवरील अत्याचार, नक्षलवाद, दहशतवाद याचा सामना कसा करता येईल याचा आढावा घेण्यात आला. मुंबईत लावण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेरांच्या प्रस्तावाला गती देण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी या वेळी केली.



## एलबीटी रद्दबाबत शासन सकारात्मक

स्थानिक संस्था कर (एलबीटी) आणि जकात रद्द करण्याबाबत राज्य शासनाची सकारात्मक भूमिका आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (फॅम) च्या शिष्टमंडळाला सांगितले.

राज्याचे आर्थिक नुकसान न होता याबाबत योग्य पर्यायांचा विचार करून तसेच सर्व तांत्रिक बाबी तपासून हे दोन्ही कर लवकरात लवकर रद्द करण्याचा निर्णय घेतला जाईल. काही महापालिका क्षेत्रात करवसुली करतांना सक्ती केली जात आहे, व्यापाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. त्याबाबतही योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

## प्रलंबित प्रश्नांबाबत खासदारांनी पाठपुरावा करावा

केंद्र सरकारकडे राज्याचे अनेक प्रश्न विविध कारणांमुळे प्रलंबित आहेत. राज्यातील खासदारांनी या प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संसद अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुंबई येथे घेतलेल्या राज्यातील खासदारांच्या बैठकीत केले.

या बैठकीस लोकसभा आणि राज्यसभेतील राज्याचे ५६ खासदार उपस्थित होते. राज्यातील दुष्काळी परिस्थिती, सिंचनाचा बॅकलॉग, रेल्वेचे विविध प्रश्न, ब्रिमस्टोवॅड, अपारंपरिक ऊर्जा, मुंबई उपनगरीय रेल्वेशी संबंधित प्रश्न, मुंबई विकास योजनेसाठी केंद्राचा निधी मिळणे, परवडणारी घरे, मराठवाड्यातील दुष्काळ, कोल्हापूरला कोकण रेल्वेने जोडणे, अतिरिक्त दुधाचा प्रश्न, कापूस हमी भाव, मेट्रोचे जाळे, आरोग्य यंत्रणा, इंदू मिल जमिनीवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रस्तावित स्मारक, अशा विविध विषयांवर चर्चा होऊन केंद्राकडे याचा सातत्याने पाठपुरावा करण्याचे ठरले. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न, त्याचप्रमाणे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करून देणे, कोस्टल रोड याबाबतही चर्चा झाली.

## दिल्लीत समन्वय अधिकारी

संसदेत प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नांचा पाठपुरावा करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील खासदारांना साहाय्य करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र सदनातील गुंतवणूक आयुक्तांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती केली. खासदारांना आता आपल्या प्रश्नांसाठी नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनातील आयुक्तांकडे संपर्क साधता येईल.

# तारांकित



## मुख्यमंत्र्यांनी नाकारली झेड प्लस सुरक्षा

मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेसाठी १५० पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह झेड प्लस दर्जाची सुरक्षा असते. मात्र ही सुरक्षा यंत्रणा नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाकारून वाय दर्जाच्या सुरक्षेला पसंती दिली आहे. मुंबईत वर्षा बंगला आणि नागपूर येथील त्यांच्या निवासस्थानीही मोठ्या प्रमाणावर पोलीस तैनात करण्यात आले. नागपूरच्या दौऱ्यावर असताना मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या रामगिरीवर डॉक्टरांसह सुरक्षा अधिकारी-कर्मचाऱ्यांचा ताफा होता. त्या वेळी १५० पोलिसांची धावपळ आणि कडक सुरक्षेचा शेजाऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेत त्यांनी स्वतःची सुरक्षा कमी करण्याचे ठरवले. तसेच फडणवीस यांनी मुलगी दिवीजालाही सुरक्षा नाकारली आहे. गेली १५ वर्ष आमदार असताना फडणवीस यांनी एकही पोलीस कधी सुरक्षेसाठी घेतला नाही हे विशेष.

आपल्याला कोणापासूनही धोका नाही. त्यामुळे इतक्या मोठ्या सुरक्षेची गरज नाही, असे फडणवीस यांनी पोलिसांना कळवले. नक्षलवाद्यांपासून राज्याच्या मुख्यमंत्र्यांना धोका असल्याचे पोलिसांचे मत असले तरी आपल्याला वाय दर्जाची सुरक्षा ठेवा, असे मुख्यमंत्र्यांनी सुरक्षा उच्चाधिकार समितीला कळवले. यासंदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती सुरक्षाव्यवस्थेचा आढावा घेऊन निर्णय घेणार आहे.

# सुप्रशासन

## डिजीटल महाराष्ट्र



२०१५ हे वर्ष डिजीटल सेवा वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे. या वर्षात महाराष्ट्राला डिजीटल महाराष्ट्र बनविण्याचा निर्धार मुख्यमंत्र्यांनी केला आहे. राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय हे ई-सेवेद्वारे जोडण्यात येणार आहे. डिजीटल इंडियाच्या संकल्पनेत महाराष्ट्राचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नागरिकांना प्रशासनाद्वारे उत्तम सेवा मिळावी यासाठी सेवा अधिकार कायदा अमलात आणला जाईल, ज्याद्वारे सर्व शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व निश्चित केले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. उत्तम सेवा देणे हे प्रत्येक विभागाचे कार्य असेल आणि उत्तम सेवा मिळणे हा नागरिकांचा अधिकार असेल.

## कामगार कायद्यात सुधारणा

कामगारांची होणारी पिळवणूक थांबवून त्यांना त्वरित रोजगार उपलब्ध करून देणे, त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कामगार कायद्यामधील सुधारणांना मंजुरी देण्याचा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला. त्यानुसार कंत्राटी कामगार, दुकाने आणि आस्थापना परवाना, तसेच कारखाना सुरू करण्यासाठी लागणारे परवाने आता फक्त तीन दिवसात उपलब्ध होणार आहेत. परवाना तीन दिवसात न मिळाल्यास तो मिळाल्याचे गृहीत धरण्यात येणार आहे. या निर्णयाचा फायदा राज्यातील कंत्राटी कामगार, तसेच हजारो व्यावसायिक आणि उद्योजकांना होणार आहे. परिणामी राज्याचा आर्थिक विकास वाढून रोजगारालाही चालना मिळेल.

## जात पडताळणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात अधिकारी

जात पडताळणीप्रमाणपत्र मिळण्यात होणारा विलंब लक्षात घेऊन प्रत्येक जिल्ह्यात जात पडताळणीसाठी स्वतंत्र अतिरिक्त जिल्हाधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. राज्यात सध्या जात पडताळणीची एक लाख प्रकरणे प्रलंबित असून या निर्णयामुळे लाखो नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

अनुसुचित जाती-जमाती आणि इतर प्रवर्गाच्या नागरिकांना शिक्षण, शासकीय नोकरी आदी कामांसाठी जात पडताळणीचे प्रमाणपत्र आवश्यक असते. सध्या राज्यात आठ ठिकाणी असलेल्या जातपडताळणी समित्या हे प्रमाणपत्र देण्याचे काम करीत होत्या. तथापि कामाचा आवाका प्रचंड असल्याने हे प्रमाणपत्र मिळण्यात वेळेचा अपव्यय होत असे. ही अडचण लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याची प्रलंबित प्रकरणे निकाली निघतील व नविन अर्जदारांना तातडीने प्रमाणपत्र मिळण्यास मदत होणार आहे.

## पीकपाण्याच्या मोजणीसाठी आधुनिक तंत्रज्ञान

राज्यातील पीकपाण्याची मोजणी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर उपग्रहाच्या साहाय्याने करता येऊ शकेल. यासंदर्भातील कार्यपद्धती निश्चित करणे, तसेच धोरण आखण्यासाठी मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे.

महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्राच्या (एमआरएसएसी) सहकार्याने यासंदर्भातील कार्यवाही गतिमान करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

## मराठा मुस्लीम आरक्षण कायम राहण्यासाठी प्रयत्न

मराठा व मुस्लीम आरक्षणाच्या अंमलबजावणीला मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या हंगामी स्थगिती संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय सरकारने

# तारांकित ★★★★★



## मंगळसूत्र विकून शौचालय बांधले

राज्यात ग्रामीण भागात अनेक ठिकाणी शौचालये नसल्याने महिलांची कुचंबणा होते. राज्य आज स्वच्छतेबाबत जागरूक होत असले तरी त्यात खूप काम करण्याची गरज आहे. अशातच वाशिम जिल्ह्यातील संगीता आव्हाळे यांनी शौचालयासाठी आपले मंगळसूत्र विकून समाजापुढे नवा आदर्शच निर्माण केला आहे. ग्रामीण महाराष्ट्राला स्वच्छतेच्या दिशेने जाण्याचा वस्तुपाठच श्रीमती आव्हाळे यांनी घालून दिला आहे. घरची परिस्थिती बेताची, आर्थिक चणचणीमुळे नवीन शौचालय बांधणे परवडत नसल्याने त्यांनी मंगळसूत्र विकण्याचा निर्णय घेतला. केवळ निर्णय घेऊन त्या थांबल्या नाहीत तर त्यांनी कृतीही केली. राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे-पालवे यांना या महिलेचा खूपच अभिमान वाटतो. त्यांनी त्यांचा मंगळसूत्र देऊन गौरव केलाच त्याबरोबर राज्यात जास्तीत जास्त शौचालय बांधण्याचा निर्धार ही व्यक्त केला. मंगळसूत्र विकण्याचा संगीता आव्हाळे यांचा निर्णय अनेकांना रुचला नव्हता. त्यांना विरोधही झाला पण त्यांनी निर्धार मोडला नाही. संगीताच्या या धाडसाचे पंकजा-मुंडे यांनी ही कौतुक करीत सत्कार केला.

घेतला. यापूर्वीच्या सरकारने घेतलेल्या या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते व या खटल्यासंदर्भातील युक्तीवाद विधानसभा निवडणुकीपूर्वी दि. १८ सप्टेंबर २०१४ रोजी संपला होता व उच्च न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. दि. १४ नोव्हेंबर २०१४ रोजी उच्च न्यायालयाने हा निकाल दिला. मराठा आरक्षणासंदर्भात संनियंत्रण करण्यासाठी शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. या स्थगितीच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याच्या कार्यवाहीचे संनियंत्रण ही समिती करणार आहे. या समितीत सहकार मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभेतील विरोधी पक्ष नेते एकनाथ शिंदे, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधी व न्याय विभागाचे सचिव यांचा समावेश असणार आहे.

## खाजगी वनजमिनीवरील घरे सुरक्षित

खाजगी वनजमिनींवर घरे असणाऱ्या सुमारे ४.५० लाख नागरिकांचा निवास शासनाच्या एका निर्णयामुळे सुरक्षित राहिला आहे. खाजगी वनजमिनींवर बेकायदेशीर ताबा मिळवून तिथे वास्तव्य करत असणाऱ्या नागरिकांना मुंबई उच्च न्यायालयाच्या २००८ रोजी दिलेल्या निर्णयामुळे निवासस्थाने हातची जाणार अशी भीती निर्माण झाली होती. त्यानंतर जानेवारी २०१४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने या नागरिकांना दिलासा दिला. या उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात वन विभागातर्फे यापूर्वी रिव्ह्यू पिटीशनन (फेरविचार याचिका) दाखल करण्यात आली होती. मात्र या प्रकरणात जवळपास १०६६ इमारती व ३१,२६८ सदनिका तसेच ४५,२२० झोपड्या/खोल्या समाविष्ट असून बऱ्याच लोकांवर अन्याय होईल. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनाने ॲडिशनल सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया यांचे अभिमत प्राप्त करुन सर्वोच्च न्यायालयात दाखल रिव्ह्यू पिटिशन मागे घेण्यास सहमती दर्शवली आहे. त्या अनुषंगाने महसूल विभागामार्फत ७/१२ उताऱ्यावर खाजगी वनाच्या नोंदी घेण्याची कार्यवाही करण्यात आली. यामध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे मुलूंड, नाहूर, विक्रोळी, पोईसर, मालाड सह ठाणे शहरातील मौजे कावेसर, कोलशेत व पाचपाखाडी येथील १९२६.३५ (एकर गुंठे) क्षेत्राचा समावेश आहे. या सर्व १८ प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाने दिनांक २४ मार्च २००८ रोजी एकत्रित सुनावणी घेऊन वन विभागाच्या बाजूने निर्णय दिला.

## पाणी पुरवठा व स्वच्छता ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची लोकवर्गणी रद्द

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी असलेली १० टक्के लोकवर्गणीची अट पूर्णत: रद्द करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. यापूर्वी ज्या पाणी पुरवठा योजनांकरिता अंशत: लोकवर्गणी ग्रामस्थांनी भरली असल्यास ही रक्कम संबंधित ग्रामपंचायतीस परत केली जाणार नाही. मात्र उर्वरित लोकवर्गणीची तरतूद ही पाणी पुरवठा योजनेच्या किमतीत शासनामार्फत करण्यात येईल. ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेतदेखील सुधारणा करण्यात आली असून तांत्रिक मान्यता आणि प्रशासकीय मान्यतेच्या अधिकारात काही बदल करण्यात आले आहेत.

## आगामी अर्थसंकल्पात वनविकासासाठी प्रभावी योजना

येत्या अर्थसंकल्पात वनविकासासाठी प्रभावी योजना प्रस्तावित करण्यात येणार असून सर्व संबंधित घटकांच्या सहकार्यातून बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा विकास करण्यात येईल तसेच कायद्याच्या चौकटीत राहून समन्वयातून वनविकासाचे प्रश्न सोडवणार असल्याची ग्वाही वनमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.



## चंद्रपूर जिल्ह्यात बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र

बांबू शास्त्रोक्त लागवड आणि औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण देण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

# तारांकित



## शहीद गोवारी स्मारकाला मुख्यमंत्र्यांचे अभिवादन

२३ नोव्हेंबर बरोबर २० वर्षांपूर्वी याच दिवशी नागपुरात आदिवासी गोवारी बांधव शहीद झाले. आपल्या न्याय्य हक्कासाठी आदिवासी समाजाने हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मोर्चा काढला होता. गोवारी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनुसूचित जमातीला मिळणाऱ्या सवलती आम्हालाही मिळाव्यात ही त्यांची मागणी होती.

इतरांप्रमाणे या समाजाचाही मोर्चा आला. हजारोंच्या संख्येने आदिवासी बांधव मोर्चात सहभागी झाले होते. हा समाज अतिशय साधाभोळा जंगलाच्या सान्निध्यात राहणारा. शहराच्या वातावरणापासून थोडासा लांब असणारा. मोर्चा दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीमुळे ११४ आदिवासी बळी गेले. महाराष्ट्राच्या इतिहासात अशी घटना घडली नव्हती !

या दिवसाची स्मृती म्हणून नागपूर शहरात मध्यभागी असलेल्या झिरो माईल्स जवळ शहीद आदिवासी गोवारी स्मृतिस्थळ उभारण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे या वेळीही सकाळपासून आदिवासी बांधव आपल्या पारंपरिक वाद्यवृंदासंह एका शिस्तीत येताना दिसत होता. तरुण-तरुणी, महिला-पुरुष, आबालवृद्ध सर्वच आपल्या शहीद बांधवांना अभिवादन करण्यासाठी आले होते.

नवीन बांबू धोरण जाहीर करण्यात येत असून त्याअंतर्गत या केंद्रातून प्रशिक्षण देण्यात येईल.या ठिकाणी बांबूवर आधारित डायरेक्टर जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट अँड ट्रेनिंग या भारत सरकारच्या विभागातर्फे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम सुरूकरण्यात येईल.

## चंद्रपूर येथे वन अकादमी

चंद्रपूर येथील वन प्रशिक्षण संस्थेचा दर्जा वाढवून त्याचे वन अकादमीमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय राज्य मंत्रिपरिषदेने घेतला. आता या अकादमीचे नाव चंद्रपूर फॉरेस्ट ॲकॅडमी ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन, डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट म्हणजेच चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी असे करण्यात येईल.

## 'मुनीजन' उपक्रमातून 'गुणीजन' घडावेत

स्वच्छता हे केवळ अभियान न राहता ते नित्यनियम बनणे आवश्यक आहे. आपण जसे भूक लागली की जेवतो तसाच नित्यनियम स्वच्छतेच्याही बाबतीत आवश्यक असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे. महाराष्ट्र युनिर्व्हसिटीज न्यू एनिशिएटिव्ह फॉर जॉईंट ॲक्शन नाऊ (मुनीजन)मार्फत स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात करण्यात आली. कार्यक्रमास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ संजय चहांदे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ राजन वेळूकर, प्र-कुलगुरू डॉ. नरेश चंद्र आणि राज्यातील विविध विद्यापीठांचे कुलगुरू, प्र-कुलगुरू उपस्थित होते.

## विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांना मुदतवाढ

राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांना १ मे २०१५ पासून पुढे पाच वर्षे मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंत्रिपरिषदेने घेतला. केंद्रीय गृह मंत्रालयाने या मंडळांना वेळोवेळी मुदतवाढ दिली असून शेवटची मुदतवाढ ३० एप्रिल २०१५ पर्यंत आहे. या मंडळांनी गेल्या १३ वर्षात केलेल्या कामकाजाचा आढावा घेऊन राज्यातील असमतोल दूर करण्यात त्यांचे योगदान यापुढेही आवश्यक असल्याने ३० एप्रिल २०२० पर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात येत आहे.

## शहिदांना अभिवादन



**मुंबईवर झालेल्या २६/११च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांच्या मरीन लाईन्स पोलीस जिमखाना येथील स्मारकास शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे व उद्योग मंत्री प्रकाश महेता यांनी पुष्पचक्र वाहून आदरांजली वाहिली.**

# तारांकित



## विद्यार्थ्यांशी हितगुज

उच्च व तंत्र शिक्षण तथा शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी बालदिनानिमित्त राज्यातील विविध विभागांशी व्हिडीओ कॉन्फरंसिंगद्वारे संवाद साधला. त्या प्रसंगी एनआयसीचे राज्य सूचना विज्ञान अधिकारी मोइज हुसैन अली तसेच इतर अधिकारी उपस्थित होते. व्हिडीओ कॉन्फरंसिंगदरम्यान तावडे यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांना बोलते केले.

त्याचबरोबर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वच्छ भारताचे ध्येय बालकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. बालदिनापासून मोदी यांनी दिलेला 'स्वच्छ शाळा स्वच्छ परिसर' हा कार्यक्रम आपल्या शाळांमध्ये राबवण्याचे आवाहनही त्यांनी या वेळी केले. लहान वयातच स्वच्छतेचे संस्कार विद्यार्थ्यांवर होणे आवश्यक आहे. आपल्या पंतप्रधानांनी आपल्यावर सोपवलेली स्वच्छतेची जबाबदारी आपण उत्स्फूर्तपणे पार पाडून जगभरात स्वच्छतेचे दूत असा नावलौकिक मिळवाल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या वेळी संबंधित खात्याचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

# सांस्कृतिक

## लता मंगेशकर जीवनगौरव पुरस्काराने कृष्णा कल्ले सन्मानित

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत २०१३-१४ या वर्षीचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ गायिका श्रीमती कृष्णा कल्ले यांना रवींद्र नाट्य मंदिर येथे ज्येष्ठ संगितकार यशवंत देव यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे व इतर मान्यवर उपस्थित होते. पाच लाख रुपये रोख, मानचिन्ह, मानपत्र, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. संगीत आणि गायन क्षेत्रात प्रदीर्घ सेवा केलेल्या ज्येष्ठ कलाकारास दरवर्षी शासनातर्फे हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यापूर्वी माणिक वर्मा, श्रीनिवास खळे, गजानन वाटवे, दत्ता डावजेकर, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. हृदयनाथ मंगेशकर, ज्योत्स्ना भोळे, आशा भोसले, अनिल विश्वास, सुधीर फडके, रवींद्र जैन, प्यारेलाल शर्मा, मन्ना डे, स्नेहल भाटकर, जयमाला शिलेदार, खय्याम, महेंद्र कपूर, सुमन कल्याणपूर, सुलोचना चव्हाण, यशवंत देव, आनंदजी शाह, अशोक पत्की यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.




### डॉ प्रभा अत्रे यांना भीमसेन जोशी पुरस्कार

शास्त्रीय संगीतातील योगदानासाठी राज्य शासनातर्फे दिला जाणारा भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांना जाहीर करण्यात आला. ५ लाख रोख व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. नाशिक येथे होणाऱ्या शास्त्रीय संगीत महोत्सव कार्यक्रमामध्ये हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. प्रभा अत्रे या किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका असून त्यांनी पं. सुरेशबाबू माने आणि गानहिरा हिराबाई बडोदेकर यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे धडे घेतले आहेत.

### कीर्ती शिलेदार यांना अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार

संगीत रंगभूमीवर उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ज्येष्ठ नाट्य कलाकारास संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार देण्यात येतो. ज्येष्ठ संगीतकार तथा अभिनेत्री कीर्ती शिलेदार यांना २०१४-१५ या वर्षासाठीचा संगीताचार्य कै.बळवंत पांडरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप ५ लाख रुपये, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे आहे.

# तारांकित



### टॅक्सी परवाने ऑनलाइन लॉटरीद्वारे

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणजे मुंबईचा प्राणच! मुंबईतील लोकल रेल्वे सेवेला तर मुंबईची जीवनवाहिनी असेच संबोधले जाते. या महानगरात लोकल रेल्वे सेवेबरोबरच बेस्ट परिवहन सेवा, टॅक्सी सेवा, रिक्षा सेवा या परिवहन सेवाही अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यामुळेच शासनाने मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबईतील टॅक्सी सुविधा अधिक चांगली करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या परिवहन विभागाने काही महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. रिक्षा आणि टॅक्सी परवान्यांचे वाटप अत्यंत पारदर्शक अशा ऑनलाइन लॉटरी पद्धतीने करण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रासाठी नुकतीच ७ हजार ८४३ टॅक्सी परवान्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन लॉटरी पद्धतीने निवड करण्यात आली. परवाने वाटपाचा हा कार्यक्रम विधानभवन येथे नुकताच झाला. शासनाने शहरांमधील वाहनांची गर्दी, हवा प्रदूषण, वाहतूक समस्या इत्यादी बाबी विचारात घेऊन १९९७ नंतर नवीन टॅक्सी परवाने न देण्याचा निर्णय घेतला होता. पण मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील नूतनीकरण न झालेले तसेच रद्द झालेले १९ हजार ६८७ टॅक्सी परवाने होते. या टॅक्सी परवान्यांचे फेरवाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला.

## ज्येष्ठ नागरिकांसाठीचे कायदे संकेतस्थळावर उपलब्ध

आईवडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी केंद्र शासनाने अधिनियम २००७ हा कायदा केला असून या कायद्यांतर्गत राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने आईवडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ २०१० हा नियम तयार केला आहे. या कायद्यात ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या पाल्याकडून निर्वाह खर्च देण्याची तरतूद केली आहे. ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र मिळण्यासाठी आधारकार्ड, रेशनकार्ड मतदार ओळखपत्र, पॅनकार्ड यापैकी कोणताही एक पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्यासाठी हेल्पलाइन दूरध्वनी क्र.मुंबई पोलीस : १२९१, १०३, हेल्प एज इंडिया : १८०० १८० १२५३ डिग्नीटी फौंडेशन : ०२२-६१३८१११ फेस्कॉम : ९९६९८४५२२५, ९३२२८०२७७७ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच ही सर्व माहिती महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करण्यात आली आहे.

## करंजा व जयगड बंदर प्रकल्पाच्या कामास प्रारंभ

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील करंजा येथील जागतिक दर्जाच्या बहुउद्देशीय पोर्ट टर्मिनल आणि लॉजिस्टिक इन्फ्रास्ट्रक्चर हा प्रकल्प तसेच महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड, कोकण रेल्वे महामंडळ आणि जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लिमिटेड यांच्या दरम्यान जयगड बंदर कोकण रेल्वेला जोडण्याच्या प्रकल्पांविषयी सामंजस्य करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करण्यात आला. 'मेक इन महाराष्ट्र'चे ध्येय गाठण्याचा आमचा ठाम निर्धार असून उद्योग, गुंतवणूक क्षेत्रातील सर्व परवानग्या फास्ट ट्रॅकवर आणण्यात येतील आणि गुंतवणूकदारांसोबत आम्ही भागीदाराची भूमिका पार पाडू, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. कोकण किनारपट्टीचा विकास करण्यासाठी आणि राज्यातील उद्योग जगताला आयात-निर्यातीसाठी उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बंदरांचा विकास करण्याला आमचे प्राधान्य राहील.

## शौर्यपदकप्राप्त शहीद कुटुंबीयांसाठी धोरण

विविध शौर्यपदकप्राप्त शहिदांच्या कुटुंबीयांना विशेष सवलती देण्यासाठी राज्य शासन लवकरच धोरण तयार करणार आहे. मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांनी नुकतीच मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, त्यावेळी बोलताना याबाबत धोरण तयार करण्यात येईल, असे स्पष्ट केले. ❐ ❐





## झोपडपट्टींचा विकास!

मुंबईतील झोपडपट्टीवासीयांचा विकास करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन विकास प्राधिकरणामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजना अधिक गतीने राबवण्यात याव्यात तसेच मुंबईत हाऊसिंग स्टॉक निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागांना दिल्या आहेत. वांद्रे येथील बैठकीत गरिबांना दर्जेदार घरे देण्याबाबत आपली प्राथमिकता त्यांनी स्पष्ट केली.

मुंबईमधील झोपडपट्ट्यांमध्ये ४६ टक्के लोक राहतात. मुंबईचा सर्वांगीण विकास करताना झोपडपट्टीवासीयांचे प्रश्न सोडविणे महत्त्वाचे आहे. मुंबई महापालिकेचे ११७ तर म्हाडाचे ९६ प्रकल्प प्रलंबित आहेत. तीन वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रकल्पांचा आढावा घेऊन ते तातडीने सुरू करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन विकास प्राधिकरणाकडे १८०० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध आहे. त्यातील ५०० कोटी रुपये म्हाडाला देऊन त्या माध्यमातून हाऊसिंग स्टॉक निर्माण करता येईल. मुंबईत पाच खाजगी ट्रस्टकडे मोठ्या प्रमाणात जमिनी आहेत. त्या विकसित करण्यासाठी मालक पुढे येत नाहीत. त्यांना नोटीस पाठवून त्याचबरोबर आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करून जमीन ताब्यात घेऊन त्या ठिकाणी हाऊसिंग स्टॉक निर्माण करता येईल, अशा सूचना त्यांनी केल्या आहेत. मुंबईत हक्काचे व सुरक्षित घराचे स्वप्न पूर्ण होण्याच्या गरिबांच्या आशा त्यामुळे पल्लवित झाल्या आहेत.

याशिवाय धारावीचा पुनर्विकास नव्याने करण्यासंदर्भात तेथील उद्योग आणि रहिवासी यांचा एकत्रित विकास कसा करता येईल, यासाठी अभ्यास करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.




# महाराष्ट्राचे ब्रँडिंग

महाराष्ट्रात सरकार स्थापन झाल्यानंतर प्रथमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीत आले. आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यातील महाराष्ट्र दालनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. या पहिल्याच कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी महिला उद्योजकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम केले. या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याची संकल्पना महिला उद्योजकता अशी आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील ९७ महिला उद्योजकांनी आपल्या उत्पादनांचे स्टॉल्स प्रगती मैदान येथे उभारले आहेत. या व्यापार मेळाव्यात महाराष्ट्राने उभारलेले दालन अतिशय देखणे असे आहे. पुण्याच्या विश्रामबागवाड्याची प्रतिकृती सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरली आहे. महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यांतील महिला उद्योजकांचे प्रतिनिधित्व येथे पाहायला मिळते. पाचशे रुपयापांसून ते दोन लाख रुपये किंमतीच्या वस्तू या ठिकाणी पाहावयास मिळतात. लोणच्यापासून पैठणीपर्यंतच्या अनेक वस्तू येथे महिलांनी विक्रीसाठी उपलब्ध केल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी महिला उद्योजकांच्या प्रत्येक दालनास व्यक्तिशः भेट देऊन त्यांच्याशी थेट संवाद साधला.

व्यापार मेळ्यातील अनौपचारिक उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण आखणार असल्याचे सांगितले. राज्याच्या उद्योग धोरणात महिला उद्योजकांना प्रशिक्षण व बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ते बदल करण्याचे तसेच नवी दिल्ली येथे महाराष्ट्राचे ब्रँडिंग करण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाल्यानंतर लगेचच स्वतः मुख्यमंत्री व मंत्रीमंडळातील मंत्री विविध शासकीय कामांसाठी दिल्लीत दाखल झाले. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, महसूल मंत्री एकनाथराव खडसे, सहकार मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री प्रकाश महेता आदींनी महाराष्ट्राच्या प्रलंबित विविध विषयांचा आढावा घेऊन केंद्र स्तरावर पाठपुरावा केला.**

या मेळाव्याची संकल्पना महिला उद्योजकता अशी असून या मेळाव्याचा भागीदार देश दक्षिण अफ्रिका आहे, तर थायलंड या देशाला या मेळाव्यात फोकस कंट्री व दिल्ली या राज्याला फोकस राज्याचा दर्जा देण्यात आला आहे. भारतीय उपखंडात दिल्ली व्यापार मेळावा महत्त्वाचा मानला जातो. या मेळाव्यामुळे प्रत्येक राज्याला आपल्या राज्यातील उद्योगविश्वाचे प्रदर्शन करण्याची व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याची नामी संधी प्राप्त होते. राज्याची संस्कृती, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, आर्थिक आदी सर्वच क्षेत्रांमध्ये देवाणघेवाण या मेळाव्याच्या माध्यमातून होत असते. या मेळाव्यामुळे प्रथमच महिला उद्योजकांना आपल्या उद्योगांची माहिती आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याची संधी मिळाली आहे. मुख्यमंत्र्यांनी महिला उद्योजकांसाठी नव्या योजना व पूरक धोरणे राबवण्याची ग्वाही दिल्यामुळे महिला उद्योजकांमधील आत्मविश्वास दुणावण्यास मदत झाली आहे.

वस्तू व सेवाकर लागू करण्यासंदर्भात उच्चस्तरीय समितीच्या बैठकीस राज्याचे वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते. जम्मू काश्मीरचे अर्थमंत्री अब्दुल रहीम अथर यांच्या अध्यक्षतेखालील या उच्चस्तरीय समितीच्या बैठकीस विविध राज्यांचे अर्थमंत्री उपस्थित होते. वस्तू व सेवा कर कायद्याविषयी महाराष्ट्राची बाजू मांडताना सुधीर मुनगंटीवार यांनी हा कायदा लागू करण्यासाठी महाराष्ट्र केंद्र सरकारला पूर्ण सहकार्य करेल, असे आश्वासन दिले. वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू करण्यासंदर्भात महाराष्ट्राचे काही प्रस्ताव मुनगंटीवार यांनी समितीसमोर ठेवले. यात प्रामुख्याने जीएसटीसाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करणे, त्याचबरोबर वस्तू व सेवाकरांमध्ये जकातीऐवजी प्रवेशकर लावण्याबाबतच्या रचनेवर चर्चा करण्याची मागणी केली. महाराष्ट्र जकात व स्थानिक स्वराज्य संस्था कर रद्द करण्यास वचनबद्ध आहे असे सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थाची स्वायत्तता अबाधित राखण्यात येईल व व्यापाऱ्यांना कर अदा करणे सोपे व्हावे याचा विचार महाराष्ट्रात केला जाईल असे मुनगंटीवार यांनी या बैठकीत सांगितले.

दयानंद कांबळे



**दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यातील महाराष्ट्र दालनातील महिला बचतगटाच्या स्टॉल्सवर वस्तूंची पाहणी करताना मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री.**

# डिजीटल महाराष्ट्र

हिंदुस्थान टाईम्स वृत्त समूहातर्फे येथील ताज पॅलेस हॉटेलमधे आयोजित 'देश बांधणीत नेतृत्व' या विषयावरील परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सहभाग घेतला. २०१५ या वर्षात महाराष्ट्राला 'डिजीटल महाराष्ट्र' बनवू असा निर्धार त्यांनी या वेळी व्यक्त केला. २०१५ हे वर्ष डिजीटल सेवा वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय हे ई-सेवेद्वारे जोडण्यात येणार आहे. नागरिकांना प्रशासनाद्वारे उत्तम सेवा मिळावी यासाठी 'सेवा अधिकार कायदा' अमलात आणला जाईल, ज्याद्वारे सर्व शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व निश्चित केले जाईल असे स्पष्ट करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तम सेवा देणे हे प्रत्येक विभागाचे कार्य असेल आणि उत्तम सेवा मिळणे हा नागरिकांचा अधिकार असेल असेही सांगितले.

महाराष्ट्रात जर एखादा उद्योजक १०० कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक करणार असेल तर 'मैत्री' या योजनेनुसार सर्व सुविधा स्वत: शासन पुरविणार आहे. राज्य शासनातील संबंधित विभागांच्या सचिवांना उद्योग परवाने प्रदान करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत असे स्पष्ट करत औद्योगिक क्षेत्राच्या विकासाचा आढावा दर महिन्याला आपण स्वत: घेणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. औद्योगिक वाढ, वीज व पाणी व्यवस्थापन, कृषी विकास त्याचबरोबर मुंबईतील वाहतूक व्यवस्थेचे एकात्मीकरण व २० लाख घरांच्या निर्मितीचा प्रश्न या विषयांकडे राज्य शासन गांभीर्याने पाहत असून त्यासंबंधीचे नियोजन व धोरण आखण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. 'मेक इन इंडिया' या संकल्पनेचा आदर्श समोर ठेवून 'मेक इन महाराष्ट्र' संकल्पना राबवण्याचा निश्चयच त्यांनी या परिषदेत व्यक्त केला. ❐ ❐

## काय आहे लिडरशीप समीट?

हिंदुस्तान टाइम्स या दैनिकामार्फत लिडरशीप समीट हा उपक्रम दरवर्षी राबवण्यात येतो. अत्यंत प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या या उपक्रमात देश विदेशातील मान्यवर सहभागी होतात. यामध्ये राजकीय नेते, अर्थतज्ज्ञ, वरिष्ठ शासकीय अधिकारी, कलावंत व इतर क्षेत्रातील नामवंतांचा समावेश असतो. या उपक्रमाच्या माध्यमातून मान्यवरांना विविध विषयांवर त्यांची मते मांडण्याची संधी दिली जाते. यंदा ही समीट नवी दिल्ली येथे दि. २१ आणि २२ नोव्हेंबर रोजी पार पडली. या समीटमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशिवाय केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अरुण जेटली, नितीन गडकरी, अफगाणीस्तानचे माजी राष्ट्रपती हमीद करझाई, कॅलिफोर्नियाचे माजी गव्हर्नर व चित्रपट अभिनेते अर्नाल्ड स्वारझेनग्गर, नोबेल पारितोषिक विजेते कैलास सत्यार्थी आदी मान्यवर सहभागी झाले. या समीटमध्ये महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना स्वतंत्रपणे आपली भूमिका मांडण्याची संधी मिळाली. केंद्र आणि राज्य संदर्भात त्यांनी भाष्य केले. भारताच्या सर्वांगीण प्रगतीत महाराष्ट्राचा फार मोठा सहभाग असल्याचे नमूद करून मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन असल्याचे निदर्शनास आणले.







## लिडर ऑफ लिडर




हिंदुस्तान टाइम्सच्या 'लिडरशिप समीट'मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक बाऊन्सर प्रश्नांना लीलया परतवून लावले. त्यातील काही फटके असे होते.....

- १५ वर्षे विरोधी बाकावर असताना सक्रीय आमदार म्हणून राज्याचे प्रश्न जवळून अनुभवले. त्यामुळे विरोधी पक्षांकडून येणारे आक्रमण परतविण्याचा पुरेसा साठा माझ्याकडे आहे.
- माझ्याकडे अल्पमतातील सरकार चालविताना दोन पर्याय होते. जबाबदारी झटकून टाकणे किंवा शब्दात न बोलता कृतीतून उत्तर देणे. मी दुसरा पर्याय निवडला.
- मित्रपक्षासोबत युती कशी करायची हे दीर्घ कालावधीच्या राजकीय जीवनात कळले आहे. त्यामुळे सरकार पुढची पूर्ण पाच वर्षे व्यवस्थित चालेल.
- आमच्या विकासाची ब्लू प्रिंट निवडणुकीआधीच तयार होती. राज्यपालांच्या अभिभाषणात त्याचे प्रतिबिंब उमटले आहे.
- टोल पूर्ण बंद करण्याचे आम्ही कधीच म्हटले नव्हते. टोलच्या धोरणात मात्र बदल करण्यात येईल. एलबीटीलाही पर्याय शोधण्यावर आम्ही ठाम आहोत.

# बाबासाहेबांची आंतरराष्ट्रीय कीर्ती

**महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी विचारांमुळे आणि समाजातील वंचित वर्गाच्या उत्थानासाठी त्यांनी जे अफाट कार्य केले आहे त्याचे आकर्षण सबंध जगाला आहे. हे आकर्षण दिवसेंदिवस वाढतच आहे. विविध देशांतील तरुण पिढी बाबासाहेबांच्या विचारांकडे मोठ्या संख्येने आकर्षित होत आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील दलित शोषित, पीडीत समाजाच्या उत्थानासाठी केलेला संघर्ष हा विविध देशातील शोषित पीडीत जनतेच्या उत्थानाच्या दृष्टीने जगाला प्रेरक ठरला आहे. त्यांचे विचार आणि कार्य हे देशाला आणि जगाला सर्वांगीण विकासाच्या मार्गाला घेऊन जाणारे आहेत याची जाणीव जगातील अनेक अभ्यासकांना होऊ लागली आहे. यासंबंधीचे एक अत्यंत महत्त्वाचे हंगेरियन लोकांचे उदाहरण आहे.

### हंगेरीयन लोकांवर प्रचंड प्रभाव

श्वेत हंगेरियन डेरडाक टिबोर (Derdak Tibor) हे हंगेरी देशातील एक समाजसुधारक आहेत. टिबोर हे २००४ मध्ये फ्रान्समध्ये गेले होते. फ्रान्सची राजधानी असलेल्या पॅरिस शहरातील एका बुक स्टॉलवर फ्रेंच लेखक ख्रिस्तोफ जेफरलोट (Christophe Jaffrelot) यांनी लिहिलेले एक पुस्तक टिबोरने बघितले. ते त्यांनी विकत घेतले. ते पुस्तक वाचल्यानंतर त्या पुस्तकाचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव पडला. त्यांनी आपला मित्र आणि जिप्सी नेता जानोस ओरसॉस (Janos Orsos) यांना त्या पुस्तकाबद्दल सांगितले. जानोस देखील खूप प्रभावित झाले. फ्रेंच भाषेतील ज्या पुस्तकाचा टिबोर आणि जानोस यांच्यावर प्रभाव पडला ते पुस्तक म्हणजे 'डॉ.आंबेडकर ॲंड अनटचेबिलीटी' (Dr. Ambedkar and Untochability) हे होय. या पुस्तकांत फ्रेंच लेखक ख्रिस्तोफ जेफरलोट यांनी डॉ. आंबेडकरांचे जीवन, भारतातील शोषित आणि वंचित अशा दलितांसाठी केलेला संघर्ष, त्यांचे तत्त्वज्ञान आणि बुद्ध धम्माचा केलेला स्वीकार या विषयीची विश्लेषणात्मक अशी माहिती दिली आहे. डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा टिबोर आणि जानोस यांच्यावर इतका प्रभाव पडला की, त्यांनी आपल्या सामाजिक कार्यासाठी डॉ. आंबेडकरांना आपला आदर्श मानला. त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांनुसार जिप्सी लोकांच्या उद्धाराची चळवळ सुरू केली.

जिप्सी लोकांवर डॉ.आंबेडकरांचा प्रभाव आहे. त्याचप्रमाणे श्वेत हंगेरियन लोकांवरदेखील फार मोठा प्रभाव आहे. श्वेत हंगेरियन लोक देखील डॉ. आंबेडकरांना मानतात. बऱ्याच श्वेत लोकांनी बुद्ध धम्म स्वीकारला. जिप्सी लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, त्यांची सामाजिक आणि आर्थिक प्रगती व्हावी, म्हणून श्वेत हंगेरियन लोकांनी स्वत: पुढाकार घेतला आहे. यांच्या प्रयत्नातूनच 'टायगर लिटल स्कूल २००५ मध्ये स्थापन केले आणि इतर अनेक प्रकल्प



राबवले.

### जयभीम संघ

जिप्सी लोकांवर डॉ. आंबेडकरांचा आणि बुद्ध धम्माचा प्रचंड प्रभाव पडल्यामुळे जिप्सी

डॉ.प्रदीप आगलावे

नेता जानोस यांनी जिप्सी लोकांच्या उद्धारासाठी 'जयभीम नेटवर्क' किंवा 'जयभीम संघ' ची स्थापना केली. 'जयभीम संघ ही एक स्वायत्त संस्था आहे. जिप्सी लोकांनी त्यांच्या लोकांच्या विकासासाठी स्थापन केलेली ही संस्था आहे. डॉ. आंबेडकरांच्या, 'शिका! संघर्ष करा! आणि संघटित व्हा!' या संदेशामुळे प्रेरीत होऊन जिप्सी लोकांनी डॉ.आंबेडकर हायस्कूल, द लिटल टायगर स्कूल इत्यादी अनेक शाळा सुरू करून लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार सुरू केला. जिप्सी नसलेल्या सामाजिक कार्यकर्त्या बॉहन कॅटालीन (Bohn Katalin) यांनी BhimRao Association आणि सिरोकी लास्जलो (Siroki Laszlo) यांनी 'रॉम सॉम' (Rom Som) ची स्थापना केली. ही संस्था दक्षिण हंगेरीमध्ये शैक्षणिक कार्य करत आहे.

टिबोर आणि जानोस यांनी २००६ आणि २००७ मध्ये भारताला भेटी दिल्या. या भेटीमध्ये ते नागपूरच्या दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. त्यांनी अमरावती, पुणे, मुंबई आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचा दौरा केला. या दौऱ्यामध्ये त्यांनी बौद्धांनी स्थापना केलेल्या शाळा, कॉलेजला भेटी दिल्या. आंबेडकरी चळवळीचा पाया हा बौद्ध धम्मावर आधारलेला आहे हे बघून जानोस फार प्रभावित झाले.

'भारतीय बौद्धांची ओळख ही मला महत्त्वाची वाटते. म्हणून माझ्या स्वतंत्र धार्मिक संघटनेने 'जयभीम' हे नाव धारण केले. हे नाव असा संदेश देते की, आम्ही भारतीय आहोत. असे जानोस यांनी एका मुलाखतीत सांगितले. पुढे ते म्हणतात की, आमच्या ध्येयाशी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा तंतोतंत मेळ बसतो म्हणून आम्ही आमच्या शाळेचे नाव 'डॉ.आंबेडकर हायस्कूल' ठेवले.

### हंगेरियन सरकारकडून दखल

हंगेरियन लोकांवर डॉ. आंबेडकरांचा आणि बुद्ध धम्माचा पडत असलेल्या प्रभावाची हंगेरियन सरकारला दखल घ्यावी लागली. हंगेरियन सरकारला डॉ.आंबेडकरांच्या विचारातील क्रांतीकारकता आणि त्यांचा हंगेरी लोकांवर पडणारा प्रभाव यांची माहिती जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. हंगेरीतील शिक्षण विभागाने श्रीमती तिरेना बोरोवस्की (Ms Tinrena Borovzsky) यांच्या

नेतृत्वाखाली ३ अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ जून २००८ मध्ये भारतातील दलितांची परिस्थिती आणि डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास करण्यासाठी पाठविले होते. या शिष्टमंडळात गाबोर सारप्लझ (Gabor Sarlpz) आणि सुरी सिजिल्वीया (Ms Suri Szilvia) हे होते. त्यांनी त्यावेळी विदर्भाचा देखील दौरा केला. सुरी म्हणतात की, 'भारतीय समाज सुधारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आमच्यासाठी आदरणीय व्यक्तीमत्व आहे.

डॉ. आंबेडकरांच्या विचारानुसार शैक्षणिक आणि मानव अधिकाराबाबतचे कार्य दक्षिण–पूर्व हंगेरी आणि उत्तर–पूर्व हंगेरी येथे जोरात चालू आहे. हंगेरियन लोकांनी Ambedkar. H.U. आणि Jaibhim.H.U. ही संकेतस्थळे सुरू केली आहेत. अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा हंगेरी सरकार आणि युरोपियन संघावर प्रभाव आहे आणि ते रोमा जिप्सीच्या समस्यांबाबत डॉ.आंबेडकरांच्या विचारातून मार्ग शोधत आहेत.

तेव्हा ती म्हणाली, 'डॉ. आंबेडकरांविषयी अमेरिकेत सर्वांना माहिती आहे. डॉ. आंबेडकरांविषयी ऑक्सफोर्ड प्रकाशनाची काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अमेरिकेतील नव्या पिढीला डॉ. आंबेडकरांचे विशेष आकर्षण वाटते.'

'नव्या पिढीला डॉ.आंबेडकरांचे का आकर्षण वाटते?' – माझा प्रश्न.

'का म्हणजे? डॉ.आंबेडकरांचे विचार आणि कार्य सर्वच देशातील लोकांसाठी भूषणास्पद आणि आदर्श आहे. ते महान तर आहेतच पण आणखी महत्त्वाची बाब म्हणजे त्यांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला. आधुनिक काळात अमेरिकन लोकांना बुद्ध धम्माविषयी विशेष रूची आहे. ते बुद्ध धम्माचा अभ्यास करू लागलेत.'

**ब्राझीलची पत्रकार प्रभावित**

फ्लोरेन्सिआ कोस्टा (Florencia Costa) ही ब्राझीलची पत्रकार २००७ मध्ये भारतात आली होती. या भेटीवर आधारित आपल्या अनुभवाच्या अनुषंगाने तिने नमूद केले आहे



**कोलंबिया विद्यापीठाकडून गौरव**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची अद्वितीय अशी राज्यघटना लिहिली. त्यांच्या या कार्याचा गौरव १९५२ मध्ये अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने डी.लिट ही सर्वोच्च पदवी देऊन केला.**

'आज भारतातील नवीन पिढीला अमेरिकेचे आकर्षण आहे, तर अमेरिकेतील नव्या पिढीला बुद्ध आणि डॉ.आंबेडकरांमुळे भारताचे आकर्षण आहे. पुढील काही वर्षात जगातील तरुणांचे आदर्श हे डॉ. आंबेडकर असतील! ही केवळ कल्पना नाही, तर ती वास्तविकता असेल!'

२००८ च्या नोव्हेंबर महिन्यातील गोष्ट! मला भेटायला एक अमेरिकन मुलगी आली होती. तिचं नाव क्लॉरी ड्रोस्ते (Claire Droste). ती अमेरिकेवरून भारतात अभ्यास करायला आली होती. तिचं वय साधारणत: २१–२२ असावं! तिच्याशी चर्चा केल्यानंतर कळले की, ती बी.ए. करीत असून 'बुद्धिझम ॲण्ड आंबेडकर' हा तिच्या लघुशोध प्रबंधाचा विषय आहे. मला क्लॉरीचं कौतुक वाटलं! २१–२२ वर्षाची मुलगी भारतात एकटी येऊन सर्वत्र फिरून आपल्या विषयासंबंधी माहिती गोळा करते. 'डॉ.आंबेडकरांविषयी तुला माहिती कशी मिळाली आणि तू हाच विषय का निवडला? असे दोन्ही प्रश्न एकदमच तिला विचारले.

की, 'मी भारतात सर्वत्र फिरले. मला वेगळया गोष्टीचे अस्तित्व जाणवले. एका माणसाचा निळ्या सुटातील एक लहानसा पुतळा, काळी टाय, जाड भिंगाचा चष्मा आणि पुस्तक पकडलेला त्यांचा डावा हात छातीवर आहे. त्यांना मी सगळीकडे बघितले. मला डॉ.आंबेडकर लोकांमध्ये दिसले.

निग्रो अमेरिकन लेखिका आणि पत्रकार वॅलेरी मॅसन जॉन ; (Valerie Mason John) ही मार्च, २००८ मध्ये नागपूरमध्ये एका कार्यक्रमात आली होती. तिची एक मुलाखत ४ मार्च २००८ च्या 'हितवाद'मध्ये प्रकाशित झाली. या मुलाखतीत ती म्हणाते, डॉ.आंबेडकरांच्या कार्याने प्रेरित झाल्याने मी बुद्ध धम्माकडे आकर्षित झाले. बुद्ध धम्माचा अभ्यास करताना मी डॉ.आंबेडकरांबद्दल वाचले. त्यावरून माझे मत 'डॉ.आंबेडकर हे आधुनिक भारतातील सम्राट अशोक आहेत'. असे झाले.

**(लेखक : प्रोफेसर, डॉ. आंबेडकर अध्यासन; प्रमुख, डॉ.आंबेडकर विचारधारा पदव्युत्तर विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ. संपर्क : ९८८१२६२६६०)**

## इंदू मिल येथे लवकरच बाबासाहेबांचे स्मारक

घटनेचे शिल्पकार आणि कोट्यवधीं जनतेचे श्रद्धास्थान असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक इंदू मिलच्या जागेवर करण्यास सरकार कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.



इंदू मिलच्या जागेचा वापर केवळ औद्योगिक कारणांसाठी करता येतो. तसेच ही जागा सागरी नियमन क्षेत्रामध्ये (सीआरझेड) समाविष्ट आहे. या तांत्रिक बाबींमुळे इंदू मिलच्या जमिनीचे हस्तांतरण बरेच वर्षे रखडले होते. केंद्राला हमीपत्र दिल्यानंतर इंदू मिलची जमीन लवकरच राज्य शासनाकडे हस्तांतरित होईल. राज्य शासन या जमिनीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण निर्माण करणार आहे. असा महत्त्वाचा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करावा यासाठी जलदगतीने पाठपुरावा करावा तसेच योग्य तो पत्रव्यवहार केंद्राकडे करावा, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी या स्मारकाच्या अनुषंगाने नुकत्याच झालेल्या बैठकीत आधिकाऱ्यांना दिले.

दादरच्या चैत्यभूमीच्या सुशोभीकरणाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्याचे काम सीआरझेडच्या नियमावलीमुळे थांबले आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण झाल्यास चैत्यभूमीला चांगले स्वरूप प्राप्त होईल.

# प्रत्येक अधिवेशन संस्मरणीय

विधिमंडळ किंवा विधानमंडळ या शब्दातच कायदा अंतर्भूत आहे. विधी किंवा विधान म्हणजे कायदा आणि तो बनविण्याचा अधिकार ज्यांना आहे ते विधिमंडळ किंवा विधानमंडळ. लोकशाहीच्या चार स्तंभांपैकी पहिला स्तंभ विधिपालिका. केंद्र स्तरावर विधिपालिकेची (संसद) दोन सभागृहे आहेत, लोकसभा आणि राज्यसभा. राज्यस्तरावर प्रामुख्याने विधानसभा हे सभागृह असते. देशातील काही प्रमुख, मोठया राज्यांमध्ये विधान परिषद नावाचे दुसरे सभागृहही आहे. आणि विधिमंडळाची अशी दोन सभागृहे प्रारंभापासून असणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा समावेश आहे. १९३७ पासून आपल्या राज्यात विधानसभा आणि विधानपरिषद आहे. गेल्या ७७ वर्षांच्या वाटचालीत या दोनही सभागृहांनी मिळून जनहिताचे अनेक कायदे केले. परंतु यातील तीन कायदे सर्वाधिक उल्लेखनीय आहेत. कारण, त्यांनी देशाला दिशादर्शन केले आहे. हे तीन कायदे म्हणजे, कमाल जमीन (शेती) धारणा कायदा, रोजगार हमी कायदा आणि कापूस एकाधिकार कायदा. महाराष्ट्राच्या या तीन कायद्यांनी देशातील इतर राज्यांना, तसेच केंद्र सरकारलाही मार्गदर्शन केले आहे. महाराष्ट्र विधिमंडळाचे हे योगदान ऐतिहासिक स्वरूपाचे आहे, हे कोणालाच नाकारता येणार नाही.

**नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनाचे विशेष असे महत्त्व आहे. या अधिवेशनात अनेक महत्त्वाची विधेयके मांडली जातात. या अधिवेशनाचा कालावधी तुलनेने कमी असला तरी यात बऱ्याच घडामोडी घडतात. या अधिवेशनाच्या उपयुक्ततेबद्दल अनेकजण प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. मात्र या अधिवेशनामुळे विदर्भाच्या विकासाला निश्चितपणे चालना मिळाली आहे. नागपूरच्या गुलाबी थंडीतील प्रत्येक अधिवेशन हे संस्मरणीय झाले आहे.**

विनोद देशमुख

**कमाल शेतजमीन धारणा**

स्वातंत्र्यापूर्वी, राजेशाहीच्या काळात देशभर सर्वत्र जमीनदारी प्रथा अस्तित्वात होती. बहुतांश शेती ही काही मूठभर लोकांच्या हातात एकवटली होती. त्यामुळे मालकी हक्काचे शेतकरी कमी आणि वहिवाटदार शेतकरी जास्त, असे विसंगत चित्र निर्माण झाले होते. नव्हे, बहुसंख्य शेतकरी हे एकप्रकारे शेतमजूरच बनून गेले होते. यातून जमीनदार बेगुमानपणे वागून, प्रत्यक्ष जमीन कसून अन्नधान्य पिकविणाऱ्यांवर अत्याचार करायचे. स्वातंत्र्य आंदोलनातील नेत्यांच्या लक्षात ही स्थिती आली. यातूनच, कसेल त्याची जमीन, भूदान चळवळ यासारख्या मोहिमा सुरू झाल्या. परंतु, यासंदर्भातील पहिले वैधानिक पाऊल टाकले ते महाराष्ट्रानेच !

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यावर, दुसऱ्याच वर्षी १९६१ मध्ये सरकारने कमाल शेतजमीन धारणा कायदा आणला. राज्याच्या हरितक्रांतीचे प्रणेते म्हणून ज्यांना ओळखले जाते, ते तिसरे मुख्यमंत्री वसंतराव नाईक हेच या ऐतिहासिक कायद्याचे प्रवर्तक ठरले. पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळातील महसूल मंत्री म्हणून वसंतराव नाईकांनी ८ फेब्रुवारी १९६१ रोजी कमाल जमीन धारणा कायद्याचे विधेयक विधानसभेत मांडले. या कायद्याने जमीनदारी प्रथेला जबरदस्त तडाखा दिला. मुख्य म्हणजे, बिहार, उत्तरप्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल यासारख्या परंपरागत जमीनदारीग्रस्त राज्यांना या कायद्याने स्फूर्ती दिली आणि तेथील शेतकऱ्यांना कमी-अधिक प्रमाणात दिलासा देणारे शेतजमिनीविषयक कायदे तेथे होऊ शकले. देशाच्या इतिहासात महाराष्ट्राचे हे अत्यंत मोलाचे योगदान आहे.

**रोजगार हमी योजना**

महाराष्ट्राची दुसरी राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी म्हणजे रोजगार हमी योजना. आज केंद्र सरकारची जी मनरेगा योजना सुरू आहे, तिचे मूळ आपल्या रोहयोमध्ये आहे. या क्रांतिकारी योजनेचे शिल्पकार पुन्हा वसंतराव नाईकच होते. हा कायदा बनविण्यासाठी वि.स.पागे यांच्या समितीने भरपूर मेहनत घेऊन अहवाल बनविला. त्यामुळे, ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देण्याचा एक मोठा मार्ग मोकळा झाला. अंमलबजावणी यंत्रणेच्या स्वार्थापायी रोहयोत पुढे मोठा भ्रष्टाचार होऊन ही योजना बदनाम झाली, हा भाग वेगळा. परंतु, ग्रामीण बेरोजगारांच्या हाताला काम देण्याचा या योजनेचा हेतू उदात्त होता. त्यामुळे देशातील इतर अनेक राज्यांनी



नागपूर येथील विधानभवन

आणि केंद्रानेही रोहयोचा आदर्श घेऊन आपापल्या योजना तयार केल्या.

ग्रामीण भारताला मदतीचा हात देणाऱ्या महाराष्ट्राच्या या योगदानाची देशाच्या इतिहासाला नोंद घ्यावीच लागणार आहे. असा हा अमूल्य कायदा प्रत्यक्ष अस्तित्वात येण्यासाठी सहा वर्षांचा कालावधी लागला. वसंतराव नाईकांनी २९ मार्च १९७२ रोजी विधानसभेत रोहयोचे सूतोवाच करून पुढे योजना अमलातही आणली. प्रत्यक्षात रोहयोचा कायदा व्हायला १९७८ साल उजाडले, जेव्हा मुख्यमंत्री होते शरद पवार !

कापूस उत्पादक शेतकऱ्यांची व्यापारी दलालांच्या कचाट्यातून सुटका करण्यासाठी, १९७१ साली झालेला कापूस एकाधिकार खरेदी योजना कायदाही उल्लेखनीय म्हणावा लागेल. तत्कालीन सहकार मंत्री यशवंतराव मोहिते यांनी या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात अक्षरश: रात्रभर भाषण केले होते. सुमारे ८ तास चाललेले हे उत्तराचे भाषण पहाटे पहाटे संपले. दीर्घकाळ भाषण आणि रात्रभर चाललेले कामकाज या दोन्हींच्या बाबतीत नागपूर अधिवेशनातील हा विक्रम आहे.

वसंतराव नाईक स्वत: शिकारी असल्याने त्यांना ताडोबालगतचे कोळसा या भागाचे प्रचंड आकर्षण. शनिवार-रविवारी सुट्यांच्या दिवशी ते आमदारांना या जंगलाची सैर घडवायचे. एवढेच काय, मुंबईहून येणाऱ्या पत्रकारांनाही ताडोबाचे वाघ दाखविण्यात वसंतराव पुढाकार घ्यायचे.

**डब्यांचे वाढले प्रस्थ....**

नंतरच्या काळात मंत्र्यांच्या डबा पार्ट्या सुरू झाल्या. विशेषत: युतीचे सरकार असताना (१९९४ ते १९९९) मंत्र्यांनी विधानभवनात डबे आणून एकत्र जेवण्याची पद्धत तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने सुरू झाली. मंत्र्यांनी आणलेले डबे एका ठिकाणी एकत्र ठेवायचे आणि नंतर वेळ मिळेल त्याप्रमाणे तेथे येऊन जेवायचे, अशी ती पद्धत होती.

२००५ मध्ये मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी डबा डिप्लोमसीचा वापर करून नारायण राणे यांना शिवसेनेतून फोडून काँग्रेसमध्ये नेले, याला मी स्वत:च साक्षीदार आहे. मंत्रालय असो की विधानभवन, विलासराव नेहमीच दुपारचे जेवण घरच्या डब्यातून करायचे. २००५ चे अर्थसंकल्पी अधिवेशन मुंबईत सुरू असतांना विलासरावांच्या या डब्यात आणखी एक वाटेकरी झाला ते म्हणजे नारायण राणे! विधानसभेत विरोधी पक्षनेते असलेले राणे अधूनमधून मुख्यमंत्र्यांच्या दालनात जाऊन विलासरावांसोबत जेवू लागले. खास कोकणातून आणलेल्या मच्छीच्या डिशेसचा डबा आता राणेंच्या घरूनही यायला लागला आणि देशमुख-राणे डबा पार्टी रंगू लागली. त्याचबरोबर रंगू लागली शिवसेनेतील फुटीची चर्चा अन् कोकणी मच्छीच्या काट्यांची चर्चा! शेवटी, जुलैच्या पावसाळी अधिवेशनात राणेंनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करून काँगेसमध्ये प्रवेश केला आणि विलासरावांच्या सरकारमध्ये मंत्रिपद स्वीकारले. ही सारी किमया डब्याचीच नव्हे का?

याआधी, शिवसेनेत पहिली मोठी फूट पडली ती १९९१ च्या नागपूर अधिवेशनातच. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असताना छगन भुजबळ आदी बारा शिवसेना आमदार काँग्रेसमध्ये गेले. हे पक्षांतर फारच नाट्यमय पद्धतीने, आमदारांना लपवून ठेवत घडले होते. यामुळे शिवसेनेचे संख्याबळ कमी होऊन मनोहर जोशी यांच्या जागी भाजपाचे गोपीनाथ मुंडे विरोधी पक्षनेते बनले.

**दैनिक लोकराज्य**

महाराष्ट्र सरकारचे मुखपत्र असलेले लोकराज्य हे प्रारंभी मासिक व नंतर पाक्षिक झाले.आता ते मासिक स्वरूपातच प्रसिद्ध होते. या 'लोकराज्य'ला दैनिक स्वरूपात सादर करण्याचा प्रयत्न राज्यमंत्री डॉ. श्रीकांत जिचकार यांनी एका नागपूर अधिवेशनातच केला होता. १९८२ च्या हिवाळ्यातील हे अधिवेशन. अधिवेशनाच्या कामकाजाचे वृत्तसंकलन वर्तमानपत्रे आपापल्या दृष्टिकोनातून करतात. त्यामुळे सरकारची सरळ भूमिका त्यातून उमटत नाही. म्हणून, अधिवेशनकाळात लोकराज्य दररोज काढण्याचा निर्णय डॉ. जिचकारांनी घेतला.

अधिवेशन संपेपर्यंत रोज दैनिक लोकराज्य निघाले. मात्र, असा प्रयोग मुंबईतील दोन अधिवेशनांमध्ये किंवा नंतर नागपुरातही झाला नाही. कारण, दोनच महिन्यांनी, फेब्रुवारी १९८३ मध्ये मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांचे सरकार जाऊन वसंतदादा पाटील आले. परंतु, या दैनिकाचे प्रणेते डॉ. जिचकार यांचे मंत्रिपद तोपर्यंत गेलेले होते !

(लेखक विदर्भातील ज्येष्ठ पत्रकार आहेत.
**संपर्क : ९८५०५८७६२२)**



विदर्भ हा मुळातच ज्वारीचा प्रदेश आणि अधिवेशन बहुधा डिसेंबरमध्ये यायचे, त्यावेळी ज्वारीचे पीक हुर्ड्याच्या स्थितीला आलेले असायचे. यातही विदर्भातील वाणींचा हुर्डा प्रसिद्ध होता. कोवळया, लुसलुशीत ज्वारीचा गोडसर हुर्डा, वांग्याचे झणझणीत भरीत, भाजलेली वा तळलेली हिरवी मिरची असा तो बेत असे. सोबत भाकरीसह साग्रसंगीत जेवणही. मुंबई-पुणे-कोकण-पश्चिम महाराष्ट्रातील आमदारांना हा सारा जामानिमा फार आवडायचा. म्हणून या सर्वांसाठी एकतरी हुर्डा पार्टी अधिवेशनकाळात हमखास व्हायची. विदर्भातील खानपानाचे वेगळेपण उर्वरित महाराष्ट्राच्या लक्षात आणून देण्यासाठी सुरुवातीच्या काळात विदर्भातील वेगवेगळ्या खाद्यपदार्थांची रेलचेल या काळात असायची. त्यावेळेस असणाऱ्या ज्वारीच्या वानामध्ये हुर्ड्याची गोडी अवीट होती. आता पूर्वीचे वानही नाही आणि हुर्डा पार्ट्याही कमी झाल्या. त्यावेळी अधिवेशन काळात प्रत्येक जिल्ह्यातील प्राबल्य असणाऱ्या नेत्याच्या शेतामध्ये या काळात हे आयोजन राजकीय मेळ्याचे स्वरूप घेत होते. नागपूर जिल्ह्यातील कोहळी येथे बॅ. शेषराव वानखेडे यांच्या शेतात किंवा नरेन्द्र तिडके, शंकरराव गेडाम यांच्यापैकी कोणाच्या तरी शेतात हुर्डा पार्टीचा बेत रचला जायचा. मुख्यमंत्री, मंत्री, सर्वपक्षीय आमदार, विदर्भाच्या कुडकुडत्या थंडीत रात्री शेकोट्यांच्या उबेत या हुर्डा पार्टीचा आस्वाद घ्यायचे.

**यूपीएससी परीक्षेतील मराठी टक्का सातत्याने वाढत आहे. सर्वसामान्य घरातील मुले समाजाच्या उत्थानासाठी प्रशासकीय सेवा आपले करिअर म्हणून निवडत आहेत. त्यांच्या सर्वसमावेशकतेचा प्रशासनावर प्रभावही पडत आहे. अशा उमेदवारांनी या परीक्षेत यश प्राप्त करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती सप्टेंबर २०१४ च्या 'प्रेरणा' विशेषांकात देण्यात आली होती. अशाच यशस्वी उमेदवारांच्या यशकथा आता या अंकापासून नियमित दिल्या जाणार आहेत.**

प्रेरणा

# क्षमतांना न्याय द्या

**आपल्या क्षमतांना न्याय मिळवून देणे हाच करिअरचा राजमार्ग. कोरेगाव (ता. फलटण, जि. सातारा) या लहानशा गावातील मयूर रतिलाल गोवेकर यांनीही हाच मार्ग अवलंबला. पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.टेक झाल्यानंतर व्यावसायिक क्षेत्रात गलेलठ्ठ पगाराची संधी असतानाही त्यांनी आपल्या क्षमतांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासकीय सेवेत येण्याचा निर्णय घेतला. पहिल्याच प्रयत्नात मुलाखतीपर्यंत आणि दुसऱ्या प्रयत्नात आयएएसपर्यंत मजल मारणाऱ्या मयूर गोवेकर यांच्या यशाचा फार्म्युला त्यांच्याच शब्दात...**



**मयूर गोवेकर**

(रँक ३४७ भा.प्र.से. त्रिपुरा, मणिपूर)

केंद्रीय लोकसेवा आयोगाची (यूपीएससी) परीक्षा आपल्या ज्ञानाची कसोटी पाहणारी असली तरी तिच्या काठिण्याचा बाऊ करण्याइतपत नक्कीच कठीण नाही. प्रशासनासाठी योग्य उमेदवार निवडण्याची जबाबदारी लोकसेवा आयोगावर असते. त्यामुळे उमेदवाराची जडणघडण होईल, असा अभ्यासक्रम आयोगाकडून नागरी सेवा परीक्षेसाठी तयार करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम तसा खूप कठीण वाटत असला तरी तो आपल्या पद्धतीने सोपा कसा करता येईल त्या दृष्टीने प्रयत्न करावे. फार मोठा अभ्यास असल्याने काही काळानंतर रटाळपणा, उत्साह मावळणे, या प्रयत्नात यश मिळेल की नाही अशी अनामिक भीती मनात घर करून राहणे या गोष्टी आपल्याभोवती पिंगा घालत असतात. त्यामुळे हा अभ्यासक्रम लक्षात घेऊन आपली स्वत:ची अध्ययनपद्धती विकसित केली तर या परीक्षेत यश मिळवणे सोपे होऊन जाते. आपण जो काही अभ्यास करणार तो प्रफुल्लित आणि एकाग्र मनाने म्हणजेच करायला हवा, ही बाब या परीक्षेची तयारी करणाऱ्यांनी सर्वप्रथम लक्षात ठेवावी.

**वेगळी वाट निवडली**

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव हे माझे गाव. वडील शेतकरी व शिक्षक. विचाराने पुढारलेले. त्यामुळे त्यांनी माझा मोठा भाऊ मिलिंद व मला उच्चशिक्षित केले. मोठ्या भावाने इंजिनीअरिंग केले खरे ! पण करिअरच्या त्या वाटेने न जाता यूपीएससीची तयारी करून त्याने सीआरपीएफमध्ये असिस्टंट कमांडन्ट पदावर भरारी घेतली. माझ्यासमोर अकरावी-बारावीत चांगला अभ्यास करून इंजिनीअरिंगला जायचे हे ध्येय होते. त्यात चांगले गुण मिळाल्याने इंजिनीअरिंगसाठी पुणे येथील शासकीय महाविद्यालयात प्रवेशही मिळवला. परंतु मलाही माझ्या क्षमतांची पुढे ओळख होत गेली. त्यामुळे मला मोठ्या भावाप्रमाणेच प्रशासनातील संधी खुणावू लागली. बी.टेकनंतर व्यावसायिक क्षेत्रात आपण केवळ आपल्यापुरतेच मर्यादित राहणार हे निश्चित होते. त्यापेक्षा आपल्या क्षमतांचा आपण प्रशासनात अधिक वापर करू शकतो आणि त्या माध्यमातून जनसामान्यांशी सदैव जोडलेले राहू शकतो या प्रगल्भ विचाराने माझ्या मनावर गारुड केले आणि बी.टेकच्या शेवटच्या वर्षीच म्हणजे २०१२ मध्ये प्रशासनात येण्याचा मी निर्धार केला. प्रत्येक निर्णयात मला आईवडलांचा पाठिंबा राहिला.

**दुसऱ्याच प्रयत्नात यश**

यूपीएससीची नागरी सेवा परीक्षा देण्याचा निर्णय पक्का झाल्यानंतर बी.टेकच्या शेवटच्या वर्षाला असतानाच मी या परीक्षेची तयारी सुरू केली. महाविद्यालयीन परीक्षा आणि यूपीएससीचा अभ्यास यात वेळेचे नियोजन करून ताळमेळ बसवला. यूपीएससीने जाहीर केलेल्या अभ्यासक्रमातील विषय मी अभ्यासले. त्याचबरोबर रोजच्या जीवनात वाचनात, पाहण्यात, ऐकण्यात येणाऱ्या सर्व बाबी अभ्यासक्रमाशी जोडण्याचा प्रयत्न केला. योग्य नियोजन केले. त्यामुळे ताण न घेता अभ्यास करता आला आणि पहिल्याच प्रयत्नात पूर्व व मुख्य परीक्षेतही मी उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी पात्र ठरलो. मुलाखतीची बऱ्यापैकी तयारी केली. मात्र हवे तेवढे यश आले नाही. मात्र हे अपयश पचवून सकारात्मक विचार मनात ठेवले. दुसऱ्या प्रयत्नात मी मुलाखतीदरम्यान झालेल्या सर्व चुका शोधून त्या पुन्हा होणार नाहीत याची काळजी घेतली. त्याचा मला चांगला फायदा झाला. मागील मुलाखतीचा अनुभव असल्याने मनावरील दडपण काहीसे हलके झाले होते. एकंदरीत मुलाखत चांगली झाली आणि ध्येय प्राप्त झाले. पहिल्यांदा मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांनी यापूर्वी मुलाखतीपर्यंत जाऊन आलेल्या वरिष्ठ उमेदवारांशी चर्चा करावी, त्यांचे मार्गदर्शन घ्यावे.

**अभ्यास पद्धती**

नागरी सेवा परीक्षेचा अभ्यास करणारे अनेक उमेदवार तणावाखाली वावरत असतात. काहींचा पाहिला, दुसरा, तिसरा प्रयत्न असतो. एकूण प्रयत्नांपैकी एकएक प्रयत्न कमी झाला की ताण वाढत जाणे साहजिक आहे. परंतु या परीक्षेकडे एक प्रक्रिया म्हणून पाहायला हवे. आपल्याला या परीक्षेच्या निमित्ताने किती नवनवीन माहिती ज्ञात होत आहे हा विचार करत ही प्रक्रिया एन्जॉय करायला हवी. आपल्या ज्ञानात, अनुभवात जेवढी भर पडत जाते तेवढेच आपले व्यक्तिमत्त्व प्रगल्भ आणि

विकसित होत जाते. त्यामुळे या परीक्षेच्या अभ्यासाचा मी ताण न घेता तयारी केली. केवळ अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रित न करता ज्या-त्या गोष्टींकडे मी या परीक्षेच्या दृष्टीने बघितले. केवळ घोकंपट्टी न करता मी माहितीपट, निवडक चित्रपट, नाटक पाहून त्याचे या परीक्षेच्या दृष्टीने चिंतन केले. त्याचा मला निबंधलेखन व मुलाखतीसाठी अधिक फायदा झाला. त्यामुळेच निबंधलेखनात मी १४५ पर्यंत गुण मिळवू शकलो. पुस्तकाबरोबरच वर्तमानपत्रे, निवडक मासिके अभ्यासावी. परिणामकारक अभ्यास कसा करता येईल याचा विचार करावा.

### वरिष्ठांचे मार्गदर्शन

या परीक्षेसाठी मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते. त्यासाठी शिकवण्या लावल्याच पाहिजे असेही नाही. अनुभवी व्यक्तींचे, वरिष्ठ मित्रांचे मार्गदर्शनही निर्णायक ठरू शकते. शिकवण्या लावा अथवा नका लावू मात्र स्वअध्ययनाशिवाय पर्याय नाही. या परीक्षेची तयारी करताना मला पुणे येथील चाणक्य, विद्याप्रबोधिनी आदी नामांकित स्पर्धा परीक्षा केंद्रातील अनुभवी तज्ज्ञांचे, वरिष्ठांचे मार्गदर्शन मिळाले. शिवाय आम्हा मित्रांचा एक ग्रुप तयार झाला होता. त्यामुळे गटचर्चेतून बराच अभ्यास झाला.

### पर्यायी विषय

पहिल्या प्रयत्नाच्या वेळी दोन पर्यायी विषय होते. शिवाय बी.टेकचा अभ्यासही होता. त्यामुळे मुख्य परीक्षा व मुलाखतीसाठी मी अधिक वेळ देऊ शकलो नाही. परंतु त्यानंतर दुसऱ्यांदा प्रयत्नाच्या वेळी केवळ एक पर्यायी विषय होता आणि वेळही. त्यामुळे मुलाखतीसाठी देखील मी अधिक वेळ देऊ शकलो. पर्यायी विषय म्हणून मी इतिहास हा विषय आवड म्हणून निवडला. या विषयामुळे भुगोल, राज्यशास्त्र, प्रशासन आदी विषयांचाही अभ्यास होतो.

### ...अन् आकाश ठेंगणे झाले

पहिल्या प्रयत्नात अपयश आले असले तरी मी ते सकारात्मकरीत्या स्वीकारले. पहिल्याच प्रयत्नात आपण मुलाखतीपर्यंत जाऊ शकलो असा विचार करत मी पुन्हा जोमाने तयारीला लागलो. पूर्वी झालेल्या सर्व चुका होणार नाहीत याची काळजी घेतली. साधरणत: आठ तास अभ्यास केला. त्यामुळे यावेळी आपण आयएएस होणारच असा विश्वास होता. तरीदेखील निकालापूर्वी आठवडाभर अनामिक तणाव सर्वांच्या मनात निर्माण होतो. तो टाळण्यासाठी मी मित्रांसोबत थांबण्यापेक्षा सरळ गावी गेलो. शेतकामामध्ये हातभार लावला. येथेच मला कष्टाची सवय लागली होती. त्यामुळे पुन्हा शेतात राबायला मिळणे दुरपास्तच होणार होते. म्हणून मी शेतकामात स्वत:ला गुंतवून अनामिक ताणापासून दूर राहिलो आणि निकालाच्या दिवशी मी ३४७ व्या रँकिंगसह आयएएस झाल्याची बातमी कानावर धडकली आणि कष्टाचे चीज झाल्याचे समाधान झाले.

**- शब्दांकन : राजाराम देवकर**

## मुलाखत अशी द्या...

पहिल्या प्रयत्नात मी अनावश्यक पेहराव टाळून आहे तसा साधेपणाने अगदी टाय न बांधतादेखील मुलाखतीला सामोरे गेलो होतो. उगाच भंपकपणाचा आव कशाला आणायचा असा माझा विचार होता. मात्र मला मुलाखातीनंतर तो चुकीचा असल्याची जाणीव झाली. आपण किमान टापटीप आणि आदर्श पद्धतीने स्वत:ला प्रेझेंट करणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे मुलाखतीदरम्यान आपल्या पेहरावात, देहबोलीत भंपकपणाही नको आणि अगदीच साधेपणा, निष्काळजीपणाही नको हे लक्षात ठेवावे. ज्या ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्याचा स्वीकार करायला शिकलेच पाहिजे. मुलाखतीसाठी अनुभवी उमेदवारांचे मार्गदर्शनही महत्त्वाचे ठरते.



## यशाची सूत्रे

- स्वत:ला लागू होईल अशी अभ्यासपद्धती अवलंबवावी.
- मागील चुका यावेळी व्हायलाच नको हे सदैव लक्षात ठेवा.
- अनुभवी मित्रांचे वेळोवेळी मार्गदर्शन घ्या.
- अपयश पचवा. ते सकारात्मक दृष्टीने स्वीकारा.
- अभ्यासादरम्यान एकाग्रता असायलाच हवी.
- परीक्षा देताना, सराव प्रश्नपत्रिका सोडवताना होणाऱ्या आपल्या चुका शोधून काढा. गुण कमी येण्याची कारणे शोधून ती दूर करा.
- अभ्यासाचा ताण घालवण्यासाठी अधूनमधून माहितीपट, नाटक पाहावे. यामुळे मन प्रसन्न होतेच शिवाय ज्ञानात भर पडते.
- अभ्यासाचा ताण न घेता ही एक प्रक्रिया म्हणून एन्जॉय करा.
- घोकंपट्टी करण्यापेक्षा परिणामकारक अभ्यास करण्यावर भर द्या.
- मुख्य परीक्षेसाठी लिखाणाचा सराव करावा.
- कुठलेही वृत्तपत्र वाचताना त्यातील बातम्या, मजकूर यांचा संबंध आपल्या अभ्यासक्रमाशी जोडून पाहावा.
- अभ्यासात सातत्य महत्त्वाचे.
- अभ्यास करताना शॉर्ट नोट्स काढाव्या. स्टडी मटेरियल तयार करावे. म्हणजे परीक्षेपूर्वी उजळणी करताना ताण येणार नाही.
- परीक्षेपूर्वी आपण केलेल्या अभ्यासाची उजळणी आवश्यक ठरते.

"नागरी सेवा परीक्षेची तयारी करत असताना लोकराज्यचे काही महत्त्वपूर्ण विशेषांक मी वाचत होतो. या परीक्षेच्या तयारीला सुरुवात करणाऱ्यांसाठी हे मासिक माहितीपूर्ण ठरते. अचूक माहिती, शासनाची ध्येयधोरणे याचा अभ्यास यातून बऱ्यापैकी होतो."

# मधुमेहापासून मुक्ती



**भारतामध्ये मधुमेह हा एक राष्ट्रीय आजार झाला आहे. जगामध्ये चीननंतर भारतातच सर्वाधिक मधुमेहाचे रुग्ण आढळतात. १४ नोव्हेंबर हा जगभरात मधुमेह दिन म्हणून पाळला जातो. यावर्षी १४ नोव्हेंबर हा जागतिक मधुमेह संस्थेने 'हेल्दी ब्रेकफास्ट' म्हणजे संतुलित आहार ही 'थीम' मधुमेहासाठी वापरली आहे. याच दिवशी सुप्रसिद्ध डॉ. फ्रेडरिक बॅन्टीन यांनी इन्सुलीन या मधुमेहावरील वरदान ठरलेल्या संप्रेरकाचा शोध लावला होता. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने १४ नोव्हेंबरला 'जागतिक मधुमेह दिन' घोषित केला आहे. एकेकाळी श्रीमंतांचा आजार म्हणून ओळख असणारा मधुमेह आता घराघरात फोफावला आहे. प्रख्यात मधुमेहतज्ज्ञ, पद्मश्री डॉ. शशांक जोशी यांनी खास लोकराज्यच्या वाचकांसाठी या आजाराची सर्वंकष माहिती व त्यावरील उपाययोजना सांगितल्या आहेत.**

## निरामय

### अशी घ्या काळजी

- जेवणात पालेभाज्या, फळे यांचे प्रमाण वाढविणे गरजेचे
- आईसक्रीम, पेढा असे गोड पदार्थ टाळावे.
- रोज ३०-४५ मिनिटे व्यायाम करणे, चालणे,
- ६ ते ७ सात नियमित शांत झोपणे, तणाव कमी घेणे
- वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी आवश्यक
- मधुमेहींना इन्सुलीन नियमित घेणे आवश्यक

आपले शरीर पेशींचे बनलेले आहे. या प्रत्येक पेशीला कार्यरत असण्यासाठी ऊर्जा लागते. ही ऊर्जा शरीरातील ग्लुकोज म्हणजेच साखर देते. मात्र या साखरेला पेशीमध्ये नेण्याचे काम इन्सुलीन करीत असते. शरीरातील स्वादुपिंडामधील बीटा पेशींमध्ये इन्सुलीन तयार होते आणि हे इन्सुलीन साखरेचे वहन पेशींमध्ये करीत असते. पेशीमध्ये साखरेचे प्रमाण वाढणे, कमी होणे म्हणजे मधुमेह होणे होय.

**मधुमेहाचे प्रकार**

मधुमेह साखरेचे प्रमाण वाढल्याने होतो.

### मधुमेहाची कारणे

- आनुवंशिकता. आई-वडील दोघांना आजार असल्यास ९० टक्के तर दोघांपैकी एकाला आजार असल्यास ७० टक्के शक्यता.
- असंतुलित आहार, बदललेली जीवनशैली, वाढता तणाव आणि व्यायामाच्या कमतरतेमुळे शरीरातील साखरेचे प्रमाण वाढते
- स्वादुपिंडामधील बीटा पेशींमध्ये इन्सुलीन निर्मिती मंदावल्यास

मधुमेहाचे प्रमुख चार प्रकार आहेत. १) इन्सुलीन तयार न झाल्यामुळे होणारा मधुमेह

२) इन्सुलीन तयार असले तरी ग्लुकोजचे




वहन न झाल्यामुळे झालेला मधुमेह

३) गर्भवती स्त्रियांना गर्भधारणेदरम्यान होणारा मधुमेह

४) शरीरातील अन्य आजारामुळे होणारा मधुमेह

**मधुमेह होण्याची प्रमुख कारणे**


मधुमेह हा १०० टक्के आनुवंशिक आजार आहे. आई-वडील यांना असल्यास ९० टक्के या आजाराची शक्यता असते. आई किंवा वडील यांच्यापैकी कोणालाही आजार असेल तर ही शक्यता ७० टक्के असते. आणि शरीरात प्रमाणापेक्षा अधिक चरबी वाढल्यास किंवा पोटाचा आकार ९० सेंटीमीटरपेक्षा अधिक झाल्यास साखरेचे प्रमाण वाढून मधुमेह हमखास होतो. चरबी वाढण्यासाठीचे प्रमुख कारण म्हणजे असंतुलित आहार, बदललेली जीवनशैली, वाढता तणाव आणि व्यायामाची कमतरता होय.

**मधुमेहाची लक्षणे**

मधुमेह झाल्याचे शक्यतो कळत नाही. त्यामुळे वयाच्या ४०व्या वर्षानंतर प्रत्येकाने साखरेची चाचणी करणे गरजेचे आहे. साखरेच्या चाचणीशिवाय या आजाराचे अन्य दृश्य लक्षण दिसून येत नाही. बरेच वेळा शरीरातील अन्य ऑपरेशनच्या वेळी तपासणी करतांना किंवा साखरेची तपासणी केल्यावरच याबाबत रुग्णाला माहिती मिळते. मात्र अडीचशे ते तीनशेपर्यंत साखरेचे प्रमाण वाढल्यावर वारंवार लघवी लागणे, भूक वाढणे, नजरेवर परिणाम होणे अशी काही प्रमुख लक्षणे दृश्य स्वरूपात दिसतात.

**मधुमेहाचा शरीरावर परिणाम**

मधुमेहामुळे संपूर्ण शरीरावरच परिणाम होतो. मुख्यत: हृदय, त्वचा, डोळे आदींवर या आजाराचा थेट परिणाम होतो. मधुमेह आणि रक्तदाब हे आजार एकमेकांना पूरक आहेत. थोडक्यात एकमेकांचे सोबती आहेत. मधुमेह असणाऱ्यांना रक्तदाबाचा त्रास असतोच कारण साखरेचे प्रमाण वाढले की, साखर

##  मधुमेहाची लक्षणे

- वारंवार लघवी लागणे,
- भूक वाढणे,
- दृष्टीवर परिणाम होणे
- जखमा तातडीने बऱ्या न होणे


रक्तवाहिन्यांवर चिकटते. त्यामुळे रक्तदाब वाढतो. हृदयाला रक्त पुरविणाऱ्या वाहिन्या छोट्या असतात. त्यामुळे त्यांच्यात ब्लॉकेज निर्माण होतात. त्यामुळे रक्तपुरवठा कमी होऊन हार्ट अटॅक येणे, लकवा मारणे, किडनी खराब होणे आदी प्रकार होऊ शकतात. साखरेचे प्रमाण वाढल्यामुळे शरीराची त्वचा कोरडी होते. त्यामुळे विशेषत: पायावर अधिक परिणाम होतो. लघवीच्या जागेवरही त्वचाआजार होऊ शकतो. साखर वाढल्याने मोतीबिंदू होण्याची शक्यता जास्त असते. साखर डोळ्याच्या दृष्टिपटलावर चिटकते, त्यामुळे नजर कमजोर होते. याशिवाय सतत लघवी आल्यामुळे त्या जागेवर देखील इन्फेक्शन होऊ शकते. थायरॉईड सारखा आजार हा मधुमेह असल्यावरच होतो.

**तरुणांमध्ये मधुमेह वाढण्याची कारणे?**

अगदी तरुण वयात मधुमेह वाढत असल्याचे भारतात दिसून येते. यामागे असंतुलित आहार व बदलेली जीवनशैली प्रमुख कारणे आहेत. फास्टफूड हे तरुणाईसाठी जवळजवळ मधुमेहाचे प्रमुख कारण झाले आहे. 'फास्टफूड' किंवा 'जंकफूड' म्हणजे अधिक 'कॅलरी' असणारा आणि तंबाखूसारखे व्यसन लावणारा आहार आहे. यामध्ये कॅलरी अधिक असल्याने शरीरातील साखरेचे प्रमाण वाढते आणि चरबी अधिक प्रमाणात तयार होते. त्यामुळेच आजच्या मुलांमध्ये पोटाचा घेर वाढणे, चरबी वाढणे आदी मधुमेहाला पूरक असे आजार वाढले आहेत. याशिवाय नियमित व्यायामाचा अभाव, खेळांकडे दुर्लक्ष, कमी झोप आणि असंतुलित आहार यामुळे तरुणाईवर मधुमेहाने आपला विळखा टाकला आहे.

**मधुमेहाचा प्रतिबंध कसा करावा?**

मधुमेह होऊ न देणे हा सर्वोत्तम प्रतिबंध आहे. परंतु झाला असला तरी घाबरण्याचे कारण नाही. नियंत्रित जीवनपद्धती आणि संतुलित आहाराद्वारे त्यावर उपाय करता येतो. त्यामुळे तो झाला असेल किंवा होऊ द्यायचा नसेल तर पुढील त्रिसूत्री अमलात आणणे गरजेचे आहे. ती म्हणजे 'वेळेवर जेवा...कमी जेवा... योग्य जेवा व मधुमेह पळवा..'

##  परिणाम

- मधुमेहामुळे रक्तदाब वाढतो
- हृदयविकाराची शक्यता
- अर्धांगवायू होणे,
- किडनी खराब होणे
- जखमा बऱ्या न होणे
- मोतीबिंदू होणे
- थायरॉइड होणे

महाराष्ट्रीय लोकांचा आहार बघता आम्ही फॅट्स आणि कार्बोहायड्रेट्सचे अधिक सेवन करतो. त्यामुळे जेवतांना पालेभाज्या, फळे याचे प्रमाण वाढविणे गरजेचे आहे. ज्या फळांमध्ये साखरेचे प्रमाण कमी आहे अशी फळे घ्यावी. उदा. आंबा, केळी या फळांचे सेवन अधिक करू नये, यामध्ये साखरेचे प्रमाण अधिक आहे. आईसक्रीम, पेढा असे गोड पदार्थ टाळावे. पपईसारख्या फळाला प्राधान्य द्यावे. नॉनव्हेजमध्ये बलक काढलेले अंडे, मासे हे अधिक चांगले. अन्य मासांहार मधुमेहासाठी टाळणे गरजेचे आहे. कारण यातून साखरेचे प्रमाण अधिक वाढते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेळेवर जेवणे, संतुलित आहार घेणे, रोज ३०-४५ मिनिटे व्यायाम करणे, चालणे, ६ ते ७ तास नियमित शांत झोपणे, ताण कमी करणे, जीवनशैली नियमित बनविणे हे प्रमुख उपाय आहेत. याशिवाय वर्षातून एकदा शुगर, रक्तदाब, डोळे, कोलेस्ट्रॉल तपासणे आवश्यक ठरते.

**इन्सुलीनच्या इंजेक्शनची आवश्यकता का?**

इन्सुलीन हे आपल्या शरीरातच स्वादुपिंडातील बीटा पेशींमध्ये तयार होते. त्याची मात्रा कमी झाल्यास किंवा ते कार्यरत नसल्यास मधुमेहाला प्रतिबंध करण्यासाठी इंजेक्शनच्या रूपाने ते अन्नद्रव्य आपल्याला घ्यावे लागते. शरीरात त्याची व्याप्ती वाढविण्यासाठी ते इंजेक्शन स्वरूपातच घ्यावे लागते. आजकाल नवीन संशोधनामुळे इंजेक्शन स्वरूपात इन्सुलीन घेणे हे अगदी सोपे झाले आहे.

❐ ❐

## मधुमेह :१४ वैद्यकीय महाविद्यालयात तपासणी केंद्र

महाराष्ट्रातील १४ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आठवड्यातून एक दिवस मधुमेह तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. जागतिक मधुमेह दिनाला महाराष्ट्र शासनानेही सुरुवात केली आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी १४ नोव्हेंबर रोजी मुंबईत जे. जे. रूग्णालयात या तपासणी केंद्राचे उद्‌घाटन केले. आता महाराष्ट्रात आठवड्यातून एक दिवस मेडिसीन विभागामार्फत ही तपासणी मोहीम राबवली जाईल, अशी माहिती जे. जे. रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. तात्याराव लहाने यांनी दिली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेनेही मुंबई शहरात ८० ठिकाणी सल्ला, चाचणी व औषधोपचारासाठी मधुमेह केंद्राची स्थापना केली आहे.



# पक्ष्यांचे माहेरघर : नवेगाव बांध

नवेगाव बांध हे वनप्रेमींसाठी विदर्भातील एक आवडते ठिकाण आहे. हे एक निसर्गरम्य ठिकाण असून वनस्पतीसृष्टी, वन्यजीवसृष्टी आणि पक्षिसृष्टी यांनी समृद्ध आहे. हिरव्यागार टेकड्यांनी वेढलेला मोठा जलाशय हा येथे भेट देणाऱ्या पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. वृक्षराजींनी नटलेल्या टेकडीवर एक निरीक्षण मनोरा आहे. या मनोऱ्यावरून आपण भोवतालच्या जंगलाचा नयनरम्य नजराणा डोळ्यात साठवू शकतो तसेच जंगलात असलेल्या वन्य प्राण्यांचे निरीक्षणही करू शकतो. जंगलसफारीमधून जंगलामध्ये फेरफटका मारण्याची सोय येथे उपलब्ध आहे. या वनभ्रमंतीतून आपल्याला नवेगावच्या जंगलाचे मनोरम दर्शन तर घडतेच शिवाय येथे असलेल्या सांबर, चितळ, निलगाय, लंगुर, बिबट, अस्वल, रानम्हैस-रानरेडा रानडुक्कर, उदमांजर, कोल्हा, लांडगा अशा विविध वन्यप्राण्यांचे दर्शनही होते.

नवेगावचा मुख्य भाग हा डोंगराळ आहे. वनाचा एकूण विस्तार १३३.८८ चौरस किलोमीटर आहे. १९७५ साली हे राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले. डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या भव्य जलाशयामुळे हा परिसर निसर्गरम्य बनला आहे. नवेगावबांधमधील मुख्य आकर्षणाचे केंद्र म्हणजे पक्षी. विविध प्रकारच्या पक्ष्यांसाठी नवेगावबांध प्रसिद्ध आहे. नवेगावमध्ये हिवाळ्यात हजारोंच्या संख्येने पक्षी येतात. येथे विविध प्रकारचे जलपक्षी तर जंगलात झाडाझुडपातील नानाविध पक्षी पाहायला मिळतात. येथील पक्षी अभयारण्याला जगप्रसिद्ध पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अली आणि धर्मकुमारसिंह यांनी अनेकदा भेट दिली आहे. महाराष्ट्रात आढळणाऱ्या पक्ष्यांपैकी साठ टक्के पक्षी नवेगाव बांध येथे सापडतात. कायम रहिवासी पक्ष्यांव्यतिरिक्त अनेक स्थलांतरित पक्षीही नवेगावला पाहायला मिळतात. सारस क्रेन, उघडचोच करकोचा

> पर्यटनाच्या दृष्टीनेही महाराष्ट्र खऱ्या अर्थाने 'महा-राष्ट्र' असून चांद्यापासून बांद्यापर्यंत निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. जगाची सफर करण्याचा विचार करणाऱ्या पर्यटकांनी सर्वप्रथम महाराष्ट्राची सफर केल्यास पर्यटनाची तृष्णा भागल्याशिवाय राहणार नाही. जगप्रसिद्ध अजिंठा-वेरुळ लेणी, शिवकालीन गडकिल्ले, लोणारचे सरोवर, अभयारण्ये आदी सौंदर्यस्थळे पाहण्यासाठी जगभरातून पर्यटकांची गर्दी होत असते. महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या वनसंपदेच्या वैभवात भर टाकणारे विदर्भातील नवेगाव राष्ट्रीय उद्यान पर्यटकांना खुणावत आहे.

**किशोर वानखडे**



## असे जाता येईल

- जवळचे विमानतळ नागपूर हे १५० किलोमीटर अंतरावर आहे.
- देऊळगाव हे चंद्रपूर-गोंदिया मार्गावरील सर्वात जवळचे रेल्वे स्थानक (येथून उद्यान अवघे दोन किलोमिटर)
- नागपूर-कोलकता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर नागपूर १२० किलोमीटर वर साकोली नावाचे गाव आहे. येथून नवेगाव ३२ किलोमीटर आहे. राज्य परीवहन (एसटी) बसने जाता येईल.

## येथे राहता येईल

- जिल्हा वन्यजीव वनसंरक्षक यांचे लॉग हट रेस्ट हाऊसचे दोन कक्ष, हॉलीडे होम रेस्ट हाऊसचे आठ कक्ष संजय कुटी रेस्ट हाऊसचे दोन कक्ष उपलब्ध आहेत.
- युथ होस्टेलमध्ये ३६ बेडची सोय आहे.
- गोंदिया येथील उपवनसंरक्षक, वन्यप्राणी विभाग यांच्या कार्यालयातून निवासस्थानांचे आरक्षण करता येते.
- सार्वजनिक बांधकाम विभागाचे निवासस्थान. **दूरध्वनी :** ०७१८२- २२१२६

## भेटीचा उत्तम काळ

- पक्षीमित्रांच्या दृष्टीने स्थलांतरित पक्षांचा अभ्यास करण्यासाठी नोव्हेंबर ते फेब्रुवारी अखेर हा कालावधी योग्य
- वन्यप्राणी बघण्यामध्ये मार्च ते मे अखेरचा कालावधी उत्तम.

## जवळपासची आकर्षणे

- नागझीरा ५० किलोमीटर
- इटीयाडोह ६५ किलोमीटर
- गोठणगाव येथील तिबेटी वसाहत १७ किलोमीटर
- प्रतापगड येथील तिबेटी वसाहत १५ किलोमीटर.

(AsianOpenbill), करोता (Darter किंवा Snake Bird), मध्यम व मोठा बगळा, जांभळा कोहकाळ (Painted Stork), मोठा पानकावळा, काळा कंकर (Red Napped Ibis), रंगीत करकोचा, अशा मोठ्या पाणपक्षांसोबतच छोटा निळा खंड्या (Common Kingfisher) पाणमोर (Pheasant-Tailed Jacana), लहान पानकावळा, जांभळी पाणकोंबडी (Purple Swamphen), घोगर टिलवा (Black-Winged Stilt), लहान बगळा, कवड्या खंड्या (Pied Kingfisher) कंठी टिटवा (Little Ringed Plover), पाणपिपुली (Bronzed-winged Jacana), असे विविध पक्षीही जलाशयावर आढळतात. याशिवाय सरोवराच्या







बाजूला असलेल्या नवेगाव राष्ट्रीय उद्यानात नारिंगी डोक्याची कस्तुरिका (Orange headed Thrush), शाही बुलबुल (Paradise Flycatcher), धनेश (Hornbill), सुतार पक्षी (Woodpecker), हुदहुद (Hoopoe), तांबट (Coppersmith Barbet), शिक्रा, आपला राज्यपक्षी हरियाल (Yellow footed Green Pigeon), दयाळ (Oriental Magpie Robin), शामा (White-rumped Shama), बुलबुल (Redvented Bulbul), कोतवाल (Drongo), रानकोंबडा, (Jungle fowl), सातबहिणी (Babbler) गरूड (Eagle), बहिरी ससाणा (Peregrine Falcon), घुबड (Owl), घार (Black Kite), असे अनेकानेक पक्षी दिसून येतात. त्यामुळे पक्षिमित्रांसाठी नवेगावबांध हे एक आवडते ठिकाण ठरले आहे. या ठिकाणी सामान्यजनांचा फारसा राबता नसल्यामुळे पक्षांसाठी हे ठिकाण निवांत ठरते त्यामुळेच इथे भेट देणाऱ्या पक्षिमित्रांना नानाविध पक्षी पाहता येतात व त्यांची मनाप्रमाणे छायाचित्रेही घेता येतात. नवेगाव उद्यानात सारस क्रौंचांची एक जोडी नेहमी आढळून येते. विदर्भातील पक्षी अभ्यासकांच्या मते महाराष्ट्रात केवळ नवेगाव येथेच सारस क्रौंचाची वीण होते. गोंदिया जिल्ह्यातीलच आमगाव येथे सारस पक्षांच्या २७-२८ जोड्यांची नोंदही पक्षिनिरीक्षकांनी केली आहे. आमगाव हे ठिकाण गोंदियापासून ३५ किलोमीटर व नवेगावपासून १०० किलोमीटर आहे.

### वृक्षराजी

नवेगावबांध येथील वन दक्षिणीय मिश्र शुष्क पानगळी वन (Southern mixed dry deciduous forest), या प्रकारात मोडणारे आहे. येथील वनस्पतिसृष्टी आगळीवेगळी, विविधतेने नटलेली व समृद्ध आहे. येथील प्रमुख वृक्षांमध्ये साग, बिजा, धावडा, लोंडिया, गराडी पळस, हळदू, जांभूळ, कवठ, मोह, ऐन, टेंभुर्णी, सावर, तिवस, अमलतास, बेल आणि बोर यांचा समावेश होतो. बांधावर आवळा, बेहडा, हिरडा ही औषधी झाडे तर मोह, चारोळी, टेंभुर्णी ही फळझाडे व पाणी शुद्ध राहावे म्हणून निर्मळाची झाडे लावलेली आहेत. ज्या ठिकाणी पाळीवरून पाणी पाझरून बाहेर पडते त्याजागी जांभूळ, पारजांभूळ, ऐन व उंबराची झाडे लावलेली आहेत. त्यामुळे संपूर्ण परिसराला एक प्रकारची हिरवी झालर लावली असल्याचा भास होतो.

### प्राणिसृष्टी

वाघ, बिबट, तरस, रानगवा, सांबर, चितळ, नीलगाय, खोकड, कोल्हा, रानडुक्कर, माकडे आणि वानरे, अस्वल (Sloth Bears), रानकुत्रे (Wild Boars), हे रानटी पशू नवेगाव राष्ट्रीय उद्यानात प्रामुख्याने आढळतात. विविध प्रकारचे साप येथे आढळतात.

नाग, नागराज, सतरंज्या, घोणस व फुरसे हे विषारी तर अजगर, धामण आणि तृणसर्प व पाणसर्प अधा विविध प्रकारचे बिनविषारी साप येथे आढळतात. पट्टेरी मण्यार ही सापांची दुर्मीळ प्रजातीही येथे आढळते विशेष म्हणजे तलावात पाणमांजरे आढळतात. त्यामुळे हे राष्ट्रीय उद्यान पक्षी, प्राणी आणि वनराईने नटले आहे. येथील हिरवाई जशी साद देते तसाच येथील तलावही साद देतो. त्यामुळे पर्यटनप्रेमींसाठी या जंगलाला भेट देणे म्हणजे पर्वणीच आहे. एकदा तरी या अभयारण्याला भेट द्यायलाच हवी. ❐ ❐

# माझे खाते- भाग्यविधाते

प्रधानमंत्री जनधन योजनेचा खातेदार असणे ही खातेदारासाठी अभिमानाची बाब असून त्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचे ते एक महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळेच योजनेतील खातेदाराला माझे खाते – भाग्यविधाते वाटणे अतिशय स्वाभाविक आहे.

केंद्र शासनाने यापूर्वी २००० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना बँकिंग सेवा पुरवण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यामुळे देशातील ५.९२ लक्ष गावांपैकी फक्त ७४ हजार गावांना लाभ मिळत होता. आता संपूर्ण वित्तीय समावेशन योजनेंतर्गत प्रधानमंत्री जनधन योजनेमध्ये गावांऐवजी बँकेचे खाते नसलेल्या कुटुंबावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

**योजनेचे उद्दिष्ट्ये**

■ देशातील सर्व कुटुंबाना बँकेच्या शाखेच्या अथवा बँक मित्रांच्या माध्यमातून बँकिंग सुविधा उपलब्ध करणे. ■ प्रत्येक कुटुंबात किमान एक बँक खाते उघडणे. ■ गांवपातळीपर्यंत वित्तीय साक्षरता पोहोचवणे ■ विविध शासकीय योजनांचे आर्थिक लाभ जनधन योजनेच्या लाभार्थींच्या खात्यात थेट जमा करणे ■ किसान क्रेडिट कार्ड पुरविणे. ही योजना राष्ट्रीय अभियान म्हणून राबवण्यात येत असून केंद्रीय वित्तमंत्री त्याचे प्रमुख आहेत. या योजनेमध्ये देशभरात ७.५० कोटी खाती उघडण्यात येतील.

२०११ च्या जनगणनेनुसार बँक सुविधा उपलब्ध नसलेल्या कुटुंबाची देशातील व राज्यातील स्थिती पुढील प्रमाणे आहे:-

| तपशील | महाराष्ट्र | भारत |
|---|---|---|
| लोकसंख्या | ११२३ | १२१०२ |
| घरांची संख्या | २३८ | २४६७ |
| बँक सुविधा असलेले | १६४ | १४४८ |
| बँकिंग सुविधा नसलेले | ७४ | १०१९ |

**योजनेंतर्गत खाते उघडणाऱ्यास मिळणारे विशेष फायदे:-**

■ ठेवीवर व्याज. ■ अपघात विमा छत्र रु. १ लक्ष. ■ किमान ठेवीची अट नाही. ■ आयुर्विमा छत्र रु. ३० हजार. ■ भारतात कुठेही पैशाचे हस्तांतरण. ■ शासकीय योजनांच्या वैयक्तिक लाभार्थींना मिळणारे आर्थिक साहाय्य थेट खात्यात जमा. ■ सहा महिन्यांपर्यंत समाधानकारकरीत्या खाते वापरल्यास ओवरड्राफ्ट सुविधा. ■ रुपी डेबीट कार्ड. ■ एका कुटंबातील एका व्यक्तीला ५००० रुपयांपर्यंतची ओव्हरड्राफ्टची सुविधा

हे फायदे मिळण्यासाठी योजनेंतर्गत दिनांक २६ जानेवारी २०१५ पूर्वी खाते उघडणे आवश्यक आहे. एवढेच नव्हेतर खाते असलेल्या व्यक्तीने रुपी कार्ड सुविधा दि. २६ जानेवारी २०१५ पूर्वी घेतल्यास त्याला वरील फायदे मिळू शकतील.

**खाते उघडण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

■ आधार कार्ड अथवा क्रमांक उपलब्ध असल्यास अन्य कोणताही कागदपत्रे आवश्यक नाहीत. ■ आधार कार्ड नसल्यास निवडणूक ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, नरेगा कार्ड व पासपोर्ट यापैकी एक दस्तवेज. ■ खाते उघडणाऱ्या व्यक्तीकडे यापैकी कुठलेच कागदपत्र नसतील तरी तो **अ)** केंद्र / राज्य / सार्वजनिक उपक्रम / अधिकरण / शेडयूल्ड बँक यांनी दिलेले फोटोसह ओळखपत्र.

**ब)** राजपत्रित अधिकाऱ्याचा दाखला (फोटोसह) देऊनही या योजनेंतर्गत बँकेत खातं उघडू शकतो.

## महाराष्ट्रातील साध्य

**दि. २८ ऑगस्ट २०१४ पासून दि.१२ नोव्हेंबर २०१४ अखेर राज्यात ४७ लक्ष ५६ हजार खाती या योजनेंतर्गत उघडण्यात आली आहेत. यापैकी २२ लक्ष ८१ हजार खाती ग्रामीण क्षेत्रातील आहेत. गावपातळीवरील आर्थिक चळवळ अधिक गतिमान करणारी ही योजना असून योजनेंतर्गत बँकेत खाते उघडल्यास मिळणारे लाभ, खातेदाराला प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देणारे आहेत. त्यामुळे आतापर्यंत ज्यांचे अद्याप कुठल्याच बँकेत खाते नाही अशा व्यक्तींनी या योजनेंतर्गत २६ जानेवारी २०१५ पूर्वी आपले खाते बँकेत उघडून घ्यावे, असे आवाहन शासनाने यानिमित्ताने केले आहे.**




**योजनेची अंमलबजावणी**

■ राज्यात २८ ऑगस्ट २०१४ रोजी सर्व जिल्ह्यात योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या दिवशी एकाच वेळी राज्यभरात ७११७ मेळावे घेण्यात आले. आता प्रत्येक शनिवारी अशा मेळाव्यांचे आयोजन केले जाते. प्राथमिक अंदाजानुसार राज्यात ७४ लक्ष खाती उघडण्याचे उद्दिष्ट आहे. ■ राज्यात सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र, ग्रामीण बँका यांच्या एकूण १००१४ शाखा तसेच सहकारी बँकांमार्फत ही योजना राबवण्यात येत आहे. ■ सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी बँकांच्या सहकार्याने असे मेळावे आयोजित करून प्रत्यक्ष कुटुंबनिहाय सर्वेक्षणात सहभागी व्हावे अशा सूचनाही शासनाने दिल्या आहेत.■ राष्ट्रीय ग्रामीण जीवोनोन्नती अभियानाचे संचालक हे मिशन डायरेक्टर म्हणून काम करणार आहेत.

**डॉ. सुरेखा मुळे**

# दिलखुलास संवादाची संस्मरणीय आठ वर्षे

**शासन आणि जनता यांच्यात प्रभावी, सातत्यपूर्ण व परिणामकारक संवाद साधणारे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नभोवाणीवर हक्काचे व्यासपीठ असावे, अशी सूचना तत्कालीन महासंचालक मनीषा पाटणकर–म्हैसकर यांनी केली व त्यातून साकारला दिलखुलास संवाद. दि. १६ नोव्हेंबर २००६ पासून राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सुरू झालेल्या या कार्यक्रमाने बघता–बघता आठ वर्षांची वाटचाल यशस्वीपणे पूर्ण करून नवव्या वर्षात दिमाखात प्रवेश केला आहे. आठ वर्षातील २१०० पेक्षा जास्त भागांच्या अखंड वाटचालीचा थोडक्यात आढावा घेणं टीम दिलखुलाससाठी व दिलखुलासच्या चाहत्यांसाठी एक आनंददायी स्मरणयात्रा ठरेल. कार्यक्रमाच्या या वाटचालीतील काही क्षणचित्रे :**

## दिलखुलासचा षटकार

दि. १६ नोव्हेंबर २००६ पासून दिलखुलास संवाद राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरुन बुधवार व गुरुवार असे आठवड्यातील दोन दिवस, स.७.२५ ते ७.४० यावेळेत प्रसारित होत असे. श्रोत्यांच्या उदंड प्रतिसादामुळे मार्च २००७ पासून शुक्रवार व शनिवार असे दोन दिवस वाढविण्यात आले आणि आठवड्यातील चार दिवस कार्यक्रम प्रसारित करण्यास सुरुवात झाली. त्यानंतरही श्रोत्यांच्या सततच्या आग्रही मागणीमुळे दि. १ जून २००९ पासून हा कार्यक्रम सोमवार ते शनिवार असे सहा दिवस प्रसारित करण्यात येऊ लागला. त्यामुळे आता सोमवार ते शनिवार असे सहा दिवस दिलखुलासचा षटकार राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून गाजतोय.

## दिलखुलास पत्रसंवाद

अगदी पहिल्या कार्यक्रमापासून श्रोत्यांच्या पत्रांचा अक्षरश: पाऊस पडू लागला. त्यातूनच दि. २५ जानेवारी २००६ पासून महिन्याच्या शेवटच्या शनिवारी पत्रसंवाद हा श्रोत्यांच्या पत्रांना उत्तर देण्याचा कार्यक्रम प्रसारित करण्यात येऊ लागला. कार्यक्रम ऐकल्यानंतर श्रोते त्यावर आपले अभिप्राय तर देतातच पण अनेक नवीन विषय, वक्तेही सुचवतात. क्वचित तक्रार, सूचनाही करतात. श्रोत्यांच्या अलोट प्रेमामुळे हा संवादसेतू अधिकाधिक बळकट होतोय.

## दिलखुलास प्रेरणा

प्रशासकीय सेवांमध्ये मराठी तरुणांचा टक्का वाढावा, यासाठी 'दिलखुलास प्रेरणा' हे खास प्रेरक मुलाखतींचे सदर आठवड्यातून एक दिवस प्रसारित करण्यात येते. परीक्षेची तयारी, विषयांची निवड, पुस्तकांची निवड, प्रशिक्षण इ. सर्व बाबींची माहिती या मुलाखतींमधून मिळत असल्याने या मुलाखती प्रेरणादायी आणि उपयुक्त ठरल्याची भावना श्रोत्यांनी पत्राद्वारे कळविली असून मराठी तरुणांचे या परीक्षांमधील यशस्वितेचे प्रमाण अलीकडे वाढत असल्यानं टीम दिलखुलासला आनंद आणि अभिमान आहे.

## दिलखुलास आपल्या दारी

दिलखुलास संवाद जसजसा लोकप्रिय होत होता, तसतसा त्यात अधिकाधिक नावीन्य आणण्याचा प्रयत्न केला गेला. आकाशवाणीवरून होणारा हा संवाद थेट श्रोत्यांच्या गावात नेण्याच्या सूचना तत्कालीन महासंचालकांनी दिल्या आणि फेब्रवारी २००९ मध्ये जळगांव येथे टीम दिलखुलास पोहोचली. श्रोत्यांनी अगदी गावाच्या वेशीवरून ढोल ताशांच्या गजरात मिरवणुकीने टीम दिलखुलासचे उत्साहात स्वागत केले. शासकीय योजना, उपक्रम यांची माहिती थेट घराघरात

## प्रशासनाची कौतुकाची थाप

दिलखुलास कार्यक्रम आकाशवाणीवर असतो, हे ऐकताच सुरुवातीच्या काळात बहुतेकांनी 'आता रेडिओ कोण ऐकतं?' असा नकारात्मक सूर लावला असतानाच गृहनिर्माण विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव व विद्यमान मुख्य सचिव मा. श्री. स्वाधीन क्षत्रिय यांनी अत्यंत उत्साहाने कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यावेळी नव्याने घोषित गृहनिर्माण धोरणाची सविस्तर माहिती त्यांनी कार्यक्रमातून जनतेला दिली होती. त्यानंतर त्यांनी वेळोवेळी कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन टीम दिलखुलासच्या पाठीवर कौतुकाची एक प्रकारे थाप दिली आणि टीमचा उत्साह वाढवला. कार्यक्रमाला आठ वर्षे पूर्ण होत असताना ते राज्याचे प्रशासकीय प्रमुख आहेत ही टीमसाठीही आनंदाची बाब आहे.



**मा. मुख्य सचिवांचा प्रेरणादायी पाठिंबा.**



**दिलखुलास @ २००० ध्वनिमुद्रणाचा क्षण.**

पोहोचविण्याचा हा उपक्रम लोकप्रिय आणि यशस्वी ठरला.

## दिलखुलासचा ‘अक्षर’ ठेवा

दिलखुलास संवाद कार्यक्रमातील मुलाखतींची लोकप्रियता आणि उपयुक्तता बघून या मुलाखती पुस्तकरूपाने उपलब्ध करून देण्याची मागणी श्रोत्यांकडून सातत्याने होत होती. माहितीचा हा खजिना ‘अक्षर’ स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी कार्यक्रमाच्या वर्षपूर्तीचे औचित्य साधून ‘वर्ष दिलखुलास संवादाचे’ या देखण्या व संग्राह्य पुस्तिकेचे प्रकाशन तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते एका दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. दिलखुलासच्या वर्षभराच्या वाटचालीतल्या मुलाखती संक्षिप्त स्वरूपात कायमच्या उपलब्ध करून देण्याच्या या कल्पनेचेही श्रोत्यांनी मनापासून स्वागत केले.

## मान्यवरांची मांदियाळी

प्रामुख्याने शासकीय योजना व उपक्रम यांची माहिती देणाऱ्या, मा. मंत्री व प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्या मुलाखती दिलखुलासमधून प्रसारित करण्यात येत असल्या तरी समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचे अनुभव या व्यासपीठाच्या माध्यमातून श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. महाराष्ट्रभूषण डॉ. अनिल काकोडकर, महाराष्ट्रभूषण कवी मंगेश पाडगांवकर, पद्मश्री डॉ.शरद काळे, पद्मश्री योगतज्ज्ञ सदाशिव निंबाळकर, पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने, पद्मश्री डॉ. नंदकुमार लाड, पद्मश्री डॉ.शशांक जोशी, पद्मश्री डॉ.अमित मायदेव, डॉ. नरेंद्र जाधव, मॅगेसेसे पुरस्कार विजेत्या नीलिमा मिश्रा, डॉ.मंगला नारळीकर, डॉ.अमोल दिघे, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, नीलकंठ खाडिलकर, डॉ. भालचंद्र मुणगेकर, मधु मंगेश कर्णिक,डॉ.अनिल अवचट, शारदा साठे, पोपटराव पवार, ॲड. शिरिष देशपांडे , विश्वास गोरे, ना.धो.महानोर, डॉ.यशवंत पाठक, वसंत आबाजी डहाके, डॉ.तारा भवाळकर, उत्तम कांबळे, प्रभाकर पणशीकर, लोकशाहीर विठ्ठल उमप, प्रा. मधुकर तोरडमल, अरुण काकडे, सुमन कल्याणपूरकर, सुलोचना चव्हाण, फैय्याज, अशोक पत्की, स्मिता तळवलकर,वामन केंद्रे, भीमराव पांचाळे, श्रुती सडोलीकर- काटकर, मकरंद अनासपुरे, भीष्मराज बाम, तेजस्विनी सावंत, कृष्णा पाटील, डॉ.हिंमतराव बावीस्कर, डॉ.रेखा डावर, डॉ.राजेंद्र बर्वे, डॉ.रागिणी पारेख, डॉ.अनुराधा सोवनी, डॉ.ए.के. संचेती, डॉ.नंदिता पालशेतकर इ. सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी कार्यक्रमाच्या माध्यमातून श्रोत्यांशी दिलखुलास संवाद साधला आहे.

## दिलखुलास विशेष

वेगवेगळ्या दिनविशेषांची, सण-उत्सवांची दखल घेणारे कार्यक्रम वेळोवेळी प्रसारित करण्यात आले. ज्योतीर्भास्कर जयंत साळगांवकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे या मान्यवरांचे कार्यक्रम विशेष संस्मरणीय ठरले. त्याचप्रमाणे मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा अत्यंत धैर्याने मुकाबला करून हुतात्मा झालेल्या सैन्यदल व पोलीस दलातील शूरवीरांना मानवंदना देणाऱ्या कार्यक्रमाने श्रोत्यांबरोबरच टीम दिलखुलासचे डोळेही पाणावले.

## महती माहितीच्या अधिकाराची

प्रशासन पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या हेतूने लागू करण्यात आलेल्या माहितीच्या अधिकाराच्या कायद्याविषयी तत्कालीन राज्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांच्या मुलाखतीने दिलखुलास संवाद कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.त्यानंतरही या कायद्याची माहिती जास्तीत-जास्त जनतेपर्यंत अधिकाधिक प्रमाणात पोहोचविण्यासाठी वेळोवेळी राज्य माहिती आयुक्त रत्नाकर गायकवाड, विभागीय आयुक्त विजय कुवळेकर, विलास पाटील तसेच माहिती अधिकार कायदा लागू व्हावा, यासाठी आग्रही भूमिका घेणारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, यांच्याही मुलाखती कार्यक्रमातून प्रसारित करण्यात आल्या.

## हक्काचे व्यासपीठ

नवीन शासकीय योजना, धोरणे, कायदे यांची राज्यातल्या जनतेला सर्वप्रथम माहिती देण्याचे काम दिलखुलास कार्यक्रमाने केले. माहिती अधिकार कायदा, राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण, तंटामुक्त गाव योजना ते अलीकडच्या स्वच्छ भारत अभियान यांसारख्या अनेक नवीन योजनांची पूर्वप्रसिद्धी तसेच अंमलबजावणीदरम्यान वेळोवेळी प्रसिद्धी देण्याचे काम दिलखुलास कार्यक्रमाने आवर्जून केल्याची पावती विविध शासकीय विभागांनीही दिली आहे.

**- मीनल जोगळेकर**

## दीर्घकाळ, एकमेव, लोकप्रिय...

दिलखुलास हा कार्यक्रम आकाशवाणीवरील दीर्घकाळ चालणारा आणि लोकप्रियता टिकवून ठेवणारा एकमेव कार्यक्रम असून देशातील अन्य कोणत्याही राज्यामार्फत असा कार्यक्रम प्रसारित होत नसल्याची धारणा आहे, अशा शब्दात आकाशवाणीने कार्यक्रमाचा गौरव केला आहे. आकाशवाणीच्या जाहिरात प्रसारण सेवा, मुंबई केंद्राला मिळालेल्या २०१२-१३ सालच्या आर. के. तालीब पुरस्काराच्या यशात दिलखुलास कार्यक्रमाने मोठा हातभार लावला असल्याचे प्रशस्तीपत्र दिले आहे. देशातील ९८ टक्के जनतेपर्यंत पोहोचलेल्या, ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या तसेच माहिती , लोकशिक्षण, लोकप्रबोधन, मनोरंजन व जनसंवाद याद्वारे विकासाच्या प्रक्रियेत अत्यंत मोलाचे योगदान देणाऱ्या आकाशवाणीने काढलेले हे गौरवोदगार निश्चितच मोलाचे व सुखावणारे आहेत.

# लोकाभिमुख कारभाराची ग्वाही...

**दि. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर लगेच त्यांची पहिली अधिकृत मुलाखत प्रसारित करून 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमानं इतिहास घडवला. त्यानंतर मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री एकनाथराव खडसे तसेच सुधीर मुनगंटीवार यांच्या मुलाखती प्रसारित करून राज्याच्या लोकाभिमुख विकासाच्या वाटचालीचे चित्र अधिक स्पष्ट केले.... या मुलाखतींच्या अनुभवावर आधारित वृत्तांत...**

एखाद्या गोष्टीची सुरुवात नेमकी कशी झाली यावर त्याचा शेवट अवलंबून असतो, असे म्हणतात. जय महाराष्ट्र टीमचे नेमके याच पठडीतले काम पडद्यामागून सुरु असते. मुलाखतीचा विषय, वक्ता यांची निवड असो, दूरध्वनीवरून प्रेक्षकांचे प्रश्न विचारणे असो, की पाहुण्यांचे आदरातिथ्य असो. साऱ्याच गोष्टीत परफेक्शन ठेवण्याचा जय महाराष्ट्र टीमचा प्रयत्न असतो. राज्याचे महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांच्या १८ नोव्हेंबरला आणि अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या २८ नोव्हेंबरला प्रसारित झालेल्या मुलाखतीच्या कार्यक्रमासाठी जय महाराष्ट्रचे नियोजन ते प्रसारण सारेच संस्मरणीय ठरले.

मुलाखतीसाठी संध्याकाळी सव्वासात वाजता महसूल मंत्री मा. एकनाथराव खडसे दूरदर्शनला पोहचले. स्वागतानंतर मुलाखतकार भिडे आणि मंत्रिमहोदयांनी कार्यक्रमाच्या रूपरेषेबाबत चर्चा केली. ही चर्चा करतानादेखील त्यांच्यातला उत्साह वाखण्याजोगा होता. तसे पाहता एखाद्या वरिष्ठ मंत्र्यांची मुलाखत पार पडेपर्यंत संपूर्ण टीमला एक प्रकारचे टेंशन असते. कार्यक्रमाचे स्वरूप कसे आहे, किती वेळ बोलावे लागेल, फोन इन असल्यानं बाहेरुन प्रेक्षक प्रश्न विचारतील अशी सूचना देत असतानाच ते म्हणाले कोणताही प्रश्न असू द्या मी सविस्तर उत्तर देईन. त्यांनी असे म्हणताच आमची बरीचशी काळजी कमी झाली.



**जय महाराष्ट्र कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाची आठवण म्हणून छोटंसं स्मृतिचिन्ह देऊन मा. खडसे साहेबांचे स्वागत करण्यात आलं. स्वागताची पद्धती आणि विशेषत: स्मृतिचिन्ह मा. महसूल मंत्र्यांना खूपच आवडले. महत्त्वाचं म्हणजे हे स्मृतिचिन्ह आठवण म्हणून कामाच्या टेबलवर ठेवणार असल्याचं देखील त्यांनी सांगितले.**

कार्यक्रमातील प्रत्येक प्रश्नाला त्यांनी अगदी मनमोकळी उत्तरे दिले. सर्वसामान्य जनतेचा त्यांच्या दैनंदिन जीवनातील अनेक बाबींसाठी कोणत्या ना कोणत्या कारणांसाठी महसूल विभागाशी संबंध येत असल्याने सहाजिकच फोनवरून देखील अनेकांनी आपले प्रश्न मांडले. अगदी बीड, गडचिरोली, येवला, सोलापूर, अशा वेगवेगळ्या ठिकाणांवरून प्रेक्षकांनी आपल्या समस्या मंत्रिमहोदयांसमोर मांडल्या आणि मा. मंत्रिमहोदयांनीही त्यांना समर्पक उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले.

संपूर्ण तासाभराच्या कार्यक्रमात त्यांनी महसूल विभागाच्या भावी वाटचालीविषयी एक सविस्तर चित्र उभे केले.

## अर्थमंत्र्यांची लोकाभिमुखता

महसूल विभाग जसा प्रशासनाचा कणा आहे तितकाच महत्त्वाचा विभाग म्हणून अर्थ विभागकडे पाहिले जाते. सरकारी पातळीवर कुठलेही धोरण राबवायचे असल्यास अर्थखात्याची मोलाची भूमिका असते. त्यामुळेच आगामी काळात नव्या सरकारची नवी अर्थविषयक धोरणे, उद्दिष्टे आणि आव्हाने कुठली असतील, हे जाणून घेण्यासाठी जय महाराष्ट्र टीमने संपर्क साधला मंत्रिमंडळातील एका ज्येष्ठ आणि अभ्यासू मंत्री मा. सुधीर मुनगंटीवार यांच्याशी. कार्यक्रमाच्या पाऊण तास आधी मंत्रिमहोदय दूरदर्शन केंद्र वरळी येथे पोहोचले. कार्यक्रमादरम्यान विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांव्यतिरिक्त अर्थखात्याशी संबंधित कुठलाही प्रश्न विचारा, असे सूत्रसंचालक विनायक पात्रुडकर यांना सांगून त्यांनी आपली लोकाभिमुखता दाखवून दिली.



**केवळ सर्वसामान्य जनताच नव्हे तर अनेक आजी-माजी मंत्रीही हा कार्यक्रम आवर्जून पाहात असल्याचे दिसून आले. कार्यक्रमानंतर लागलीच मंत्रिमहोदयांना पहिला फोन आला तो माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा. त्यांनी अर्थमंत्र्यांची अभ्यासू वृत्ती तसेच जय महाराष्ट्र या कार्यक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रम संपल्यानंतर दहा ते पंधरा मिनिटे मंत्रिमहोदय शुभेच्छांचे फोनच घेत होते.**

केवळ मंत्रिमहोदयांनाच नव्हे तर जय महाराष्ट्र कार्यक्रमाच्या दर्शकांना या कार्यक्रमाची उत्सुकता असल्याचे पाहायला मिळाले. कार्यक्रमाला सुरुवात झाल्यानंतर प्रेक्षकांना दुरध्वनीवरून प्रश्न विचारण्याचे आवाहन सूत्रसंचालकाने करण्यापूर्वीच फोन खणखणायला सुरुवात झाली होती. पहिलाच फोन आला तो रायगड जिल्ह्यातील पेण येथून. त्यानंतर औरंगाबाद, नांदेड, येवला, चंद्रपूर एवढेच नव्हे तर गडचिरोलीतूनही काही प्रश्न विचारण्यात आले.

राज्यभरात जय महाराष्ट्र हा कार्यक्रम पाहिला जातो, याची ही पोचपावतीच म्हणावी लागेल. खऱ्या अर्थाने कार्यक्रमाच्या नियोजनापासून ते प्रसारणानंतरचा शेवट गोड झाल्याचे समाधान जय महाराष्ट्रच्या टीमसह मंत्रिमहोदयांच्या चेहऱ्यावर पाहायला मिळाले आणि त्यातून पुन्हा पुढचा कार्यक्रम आणखी एका नव्याने उत्साहाने व दमाने करण्याची प्रेरणा या माध्यमातून नक्कीच मिळाली.




# महान्यूज : एक प्रवास अर्ध्या तपाचा

महान्यूजच्या वाटचालीला नुकतीच सहा वर्ष पूर्ण झाली. या सहा वर्षाच्या काळात महान्यूजने विकासात्मक पत्रकारितेच्या क्षेत्रात आपला एक दबदबा निर्माण केला असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आजही महान्यूजकडे अचूक माहितीचा स्रोत याच दृष्टिकोनातून भेट देणाऱ्या नेटिझन्सची संख्या जास्त आहे.

पण ही सहा वर्षाची वाटचाल निश्चितच खूप काही शिकवून गेली. शासकीय बातम्या तसेच प्रसिद्धीच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी महासंचालनालयाने तंत्रज्ञानाचा वापर नेहमीच केला आहे. फार पूर्वी ज्यावेळी संगणक ही संज्ञा अतिशय नवीन होती त्यावेळी कृष्णधवल संगणकाच्या मदतीने बिट फॅक्स/ बिट लॉग या प्रणालीद्वारे जिल्हा माहिती कार्यालयाला दैनंदिन बातम्या व इतर बाबी पाठविल्या जायच्या. त्यानंतर फॉण्ट सुविधा, न्यूज मॅनेजर अशा सॉफ्टवेअरद्वारे थेट वर्तमानपत्रांना बातम्या पाठविण्यास सुरुवात केली. याद्वारे आम्ही प्रत्यक्ष वर्तमानपत्राशी जोडले गेलो. पण हे पुरेसे नव्हते.

त्याच सुमारास महासंचालकपदी मनीषा म्हैसकर – पाटणकर रुजू झाल्या. दैनंदिन बातम्यांबरोबरच शासकीय कामकाज आणि विकासात्मक पत्रकारितेची गतिमान पद्धतीने सांगड घालून, अधिकाधिक जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी आपली स्वत:ची वेबसाइट तयार करावी असा विचार त्यांनी मांडला आणि पारंपरिक माध्यमाबरोबरच वेब माध्यमाच्या नव्या दुनियेत महान्यूजच्या रूपाने आम्ही प्रवेश केला. राष्ट्रीय विज्ञान सूचना केंद्राच्या सर्व प्रक्रिया आणि तांत्रिक बाबी पूर्ण करून १९ सप्टेंबर २००८ रोजी महान्यूजची सुरुवात झाली.

शासनाच्या सर्व वेबसाइटपैकी युनिकोड मधील पहिली वेबसाइट म्हणून महान्यूजचे सर्वत्र कौतुक झाले. यामुळे आता आम्ही फक्त वर्तमानपत्रांशीच नव्हे तर सामान्य जनतेशीही जोडले गेलो होतो. युनिकोडमधील वेबसाइट असल्यामुळे वर्तमानपत्रांना फॉण्ट बदलून घेण्याचीही गरज पडत नसे. त्यामुळे वर्तमानपत्रातून महान्यूजमधील मजकुराला भरपूर प्रसिद्धी मिळू लागली. पण खरी परीक्षा तर आता सुरु झाली होती.

महान्यूज हा एक प्रकारे ई-पेपर अशा पद्धतीने आम्ही मजकुराचे नियोजन करायचो. तत्कालीन महासंचालक मनीषा म्हैसकर – पाटणकर या दररोज मजकुराचा आढावा घ्यायच्या व दररोज दर्जेदार मजकूर कसा अपलोड होईल याकडे त्यांचे लक्ष असायचे. त्यामुळे दररोज नवनवीन आणि आशयघन मजकूर अधीनस्त कार्यालयाकडून प्राप्त करुन घेणे आणि त्यावर संपादकीय प्रक्रिया करुन अपलोड करणे हा एक परिपाठच बनला होता. विशेष म्हणजे अगदी सुटीच्याही दिवशी महान्यूजवरील मजकूर अद्ययावत केला जायचा. हा प्रघात आजही कायम आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वेबसाइटपैकी नियमितपणे अपडेट होणारी वेबसाइट म्हणून महान्यूजने एक लौकिक मिळवला आहे. या वेबसाइटला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. एका अर्थाने 'महान्यूज' एक ब्रॅन्ड झाला आहे, त्यामुळे नेटिझन्सच्या आमच्याकडून अपेक्षाही वाढल्या आहेत याची आम्हाला जाणीव आहे. गेल्या काही वर्षात आम्ही नवनवे उपक्रम राबवले. लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या वेळेस राबवलेली विशेष प्रसिद्धी मोहीम असो, जनजागृती कार्यक्रमाचे वार्तांकन असो, किंवा काही वर्षापूर्वी घडलेल्या बॉम्बस्फोटासारख्या घटना असो, महान्यूजने वेळोवेळी वस्तुस्थिती दर्शक माहिती तत्परतेने देण्याचे काम अचूकपणे पार पाडले आहे. केवळ रुक्ष मजकूर न देता समर्पक असे छायाचित्र व चित्रफीत देण्याचाही आम्ही वेळोवेळी प्रयत्न केला आहे.

गेल्या सहा वर्षांच्या वाटचालीकडे बघताना आज जाणवते की, अल्पावधीतच महान्यूजची जी दखल घेतली गेली त्यामुळे आमची जबाबदारी आता आणखी वाढली आहे आणि त्यासाठी आम्ही निश्चित प्रयत्न करू.

**– मयुरा देशपांडे –पाटोदकर**

**महान्यूजची फोटो गॅलरी: महाराष्ट्रातील शेकडो वर्तमानपत्र आणि वेबपोर्टलला सातत्याने नव-नवीन छायाचित्र हवे असते. यासाठी गेल्या काही वर्षात महान्यूजमधील फोटो गॅलरी आणि वृत्तांकनातील छायाचित्र हे नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. राज्यातील व देशातील प्रमुख घडामोडींची ही फोटो गॅलरी वृत्तपत्रांसाठी फोटो पुरविणारी प्रमुख यंत्रणा आहे. महान्यूज वृत्तासोबतच आता छायाचित्रांसाठीही लोकप्रिय होत आहे...**






**आजच्या तरुण पिढीचे प्रतिनिधी असणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ! मुख्यमंत्री पदाची सूत्रे हाती येताच त्यांनी राज्यात कामाचा आणि निर्णयांचा एकच धडाका लावला. या साऱ्या धावपळीतही काही घटना, काही क्षण त्यांना निःस्तब्ध करतात तर काही हेलावून टाकतात. या साऱ्या मनोव्यापाराचे पडसाद त्यांनी सवयीने वेळोवेळी केलेल्या ट्विट्समधून दिसतात. त्या ट्विट्सचे केलेले हे अवलोकन**

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली त्या दिवशीच्या त्यांच्या भावना व्यक्त करताना ते म्हणतात...

Got Blessed by My Mother yesterday before taking Oath as CM of Maharashtra. Feeling Inspired on 1st day of working.

बदलती परिस्थिती आणि नव्याने आलेल्या जबाबदाऱ्या यांचे मनाशीच एक आशादायी चित्र तयार करतांना ते ट्विट् करतात...

'भारत के पश्चिमी घाट को मंडित करनेवाले महासागर के किनारे खडे होकर मै ये भविष्यवाणी करने का साहस करता हूँ की, अंधेरा छटेगा, सूरज निकलेगा.

प्रदीर्घ काळापासून उराशी बाळगलेले आणि सत्यात उतरलेले स्वप्न त्याविषयी कृतकृत्यता व्यक्त करताना नम्रतेने ते उद्गारतात...

पंतप्रधान नरेंद्र मोदी व पक्षाचे अध्यक्ष अमितजी शाह यांनी पक्षाला यशाच्या शिखरावर नेले आहे. राज्यात प्रथमच भाजपाचे सरकार स्थापन झाले.

कार्तिकी एकादशीला विठ्ठलचरणी नतमस्तक होउन ते म्हणतात...

This was the first official Mahapooja by @BJP India State Govt. We pray for Blessings of Shri Vitthal for next 5yrs for our Government.

महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्यांची मुलाखत घ्यायला उत्सुक असताना मुख्यमंत्र्यांना सर्वात भावली ती लहानग्या दृष्टीने घेतलेली मुलाखत...

I enjoyed this interview. Our Govt will certainly make efforts to ensure better future for Drishti and all children

अवघ्या विदर्भाला ज्याच्या पूर्णत्वाची आस आहे अशा मिहान प्रकल्पासाठी नागपूरच्या पहिल्याच भेटीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले त्याबद्दल ते व्यक्त होतात...

Its necessary to complete MIHAN project to expedite industrialization in ...Vidarbha & many important decisions made in this regard today

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधीनंतर पहिल्यांदाच गडचिरोलीला भेट दिली तेव्हा ...

I chose Gadchiroli as my 1st visit to rural area to build up the confidence of my officers & to increase tribal community's faith in Govt.

मेळघाटातल्या आदिवासी गावांना भेट दिली आणि त्यांच्या समस्या आपुलकीने जाणून घेतल्या तेव्हा गलबलून जाऊन ते म्हणतात...

Touched by the warm welcome by the tribals in Malur Village in Melghat. Visited houses, interacted, listened to grievances, reviewed



जाणता राजाचा १००० वा प्रयोग...

Yesterday,witnessed 1000th show of Janata Raja, an inspirational play produced by Shivshahir Babasaheb Purandare.

रेल्वे अपघातात हात गमावलेल्या तरीही हिमतीने परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या मोनिका मोरेचे हाताने लिहिलेले ग्रिटिंग त्यांना हेलावून गेले

Touched on receiving Monica More's hand written greeting card. Monica had lost hands in a local train accident.

२६/११ च्या हुतात्म्यांना श्रद्धांजली

My heartfelt tributes to the brave policemen who fought for Mumbai's safety & laid down their lives for us on 26/11.We are proud of them.

राज्यातील उद्योगपतींशी झालेल्या अनौपचारिक चर्चेनंतर उद्योग क्षेत्राविषयी अपेक्षा व्यक्त करतांना ते म्हणतात...

I am glad that the diplomats showed their enthusiasm in joining us to take Maharashtra to leading position in @makeinindia campaign.



महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित
शासन आणि जनतेचे
नाते सातत्यपूर्ण संवादाचे...
मौजे बु.॥
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
आठ वर्ष | २१०० भाग | कोट्यवधी श्रोते
सर्व श्रोत्यांना मन:पूर्वक धन्यवाद !
ऐकायला विसरु नका दिलखुलास संवाद
राज्यातील आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन
सोमवार ते शनिवार सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित मालिका
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From18th to 25th December 2014
Date of Publication : 10th of every Month


# वर्तमानाचा साक्षीदार

- जाणकारांचे लेख
- यशस्वितांच्या कथा
- तज्ज्ञांच्या मुलाखती
- उपयुक्त सूचना

वार्षिक वर्गणी रु.१००

संग्राह्य विशेषांक :
एखाद्या विषयाचा सर्वांगीण आढावा घेणारे

आज आणि उद्यासाठीही
# लोकराज्य





प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक/ From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक **चंद्रशेखर ओक**, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
**मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक**